

# राजा शिवाजी

रियासतकार गो. स. सरदेसाई

२२२१८ संदर्भ भेट
१८।७।७८ ऐतिहास
१६१८



# राजा शिवाजी

रियासतकार गो. स. सरदेसाई

किंमत ६ रुपये

श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई




दुसरी आवृत्ति
एप्रिल, १९७४

मुद्रक : पां. बा. बागवे,
सुदर्शन आर्ट प्रिंटिंग प्रेस,
वडाळा, मुंबई ३१

प्रतिरूपमुद्रण : एस्. वाय्. चौघुले
सनदीप प्रोसेस,
वडाळा, मुंबई ३१

प्रकाशक : धनंजय बाळकृष्ण ढवळे
केशव भिकाजी ढवळे
गिरगांव, मुंबई ४

सर्व हक्क स्वाधीन





# प्रस्तावना

शिवाजी ह्या नांवांतच एक प्रकारची जादू आहे. सहज हें नांव उच्चारतांच विलक्षण आदर मनांत उभा राहातो. अंतःकरणांतली उत्कंठा जागृत होते. अशा ह्या अद्भुत नांवानें जी व्यक्ति ओळखली जाते तिचें अंतर्गत इंगित मी आतां सांगूं इच्छितों.

एकदा मला मुंबईतील एका शाळेकडून वार्षिक समारंभास बोलावणें आलें. त्या प्रसंगीं शिवाजीचें चरित्र सांगावें अशी सूचन चालकांनीं मला केली होती. तीन वाजतां कार्यक्रम सुरू झाला. मुलें, मुली, पालक, विद्यार्थी अशांचा पांचचार हजार पावेतों जमाव त्या प्रसंगीं असून त्यांत पुष्कळ बायकाही तान्हीं मुलें घेऊन हजर होत्या. त्यांच्या गोंगाटामुळें सर्वच समारंभाचा विरस होण्याचा प्रसंग येऊन ठेपला. क्षणभर विचार करून मी चालकांस म्हटलें, "तुम्ही आतां गोंगाट थांबवूं शकत नाहीं, तर मीच कायतें करून पाहातों." असें म्हणून एक वाक्य मोठ्यानें ठासून उच्चारलें, तें असें. "एक वर्षाचा बालशिवाजी असाच हट्ट धरून जिजाबाईच्या मांडीवर गडबडां लोळूं लागला. कांहीं केल्या गप्प बसेना. आई रडकुंडीस आली." अशी गोष्ट सुरू करतांच समोर तान्हीं मुलें व आया बसल्या होत्या त्यांचें लक्ष शिवाजीच्या गोष्टीकडे लागून लगेच शांतता उत्पन्न झाली. मनोमय गोष्ट रचून मीं शिवाजीचें बालपण एवढें रंगविलें कीं त्या दिवसाचें माझें प्रवचन अत्यंत आकर्षक बनलें. मात्र त्यांत शिवाजीचें बालपण वर्णन करण्यापलीकडे पुढील चरित्र सांगण्यास अवकाश राहिला नाहीं. एकंदर प्रसंग उत्कृष्ट सिद्धीस गेला. हा महिमा ह्या एका शिवाजी ह्या शब्दाचा होय.

शिवाजीच्या मोठेपणांतील पराक्रमाइतकेंच त्याचें बालपणही मनोरम आहे हें मला ह्या अनुभवानें कळून आलें. आईचें गर्भारपण, ह्या मुलाचा जन्म, बालपण व लहानपणचें शिक्षण हे विषय मी कालानुक्रमानें तपासूं लागलों. तत्संबंधीं जेवढे म्हणून उल्लेख ठिकठिकाणीं विखुरलेले मला आढळले, ते सर्व एकत्र पाहातां मला सहज कळून आलें कीं त्याच्या मोठेपणांतील पराक्रमाचें व जीवनाचें मुख्य बीज त्याच्या ह्या प्रथमावस्थेंतच पूर्णपणें रुजलें. ह्या दृष्टीनें त्याच्या बालपणचा अभ्यास सर्वांनींच लक्षांत घेण्याजोगा आहे. बालशिवाजीचा मोठा नाद म्हणजे वाटेल तिकडे हिंडत भटकत जाण्याचा. घरांत स्वस्थ म्हणून क्षणभर बसायचा नाहीं. हा केव्हां कुठें जाऊन काय घातपात करील हीच जिजाबाईची अहोरात्र मुख्य विवंचना. थोडासा मोठा होऊं लागतांच तो समवयस्क मुलें जमवून रानावनांत भटकत जाई. कैक दिवस तो कोठें आहे, काय करतो ह्याचा पत्ता देखील मातुश्रीला लागूं नये. तिच्या मनास सारखी काळजी वाटे. श्रीकृष्णाच्या लीलांप्रमाणें शिवाजीच्या लीलाही समजून घेण्याजोग्या आहेत. वसुदेव-देवकीवर जशीं संकटें आलीं, तशींच शहाजी-जिजा ह्यांजवरही आलीं. किंबहुना तीं जास्तच भीषण म्हणतां येतील. केवळ बुद्धिमत्तेच्या सामर्थ्यानें एक सामान्य पुरुष काय करूं शकतो हें जसें शिवाजीच्या उदाहरणानें कळून येतें, तसें ठळक व प्रेमळ उदाहरण आपल्या इतिहासांत दुसरें बहुधा मिळणार नाहीं.

**गो. स. सरदेसाई**

कामशेत

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १ हिंदूंचा छळ .... ... | १ |
| २ भोसले जाधव .... ... | ४ |
| ३ जिजाबाईची करुणावस्था ... ... | ८ |
| ४ धामधुमींतील जन्म ... ... | ११ |
| ५ आरंभींचीं स्थलांतरें ... ... | १४ |
| ६ बालपणची तळमळ ... ... | १७ |
| ७ बालराजाची मिरवणूक ... ... | २२ |
| ८ शहाजीराजांचा स्वधर्मद्रोह ... ... | २५ |
| ९ बंगलोरच्या भेटी ... ... | २८ |
| १० सिंहगडचा निकर ... ... | ३० |
| ११ शहाजी राजांची कैद ... ... | ३४ |
| १२ मोऱ्यांचा पाडाव ... ... | ३७ |
| १३ राजगड राजाचा, प्रतापगड जिजाबाईचा ... ... | ४० |
| १४ स्वराज्याची झोळी ... ... | ४२ |
| १५ सोन्याचा तोडा बक्षीस ... ... | ४६ |
| १६ बाजीप्रभूचें प्राणार्पण ... ... | ५० |
| १७ शायिस्ताखानावर मात ... ... | ५४ |
| १८ हेरगिरीचा प्रहार ... ... | ५७ |
| १९ सुरतेवर धाड ... ... | ६० |
| २० शहाजीराजांचा अंत ... ... | ६४ |
| २१ शिवाजी-जयसिंह संवाद ... ... | ६७ |
| २२ सिंहाच्या जबड्यांत ... ... | ७१ |
| २३ दुःसह्य अपमान ... ... | ७३ |
| २४ अद्भुत प्रयोग ... ... | ७६ |
| २५ सूड व प्रतिसूड ... ... | ८० |
| २६ जीवितसाफल्य ... ... | ८३ |
| २७ पराकाष्ठेची सद्भावना ... ... | ८७ |
| २८ भीषण उपरति ... ... | ९१ |
| २९ कर्नाटकीय विक्रम ... ... | ९४ |
| ३० संभाजीचें दुर्वर्तन ... ... | ९७ |
| ३१ संभाजी-दिलेरखान सहवास ... ... | १०० |
| ३२ सुबुद्धीचा चंद्रमा मावळला ... ... | १०३ |
| ३३ समारोप ... ... | १०६ |

२२२१९

# हिंदूंचा छळ

. १ .

फार दिवस नाहीं झाले कांहीं शिवाजी होऊन. फक्त तीनशें वर्षें होऊन गेलीं. नुकतेच तर तीनशें वर्षांचे त्याचे जन्मोत्सव चहूंकडे गाजले. असे उत्सव म्हणजे त्या व्यक्तीच्या पराक्रमांची आठवण. त्यांत जितकीं संकटें व अडचणी जास्त, तितकी त्या पराक्रमांची किंमत मोठी. अगदीं असाच शिवाजीचा वृत्तान्त बनला. रामाला रावण, कृष्णाला कंसमामा, तसाच शिवाजीला छळणारा औरंगजेब निघाला. केवढें अवघड नांव हें. अफजलखान, शायिस्ताखान अशा अगडबंब नांवांतच शिवाजीचा पराक्रम भरलेला आहे. मुसलमान म्हटला, कीं हिंदुस्थानांत त्याच्या लीला चहूंकडे गाजलेल्या दृष्टीस पडतात. शतकानुशतकें ह्या मुसलमानांनीं हिंदूंचा छळ केला, त्या छळास आळा घालण्याचा उद्योग अलीकडील काळांत एकट्या शिवाजीनें सिद्धीस नेला. औरंगजेबानें हिंदूंचीं मंदिरें पाडलीं. काशीक्षेत्र केवढें नामांकित, तेथील काशीविश्वेश्वराचें पुरातन मंदिर ह्या औरंगजेब बादशहानें जमीनदोस्त करून त्या ठिकाणीं प्रचंड मशीद उभारली. ती हल्लीं आगगाडींतून प्रवास करणारांना दूर अंतरावरून दिसूं लागते. तें मंदिर पुनः उभारण्याचा योग जरी शिवाजीस साधला नाहीं, तरी सिंहगड

किल्ला औरंगजेबाच्या कबजांतून त्यानें सोडविला हा काशी-विश्वेश्वराचा वचपाच होय. तानाजी मालुसऱ्यानें आपले प्राण देऊन तो किल्ला कसा घेतला ती गोष्ट मुलांस घरोघर माहीत आहे. मुसलमानांना आमच्या मूर्तीची भारी चीड. गझ्नवी महंमुदानें सोमनाथाची मूर्ति स्वहस्तानें फोडली. सालोसाल पंचवीस वर्षें त्यानें हिंदुस्थानांत स्वाऱ्या करून मोठमोठीं मंदिरें व धनाढ्य नगरें लुटलीं, देवांचे दागिने, धनिकांचें वित्त जें कांहीं हातीं लागलें तें सर्व हिरावून स्वदेशीं नेलें आणि येथील लोकांस जबरदस्तीनें बाटवून आपली संख्या वाढविली. विवाहित हिंदु स्त्रियांना व कुमारिकांना पळवून आपल्या घरांत घातलें. लोकांनीं अहोरात्र श्रम करून संपत्ति मिळवावी आणि ह्या परकी लोकांनीं धाड घालून ती सर्व क्षणमात्रांत हरण करावी असा हा प्रकार कैक शतकें चालला. हिंदूंस कोणी त्राता म्हणून राहिला नाहीं. अशा अंधारमय युगांत शिवाजीचा अवतार होऊन त्यानें ह्या दुष्ट अत्याचारांस आळा घातला, हा प्रकार इतिहासांत स्मरणीय बनला आहे.

यवनांच्या ह्या छळाचा विस्तार संतवाङ्मयांत भरपूर उतरलेला आढळतो. किंबहुना एकनाथादि अनेक संतांचा अवतारच मुळीं ह्या दुष्टांच्या प्रतिकारार्थ निर्माण झाला. सर्व देशभर पायीं फिरून मुसलमानांचे अत्याचार त्यांनीं प्रत्यक्ष पाहिले होते. बहुधा दररोज कांहीं तरी नवीन उच्छेदकृत्य लोकांच्या कानांवर येऊन आदळत असे. तेणेंकरून त्यांचीं अंतःकरणें विदीर्ण होऊन ते देवतांच्या आराधना करीत कीं, 'देवा, रावणादिकांचा छळ तूं स्वतः अवतार घेऊन बंद पाडलास, तशी स्थिति आजही चालू असतां तूं एवढी डोळेझांक कां करतोस? कशी तुला आमची करुणा येत नाहीं? आतां नको पाहूं आमचा असा अंत.' मातेच्या उदरांत शिवाजी असल्यापासून लोकांची ही दीनदशा सर्वतोमुखीं झालेली त्या वेळच्या ग्रंथांत विपुल आढळते. संस्कृत, मराठी, फारशी अशा अनेक भाषांत त्या वेळच्या ह्या लोकभावनेचें उत्कृष्ट वर्णन पहावयास मिळतें. संकट आलें, कीं अनन्यभावानें देवास शरण जावयाचें, तोच संकट निवारण करणारा सदैव अनाथांचा आधार होय असा आशय आम्हां आर्य लोकांच्या रक्तांत भिनलेला आहे. उदाहरणार्थ, प्रत्यक्ष जिजाबाईची तिच्या गर्भारपणाची करुण कहाणी लक्षांत आणल्यास, पुढील वर्णन म्हणजे केवळ तिच्याच तोंडचे ते शब्द होत असें वाटल्याशिवाय राहवत नाहीं. राजव्यवहारकोशाच्या उपोद्घातांत जिजाबाईचा एकनिष्ठ सेवक रघुनाथपंत हणमंते काय सांगतो पहा—

**देवदेव रिपवो वसुंधरां पीडयन्ति यवना भृशातुरं ।**
**तत्कुरुष्व जगतीसमीहितं म्लेंच्छवर्गमधुना शृणीहि तं ॥**
**साध्वी जिजूर्नाम सुलक्षणास्ते पत्नी दिलीपस्य सुदक्षिणेव ।**
**त्वं शाहपृथ्वीपतिवीरपत्न्यामस्यां समासाद्य मनुष्यजन्म ।**
**म्लेंच्छापहत्या सुखमारचय्य भूमेः पुनःस्थापय वर्णधर्मान् ॥**

यवनांच्या छळानें गांजलेले लोक देवास शरण गेले आणि करुणा भाकूं लागले त्या प्रसंगाचें हें वर्णन असून, शिवनेरीवर शिवाई देवीची जिजाबाई प्रार्थना करी तेंच हें तिचें वचन असेंही समजण्यास हरकत नाहीं.

अर्थ — हे देवाधिदेवा, हे यवन पृथ्वीला भारी पीडा देत आहेत तर त्यांना कापून काढून लोकांचें संकट निवारण कर कसें! असें पहा, शहाजीराजांची वीरपत्नी जिजाई म्हणून साध्वी आहे, जणूं काय दिलीपाची पत्नी सुदक्षिणाच. तिच्या पोटीं हे देवा, तूं आतां जन्म घे म्हणजे यवनांचा संहार करून वर्णधर्मांची पुनः स्थापना होईल व पृथ्वीला सुख लागेल. §

यवन व म्लेंच्छ हे शब्द त्या वेळच्या लेखांत समान अर्थानें वापरलेले दिसतात. वास्तविक प्राचीन काळच्या ग्रीक लोकांना यवन (आयोनियन) ही संज्ञा होती. सिकंदर बादशहा स्वारी करून इकडे आला तो पहिला यवन. त्यापुढें दुसरे परकी लोक इकडे आले त्यांसही यवन ह्या नांवानेंच इकडचे लोक ओळखूं लागले. तेणेंकरून यवन म्हणजे मुसलमान हा परिपाठ चालू झाला. बाहेरचे अस्सल मुसलमान इकडे फारच थोडे आले. हल्लींची पुष्कळशी संख्या बाटलेल्या हिंदूंची बनली आहे. धारचे परमार, देवगिरीचे यादव, वरंगळचे काकतीय, फलटणचे निंबाळकर असे अनेक क्षत्रिय राजवंश मुसलमानांनीं बुडवून नाहींसे केले. जिजाबाई ही देवगिरीच्या यादवांची वंशज. अलीकडच्या भाषेंत यादव ह्या शब्दाचें रूपान्तर जाधव असें झालें. यथाकाल शिवाजीचा जन्म होऊन त्यानें मुसलमानांस आळा घातला, तेव्हां लोकांची भावना झाली, कीं देवानेंच जिजाबाईच्या पोटीं जन्म घेतला. अलौकिक पराक्रम घडून आला, कीं ही परमेश्वरी करणी अशी आपली आर्यांची समजूत आहे. "औरंगजेबयवनाधिपभीतलोकत्राणाय यः परिगृहीत नवावतारः" म्हणजे यवनाधिपति जो औरंगजेब त्याच्या छळानें गांजलेल्या लोकांचें रक्षण करण्यासाठीं परमेश्वरानें हा अवतार घेतला.



§ पहा 'मराठ्यांच्या राज्यकथा', पृ० ८ : मातेचा उमाळा.

# भोसले जाधव

## .२.

शिवाजीच्या जन्माच्या वेळीं त्याचे आईबाप अत्यंत संकटावस्थेंत होते. त्यांचें उपनांव भोसले. हे भोसले कैक वर्षें महाराष्ट्रांत वसती करून सैनिकाच्या पेशानें गुजराण करीत. अर्थात् हा उद्योग त्यांना मुसलमानांच्या सेवेंत करावा लागे. शिवाजीचा बाप शहाजीराजे व आजा मालोजीराजे. अहंमदनगरास निजामशहा म्हणून मुसलमान सत्ताधीश होता, त्याच्या सैन्यांत मालोजी व शहाजी हे पुरुष उदयास आले. त्यांनीं आपला क्षात्रबाणा सोडला नव्हता. भोसल्यांप्रमाणेंच निजामशहाच्या पदरीं लखूजी ऊर्फ लुखजी जाधव हा प्रतिष्ठित सरदार सिंदखेड येथें वसती करून असे. मुसलमानांनीं यादवांचें राज्य बुडविल्यावर त्यांचे वंशज असेच ठिकठिकाणीं मिळेल तें काम स्वीकारून निर्वाह करूं लागले. वेरूळ येथें भोसल्यांचें वास्तव्य, तर जवळच सिंदखेड येथें जाधवांचें राहणें. कांहीं काळ सिंदखेड येथें लुखजी जाधवरावाच्या पदरीं मालोजी भोसले नोकरीस राहिला असतां लुखजीची मुलगी जिजाबाई व मालोजीचा पुत्र शहाजी ह्यांचें लग्न जुळून आलें. त्या वेळीं शहाजीचें वय दहाबारा तर जिजाबाईचें आठच्या अंदाजांत होतें. ह्यांच्या लग्नाची आख्यायिका रमणीय आहे. मालोजी भोसले

लुखजी जाधवाचे पदरी चाकरी करीत असतां रंगपंचमीचा सण आला, त्यानिमित्त लुखजीनें मालोजीस रंगाचे समारंभास बोलाविलें. लुखजीची कन्या जिजाबाई बापाजवळ बसली, तसा मालोजीपुत्र शहाजीही बापाबरोबर दरबारास गेला. दोघेंही अल्पवयीच. पुढें मोठीं माणसें रंग खेळूं लागलीं तेव्हां शहाजी व जिजाबाई ह्यांनीं देखील रंग उडविण्यास सुरुवात केली. बालक्रीडाच ती, जाधवरावास कौतुकास्पद वाटली आणि तो सहजीं बोलला, "ह्या जोडा मोठा सुंदर दिसतो नाहीं !" हें बोलणें ऐकतांच मालोजीनें उठून सर्वांस बजावलें, "पहा हो, जाधवरावांनीं आपली कन्या आमच्या पुत्रास देण्याचा उच्चार केला." थट्टेंतले शब्द पुढें खरे झाले. मालोजीनें आपली करामत वाढवून पुत्र शहाजीस जाधवरावाची कन्या मिळविली. ते व्याही बनले.

जिजाबाई मोठीशी देखणी नव्हती, पण तिच्या स्वरूपाची उणीव तिच्या उत्कट गुणांनीं भरून निघाली. ती मानी व क्षत्रिय बाण्यानें वागून पतिसेवानिष्ठ होती. यादव कुळाचा अभिमान तिच्या ठिकाणीं जाज्वल्य होता. ज्या यादवांच्या वंशाला भगवान् श्रीकृष्णांनीं भूषित केलें, त्याच वंशांतले आपण देवगिरीचे यादव. राज्य जाऊन दैन्य आलें, तरी जिजाबाईच्या अंतःकरणांतली ही भावना कायम होती. मुसलमान हिंदूंना छळतात ह्याचा तिला भारी त्वेष येई. तिला वाटे, पराक्रमानें आपण हिंदु कांहीं मुसलमानांहून कमी नाहीं. पराक्रम करूं तर आपणही गेलेलीं राज्यें पुनः कमावूं. तिच्या अंतःकरणांत अस्सल क्षत्रिय रक्त खेळत होतें. शहाजीराजे सुद्धां शूर व पराक्रमी असून राजकारण खेळविण्यांत विशेष निपुण होता. त्यानें निजामशहाची सेवा एकनिष्ठपणें करून मोठा लौकिक मिळविला. यथाकाल शहाजी व जिजाबाई वयांत आल्यावर त्यांना एकामागून एक सहा पुत्र नक्षत्रासारखे निर्माण झाले, त्यांपैकीं फक्त दोघेच वडील संभाजी व धाकटा शिवाजी हे वर्धमान दशेस पोंचले. बाकीचे लहानपणीं निवर्तले, असें परमानंद कवि निकटवर्ती होता तो सांगतो.

शहाजी–जिजाबाईंचा तो जीवनकाल विशेष धामधुमीचा बनला. महाराष्ट्रांत मुसलमानांचीं लहान राज्यें नांदत होतीं, तर दिल्लीस अकबर, जहांगीर, शहाजहान हे मोगल बादशहा सर्व देशावर एकमुखी सत्ता स्थापीत होते. तत्पूर्वी प्राचीन काळीं अशोक, समुद्रगुप्त, हर्षवर्धन असे पराक्रमी हिंदी सम्राट होऊन गेले, त्यांजप्रमाणें आतां ह्या मोगलांनीं आपली सार्वभौम सत्ता देशावर स्थापण्याचा अट्टाहास चालविला. त्यास राणा संग, राणा प्रतापसिंग अशा कित्येकांनीं सडकून विरोध केला, पण त्यांना त्यांत त्या वेळीं यश आलें नाहीं. पुढें एकट्या शिवाजीनें ह्या मुसलमानी आक्रमणास आळा घातला, म्हणून त्याचें नांव एवढें गाजतें.


हिंदुस्थान देशाच्या मध्यभागीं नर्मदा नदी पूर्वेकडून पश्चिमेस समुद्रास मिळते. तिच्या योगानें ह्या भूमीचे उत्तर व दक्षिण असे दोन स्पष्ट भाग निसर्गानेंच बनविले आहेत. उत्तर भाग बहुधा सपाट असून दक्षिणेंत कोठेंही जा, नद्या, पर्वत, दऱ्या, अरण्यें,



इत्यादिकांमुळें हा प्रदेश हस्तगत करणें कोणासही अवघड जातें. त्यांतून पावसाळ्याचे चार महिने तर सर्व भूभाग पादचारींना सुद्धां दुर्गम होतो. दक्षिणेंत पूर्वी रस्ते नव्हते, त्यामुळें मालाची ने-आण बैल-गोण्यांच्या साहाय्यानें करण्यांत येई. ह्या फरकामुळें उत्तरेंत जसा मुसलमानांचा प्रवेश त्वरित झाला तसा महाराष्ट्रांत होऊं शकला नाहीं. अकबरापासून औरंगजेबापर्यंत सर्व समृद्ध बादशहांनीं प्रयत्नाची शिकस्त केली, पण दक्षिण देश निर्वेध असा त्यांच्या कबजांत कधीं गेला नाहीं. अशा ह्या महाराष्ट्राच्या दुर्गम भूभागांत शिवाजीचें बालपण गेलें. मावळांतील समस्त डोंगराळ प्रदेश शिवाजीनें स्वतः फिरून पाहिला आणि ह्या परिस्थितीचा उपयोग आपल्या कार्यास केला. डोंगरी किल्ले जसे आपणांस जागोजाग महाराष्ट्रांत दिसतात, तसे इतरत्र नसून ते बहुतेक शिवाजीनेंच बनविलेले आहेत. इतिहास-भूगोलाची एकत्र सांगड जमते ती अशी. ह्या सांगडींत शिवाजीचें जीवन कसें बनलें तें आतां पाहूं.

जिजाबाईचा वडील पुत्र संभाजी हळूहळू मोठा होऊन बापाला साहाय्य करूं लागला. परिस्थितीनेंच शहाजी व जिजाबाई ह्यांचें प्रेमबंधन विशेष जमलें नाहीं. राजकारणामुळें त्यांचा सहवास एकत्र असा फार थोडा झाला. उभयतांची भेट सुद्धां क्वचित् काळीं होई. नवऱ्याच्या लष्करी जीवनांत तिला भाग घेतां आला नाहीं, म्हणून कधीं माहेरीं तर कधीं एखाद्या निर्जन किल्ल्यावर असा तिचा काल गेल्यामुळें नवऱ्याची व त्याच्या उद्योगाची बातमी सुद्धां तिला लगोलग कळत नसे. मालोजीराजे दिवंगत झाल्यावर भोसल्यांची जहागीर शहाजीकडे आली. दक्षिणेंत निजामशाही, आदिलशाही व कुत्बशाही हीं तीन राज्यें व शिवाय तो प्रदेश जिंकण्यास आलेल्या मोगल फौजा अशा चार सत्ताधीशांचा धुमाकूळ महाराष्ट्रांत सारखा चालू राहिल्यामुळें, पुष्कळदां आपण जगतों कसे हीच विवंचना शहाजीला अहोरात्र लागलेली असे. भोजन, निद्रा, इत्यादि व्यवसाय सुद्धां जर व्यवस्थित चालायला सवड नाहीं तर बायकोची गोष्ट कशाला? जिजाबाईच्या पहिल्या आयुष्याचीं तीस चाळीस वर्षें अशीं वनवासांत गेलीं. पुढें शिवाजी मोठा होऊं लागला तेव्हां त्यास घेऊन ती पुण्यास राहूं लागली.

महाराष्ट्रांत सह्याद्रीच्या पूर्वउतरणीवर जुन्नरपासून वाईपावेतों जो अवघड डोंगराळ प्रदेश आहे, तोच ह्या भोसले कुटुंबास निजामशाहींतून जहागीर म्हणून मिळालेला होता. शिवाजीचा जन्म जुन्नरला लागून असलेल्या शिवनेरी किल्ल्यावर झाला आणि त्याचें सर्व बालपण ह्या मावळांत हिंडण्यांत गेलें. त्याचा जन्म होण्याच्या अगोदरच अहंमदनगरचें राज्य जिंकण्यासाठीं दिल्लीच्या फौजा चालून आल्या होत्या. त्या कठिण प्रसंगांत मलिकंबर नांवाचा एक सिद्दी जातीचा मुसलमान मुत्सद्दी पंचवीस वर्षेपावेतों निजामशाही राज्याचा कारभारी होता, त्यानें नाना तऱ्हा करून आणि मराठे वगैरे सर्व लोकांस हाताशीं घेऊन त्या राज्याचा बचाव केला आणि मोगलांसारख्या समर्थ शत्रूंस दाद दिली नाहीं.



# जिजाबाईची करुणावस्था

.३.

मलिकंबराची ही कर्तबगारी इतिहासांत गाजलेली असून त्याच्याच हाताखालीं शहाजी भोसले नानाविध राजकारणी व्यवहार शिकला. मलिकंबरानें हिंदु-मुसलमानांस अत्यंत समतेनें वागविलें, परधर्मी म्हणून कडवा द्वेष त्यानें कधीं धारण केला नाहीं. त्यानें वसुलाची पद्धत सुधारून जमिनीचें उत्पन्न वाढविलें. सैन्यें उभारून गनिमी काव्यानें शत्रूस आहारीं आणण्याची युक्ति त्यानेंच प्रथम उपयोगांत आणली. हीं सर्व कसबें शहाजी, दादाजी कोंडदेव, इत्यादींनीं हस्तगत केल्यामुळेंच पुढें शिवाजीला स्वराज्य स्थापन करितां आलें. म्हणून मलिकंबराचा राज्यकारभार हाच मराठ्यांच्या उदयाचा पहिला मुख्य आधार होय. सन १६२४त प्रचंड मोगल फौजांचा मलिकंबर व शहाजी ह्यांनीं फडशा उडविला, तो भातवडीचा संग्राम इतिहासांत गाजलेला आहे. हा संग्राम म्हणजे गनिमी काव्याचा पहिला विजय होय. शहाजीनें ही युद्धपद्धति स्वीकारून दहा वर्षें मोगल बादशहाशीं झगडा केला, त्यामुळेंच मराठ्यांची संघटना बनून त्यांना स्वपराक्रमाची जाणीव उत्पन्न झाली. जिजाबाई हे प्रकार कौतुकानें पहात असून, तिच्या द्वारा त्यांचें बीजारोपण बाळ शिवाजीला प्राप्त झालें.

योगायोग असा कीं, मोगलांशीं चाललेल्या ह्या भीषण झगड्यांत जिजाबाईचे वडील व समस्त जाधवमंडळ मोगलांस सामील झालें आणि शहाजी मोगलांशीं लढत असल्यामुळें मोगल–निजामांचा हा संग्राम म्हणजे एक प्रकारें सासरे-जांवयांचाच उघड सामना असें म्हणण्यास हरकत नाहीं. अर्थात् जिजाबाईच्या मानी स्वभावास या तीव्र झगड्यानें कैक वर्षें इकडे आड आणि तिकडे विहीर असाच प्रकार बनून आला. जाधव–भोसल्यांचें हें वितुष्ट जिजाबाईच्या पूर्वायुष्यास पुरून त्यांतूनच शिवाजीचा उदय झाला. ह्याचा एक परिणाम असा झाला कीं, जिजाबाईला पतिप्रेम कधीं लाभलें नाहीं. ही बाई अपेशी असें समजून शहाजीराजांनीं द्वितीय संबंध मोहित्यांची कन्या तुकाबाई हिच्याशीं केला. इकडे शिवाजीचा जन्म होत असतांच शहाजीराजांना तुकाबाईपासून संतति होऊं लागली आणि ह्या द्वितीय पत्नीच्या अपत्यांवरच त्यांचें सर्व प्रेम खर्च झाल्यामुळें जिजाबाईचें जिणें वनवासासारखें दु:खद बनलें. येणेंकरून कैक वर्षें जिजाबाईला अत्यंत बिकट स्थितींत काढावीं लागलीं आणि बालशिवाजी हाच काय तो तिला जीवनाचा मुख्य आधार वाटूं लागला. शिवाजीच्या जीवनाचे हे लहानपणचे तपशील अभ्यासकांनीं लक्षांत ठेवणें जरूर आहे, म्हणजे त्यांमुळें त्याचा पराक्रम जास्तच खुलून दिसतो.

जिजाबाई कशी झाली तरी बायको माणूस. सासरे-जांवयांचे राजकारणी डावपेंच बाहेर काय चालले आहेत, हें तिला घरीं बसल्या थोडेंच कळणार ! मागाहून कर्णोपकर्णीं जें काय तिच्या कानांवर पडे तेवढ्यावरच तिला समाधान मानून काळ कंठावा लागे. सासऱ्यानें जांवयाचा प्राण घ्यावा व जांवयानें सासऱ्यास कंठस्नान घालावें असे प्रसंग घडूं लागल्यावर तिऱ्हाईत माणसांनीं वागावें तरी कसें ? जिजाबाईची परिस्थिति कल्पनेनेंच ओळखली पाहिजे. नवऱ्याची तिची प्रत्यक्ष भेट सुद्धां फारशी होत नसे; आणि झाली तरी स्पष्ट बोलण्याची उभयतांना चोरी. जिजाबाईला गर्भारपणीं नवऱ्याबरोबर घोड्यावर बसवून पळणें अशक्य झालें असतां सासरा त्याचा पाठलाग करीत आला. त्या प्रसंगांत बायकोला मागें टाकून शहाजीराजे निसटून गेले, अशी कथा प्रचलित आहे, ती सर्वथा त्याज्य असें म्हणवत नाहीं. शहाजीचा पाठलाग करीत मागाहून लुखजी जाधवराव आला. त्याला जिजाबाई जुन्नरजवळ रस्त्यांत आढळली. तिचे सात महिने भरले होते. जाधवराव तिला माहेरीं सिंदखेडास पाठवूं लागला. कसा दुर्धर प्रसंग पहा. आर्य स्त्रीला पतीशिवाय दुसरें दैवत नाहीं, तथापि पति तिला सोडून गेला, तेव्हां ती असहाय बनली. पण मनाची ती एवढी खंबीर कीं, ती बापाबरोबर माहेरीं गेली नाहीं. जवळच शिवनेरीचा किल्ला भोसल्यांच्या जागिरींतला होता तेथें ती बाळंतपणासाठीं गेली आणि तेथेंच पुढें शिवाजीचा जन्म झाला. वडील मुलगा संभाजी आतां मोठा होऊन बापाला साहाय्य करूं लागला होता. बापाला वाटे, ह्या मुलानें आपणाजवळ राहून जीवनाचें शिक्षण घ्यावें; राजकारणें, युद्धें व डावपेंच सर्व त्यानें पाहून घ्यावे. अर्थात् ह्या संभाजीला आईचा लळा लागलाच नाहीं.

तो सदैव बापाबरोबर राहून त्याच्या कामांत वाकब झाला आणि बापाच्या कामांतच त्याला पुढें सन १६५४ त कनकगिरीच्या संग्रामांत तरुणपणीं पस्तिसीच्या वयांत मृत्यु आला. सारांश, ह्या वडील पुत्राचा समागम जिजाबाईस लाभला नाहीं.

एकंदरींत जिजाबाईचें जीवन अत्यंत कष्टमय बनलें. तिचीं तीं संकटें कल्पनेनेंच ओळखलीं पाहिजेत. निजामशाहीचा पुरस्कर्ता मलिकंबर मरण पावल्यावर राज्यांत बजबजपुरी निर्माण झाली. दरम्यान मोगल बादशहा जहांगीर थंडा, मिजास राखणारा होता. तो मरण पावला आणि त्याचा जहाल पुत्र शहाजहान दिल्लीचा बादशहा झाला. त्याबरोबर त्यानें दक्षिण देश जिंकण्याचें पहिलें काम निकरानें हातीं घेतलें, आणि त्यासाठीं प्रचंड फौज व तोफखाना पुढें पाठवून मागाहून आपणही स्वतः येऊन बऱ्हाणपुरास तळ देऊन बसला. त्याच्या फौजा महाराष्ट्रभर संचार करूं लागल्या. पहिली गदा निजामशाहीवर आली, तेव्हां त्या राज्याचा बचाव करण्याचें अवघड काम शहाजीनें धाडसानें अंगावर घेतलें. मलिकंबराचा पुत्र फत्तेखान निजामशाहीचा प्रधान बनला, पण त्याच्या अंगीं बापाचें कर्तृत्व नव्हतें. शिवाय राज्यांतले पराक्रमी सरदार जाधवमंडळी हे शहाजहान बादशहास मिळाले, तेणेंकरून ते निजामशाहीचे शत्रु बनले. त्यांचें पारिपत्य करावें म्हणून निजामशहानें त्यांना दौलताबादच्या किल्ल्यावर भेटीस बोलावून विश्वासघातानें कित्येकांचे खून केले. त्या भीषण प्रसंगांत खुद्द जिजाबाईचे वडील लुखजी जाधवराव, त्यांचे दोघे पुत्र अचलोजी व रघूजी आणि नातू यशवंतराव ह्यांचे खून पडले. तेणेंकरून सर्वच वातावरण तंग झालें. खून झालेल्या पुरुषांच्या स्त्रिया सती गेल्या, त्यांच्या छत्र्या पडक्या स्थितींत सिंदखेडास विद्यमान आहेत. त्या पाहिल्यावर अंतःकरण द्रवल्या-शिवाय राहत नाहीं. ह्या बनावानें शहाजी व जिजाबाई ह्यांची स्थिति कशी नाजूक झाली असेल ह्याची कल्पना करावी. निजामशहाची राजधानी अहंमदनगर हें ठिकाण पूर्वींच अकबरानें हस्तगत केलें असल्यामुळें जुन्नर, दौलताबाद, पेमगिरी ऊर्फ भीमगड अशा अनेक ठिकाणीं सोईप्रमाणें निजामशहाचें वास्तव्य झालें आणि त्याचा बचाव शक्य तितका शहाजीनें केला. ह्या धामधुमींत स्वतः राहण्याचें कायम ठिकाण असें शहाजीला कोठेंच करतां आलें नाहीं. दोघी स्त्रिया भिन्न ठिकाणीं राहत असून तो सवडीप्रमाणें त्यांचा समाचार घेई. त्यांतल्या त्यांत त्याची नजर पुण्यावर होती आणि त्या सोईच्या ठिकाणीं वाडे बांधून तेथें कुटुंबाची निगा कायम ठेवावी असे त्याचे बेत चालू होते, पण ते सिद्धीस नेण्याइतकी निश्चिति त्यास प्राप्त झाली नाहीं.

# धामधुमींतील जन्म

## .४.

मोगल बादशहाच्या समर्थ फौजांपुढें शहाजीनें कित्येक वर्षे निकराचा झगडा केला. पण पुढें दौलताबादचा मुख्य किल्ला मोगलांनीं घेतला, तेव्हां शहाजीचा आधार गेला. बादशहाच्या प्रचंड सामर्थ्यापुढें त्या एकट्याचा निभाव कसा लागावा? शहाजीच्या बायकामुलांना पकडण्याचे प्रयोगही बादशहानें अनेक केले. जिजाबाई व शिवाजी शिवनेरीवर असतां बादशहाचा सरदार म्हालदारखान त्यांस पकडण्यासाठीं आला, तेव्हां त्या धूर्त बाईनें त्यांस पूर्णपणें चकविलें. खानाचा व जिजाबाईचा पूर्व परिचय होता, तो भेटीस येतो आहे असें कळतांच तिनें त्यांतलें इंगित ओळखून बालशिवाजीला एका दासीबरोबर दूर अज्ञात ठिकाणीं रवाना केलें. ह्या युक्तीनें तिनें शिवाजीचा बचाव केला आणि आपण खानाच्या स्वाधीन झाली. खानानें तिला कैदेंत घातलें. पुढें अल्पावकाशांत दंड भरल्यावर तिची सुटका झाली. वर्ष दोन वर्षें शिवाजी मावळांत त्या दासीबरोबर एकान्तांत होता. त्या अज्ञात स्थलाचें नांव पुढें स्वस्थता झाल्यावर जिजाबाईनें शिवापुर असें ठेविलें. ह्या शिवापुरचें नांव शिवाजीच्या बालपणाशीं जडलेलें आहे.

एवंच आठ-दहा वर्षेंपावेतों शहाजीनें स्वतः एकट्याच्या

हिमतीवर शहाजहान बादशहाशीं जो निकराचा झगडा केला तो जरी यशस्वी झाला नाहीं तरी त्यांत बादशहाची सुद्धां खात्री झाली कीं, गनिमी काव्यानें महाराष्ट्राच्या अवघड प्रदेशांत लढणाऱ्या ह्या मराठ्यांस जिंकणें सोपें नाहीं. तेव्हां अंगावर आलेलें युद्ध सामोपचारानें आवरून आपण दिल्लीस परत जावें असा विचार त्यानें केला; आणि मध्यस्थांमार्फत त्यानें शहाजीस कळविलें, "तुम्ही बऱ्या बोलानें शरण येऊन आपला बचाव करावा. आज सात वर्षें तुम्हीं आमचा जो प्रचंड उच्छेद केला त्याबद्दल तुम्हांस ठार मारणेंच योग्य, पण इतउत्तर तुम्ही महाराष्ट्रांत न राहतां बाहेर जाल तर तुमचा निभाव करूं." विजापुरच्या आदिलशहानें शहाजीस आपल्या नोकरींत कर्नाटकच्या कामगिरीवर घेतलें आणि तो पुढें मोगलांविरुद्ध उठणार नाहीं अशी हमी स्वीकारली. शहाजहान बादशहानें ह्या तहाचा करार सोन्याच्या पत्र्यावर कोरून कायम करून दिला आणि दिल्लीस प्रयाण केलें. शहाजीलाही ताबडतोब महाराष्ट्र सोडून विजापुरास जावें लागलें. शहाजीचा स्नेही दादाजी कोंडदेव पारनेरकर म्हणून कर्तबगार व विश्वासू कारभारी होता, त्याच्या संगोपनांत जिजाबाई व शिवाजी ह्यांस त्यानें पुणें येथें ठेवून आपण कर्नाटकांत प्रयाण केलें. अशा रीतीनें कैद किंवा मानहानि न होतां शहाजीनें अंगावर आलेला प्रसंग निभावून नेला, ह्याबद्दल इतिहासांत त्याची वाखाणणी झाली आहे. शहाजहान व शहाजी ह्या दोन पुरुषांनीं युक्तीनें राजकारण खेळून आपापले हेतु साधले हा विषय कवींना सुद्धां कौतुकास्पद बनला आहे. §

ह्यावरून शिवाजीच्या जन्माच्या वेळीं त्याची गृहस्थिति तर अत्यंत बिकट होतीच, पण एकंदर महाराष्ट्रदेशच युद्ध, अस्वस्थता, दुष्काळ अशा आपदांनीं आंतबाहेर पीडलेला होता. शिवाजीच्या मातुःश्रीचें अफाट धैर्य व जागरूकपणा ह्यांमुळेंच त्या भीषण संकटांचें निवारण होऊन शिवाजीला आपला पराक्रम दाखविण्यास क्षेत्र उत्पन्न झालें. जन्मकाळचे ग्रह कसेही असोत, पण त्याला जे भौतिक ग्रह चहूंकडून छळीत होते त्यांचाच त्यानें कसा फायदा करून घेतला हें त्याच्या सर्व जीवनाचें सार दिसून येतें. बापाकडून नवऱ्याचा पाठलाग होत असतां जिजाबाईनें आपला जीव बचावून शिवनेरी किल्ला गांठला. तेथें बाळंतपणाची कांहीं एक सोय नव्हती. हाताखालीं माणसें नव्हतीं, गांठीं द्रव्य नव्हतें. ओसाड किल्ल्यावर एकटी येऊन पडली. तिचा आधार म्हणून एकच, त्या किल्ल्यावरील शिवाई देवी. त्या देवीला ती सर्वस्वीं शरण गेली आणि देवीनें तिची करुण हाक ऐकली. चहूंकडून आकाश कोसळलें तरी ती कधीं डगमगली नाहीं. आपण सद्भावानें वागलों तर देव आपल्याला साहाय्य करतो असा विश्वास पुत्रजन्मानें तिला प्राप्त झाला. 'मी आतां पुत्रवती आहें ना!' अशी उमेद येऊन त्याचें पालनपोषण हेंच इतउत्तर तिचें मुख्य कर्तव्य बनलें. मुलासाठीं तरी आतां

§ पहा—जयराम पिंडयेकृत राधामाधवविलासचंपू, ११-१०, पृ. २५०.

आपल्याला जगलें पाहिजे, ह्या पुत्राच्या द्वारा आपण उभय कुळांचा उद्धार करूं अशी ईर्ष्या तिला उत्पन्न झाली. आपला उद्धार म्हणजे पतित महाराष्ट्राचा उत्कर्ष असे संकल्प तिच्या अंतःकरणांत खेळूं लागले.

ह्या शिवाजीचा जन्म कधीं झाला ह्याजबद्दल वाद आहे. पण ह्या वादानेंच त्याच्या चरित्राला नवीन उजाळा दिला आहे. वैशाख शुद्ध द्वितीया शक १५४९, गुरुवार ता. ६ एप्रिल, सन १६२७ ही त्याची जन्मतिथि दोन-तीनशें वर्षे प्रचलित होती. अलीकडे जेधे शकावली नांवाची एक अत्यंत विश्वसनीय स्मरणवही उपलब्ध झाली, तींत फाल्गुन वद्य ३ शुक्रवार, शक १५५१ म्हणजे ता. १९ फेब्रुवारी, सन १६३० ही शिवाजीची जन्मवेळा नमूद आहे आणि दोन्ही मित्या पहिली जुनी व दुसरी नवी ह्या उल्लेखानें हल्लीं देशांत प्रचलित आहेत. दोहोंमध्यें ३४॥ महिन्यांचें अंतर पडतें. तरी त्यामुळें इतिहासास वैगुण्य येत नाहीं. जन्मटिपण ज्या त्या वेळीं बनविलेलें उपलब्ध नाहीं. कदाचित् त्या वेळीं जिजाबाईजवळ कोणी तसा चाणाक्ष लेखकही नसेल, किंवा मातेच्या दीर्घ हयातींत बनलेले सरकारी कागदपत्र नष्ट झाले असावे. औरंगजेबानें रायगड राजधानी हस्तगत केली तेव्हां तेथील शिवाजीचें सरकारी दप्तर नाश पावलें ह्यांत संशय नाहीं. कांहीं असलें तरी शिवाजीच्या जन्मप्रसंगीं शहाजीराजांचें मोगलांशीं युद्ध चाललेलें असून सन १६३६ त तो त्या पेचांतून मुक्त होऊन विजापुरास निघून गेला, त्या वेळीं त्यानें जिजाबाई व शिवाजी ह्यांस पुणें येथें ठेवून दिलें आणि त्यांच्या व्यवस्थेसाठीं दादाजी कोंडदेव ह्याची नेमणूक केली. हा समय म्हणजे सन १६३६ चा दसरा होय. त्या दिवशीं तारीख २९ सेप्टेंबर होती. शिवाजीच्या जीवनांतील पहिला महत्त्वाचा प्रसंग हाच असून त्या वेळीं त्याचें वय सात-आठ वर्षांचें होतें. अर्थात् ह्यापुढील शिवाजीच्या हालचालींत शहाजीचा संबंध सुटला आणि जिजाबाई व दादाजी हीं दोघेंच त्याला मार्गदर्शी झालीं.



# आरंभींचीं स्थलांतरें

५.

शिवाजीच्या आयुष्याचीं पहिलीं सात-आठ वर्षें जिजाबाईला अत्यंत त्रासाचीं गेलीं. तत्पूर्वींचे तिचे चार पुत्र अल्पायुषी झाल्यानें हा तरी जगतो कीं नाहीं ही तिची पहिली विवंचना. नवऱ्याचें युद्ध बादशहाशीं चालू असल्यामुळें शत्रु तिला व मुलाला केव्हां पकडतील ही दुसरी भीति. त्यासाठीं तिनें बालशिवाजीला कांहीं काळ अज्ञात जागीं लपवून ठेविलें. बाहेरच्या घडामोडींवर तिला सारखें लक्ष ठेवावें लागे. दुसरा संबंध केल्यापासून शहाजीराजांचें लक्ष ह्या परित्यक्त जिजाबाईकडे फारसें नव्हतेंच, म्हणून त्याच्या हालचालींवर नजर ठेवण्याची दक्षता तिला सारखी बाळगावी लागली. सवतीमत्सर असा तिनें कधीं दिसूं दिला नाहीं कीं नवऱ्याला यत्किंचित् दुखविलें नाहीं. उलट तुमचें सुख तें माझेंही, असा प्रेमभाव ती त्याला साक्षेपानें दाखवी. ह्यास्तव त्यालाही तिच्या कर्तृत्वाचा आदर वाटून आरंभींची तेढ उत्तरोत्तर मिटत गेली. सवतीला मुलें झालीं त्या प्रसंगानें तुकाबाईचें कौतुक करून जिजाबाईनें विचारपूस ठेविली; सणावारीं अहेरपोषाख साक्षेपानें पाठवून तिनें आपला फाटलेला संसार सुधारून घेतला. शिवाजीच्या संगोपनांत ती सदैव गढलेली असून, होऊन गेलेल्या पूर्वींच्या

कष्टप्रद आठवणी तिला परस्पर गोड वाटूं लागल्या. तिचें मुख्य धोरण मनुष्य जोडण्याचें, तेंच पुढें शिवाजीनें आपल्या राष्ट्रोद्धाराच्या उद्योगांत स्वीकारलें. माहेरच्या मंडळींची वाताहत झालेली तिनें शक्य तितकी दूर करून त्यांचा परामर्ष ठेविला. माहेर व सासर म्हणजे जाधव व भोसले, दोनही घराणीं विस्तृत होतीं, त्यांच्याशीं तिनें प्रेमभाव जमविल्यामुळें मनुष्यबळ तिला कधीं उणें पडलें नाहीं.

महाराष्ट्रांत निरखून पाहिल्यास जिजाबाई-शिवाजीच्या ह्या पहिल्या कष्टकालाच्या स्मृति जागोजाग दिसतात. अलीकडे पुण्यांत शिवाजीनगर, संभाजीपार्क वगैरे नांवें प्रचारांत येत आहेत, त्याप्रमाणें पूर्वींही अशींच कित्येक नांवें शिवापुर, शहाबाग, शिवापट्टण, संभापुर, जिजापुर § वगैरे निर्माण झालेलीं कांहीं टिकलीं व कांहीं कालौघांत गडप होऊन गेलीं, त्यांचा मागमूस उरला नाहीं. शिवाजीच्या जन्मकाळीं बादशहाचें व शहाजीराजाचें सहा-सात वर्षें युद्ध चालू होतें, त्या समयांत पुण्यावर गाढवाचा नांगर फिरला आणि वडिलार्जित जागीर उध्वस्त झाली, ती टिकविणें व आपला जीव सांभाळणें हें शहाजीचें प्रधान कर्तव्य बनलें. जागिरीचा मध्यबिंदु पुणें व पुण्याचा संरक्षक किल्ला कोंडाणा व त्यापुढील मावळचा प्रदेश आदिलशाही राज्याचा पश्चिम कोंपरा. ह्या प्रदेशाचा कारभार पाहाणारा मुख्य अधिकारी दादाजी कोंडदेव म्हणून होता, त्याचा सरकारी हुद्दा "नामजाद किल्ले कोंडाणा व महालानिहाय प्रांत पुणें" असा होता. ह्याचा अर्थ कोंडाणा किल्ला व त्याखालीं मोडणारा प्रदेश ह्यांचा अंमलदार. हा दादाजी विजापुरी राज्याचा सेवक. कोंडाणा हें नांव पुढें बदलून सिंहगड ठेवण्यांत आलें. दादाजी कोंडदेव हा देशस्थ ब्राह्मण, उपनांव गोचिवडे असून पारनेरकर, मलठणकर अशींही त्याचीं नांवें आढळतात. तो बहुत काळ मावळांत वागलेला असल्यामुळें त्यांतील देशमुख वगैरे प्रमुख लोकांची व त्यांच्या व्यवहारांची दादाजीला भरपूर माहिती होती. बहुधा त्यानें मलिकंबराची शिस्त पाहिलेली असावी. मुख्यत: बादशहाशीं संग्राम करण्यांत शहाजीला ह्या दादाजीची भारी मदत झाली. पुढें कर्नाटकांत जातांना त्यानें आपल्या जहागिरीचा बंदोबस्त व कुटुंबाचा सांभाळ दादाजीला सोंपला. स्नेहाखातर ही जबाबदारी दादाजीनें पत्करली आणि तो अत्यंत कर्तव्यतत्पर, न्यायनिष्ठुर व व्यवहारज्ञ असल्यामुळें शिवाजीच्या संगोपनांत व प्राथमिक तयारींत दादाजीचा मोठा उपयोग शहाजीला झाला.

पुण्याहून साताऱ्याकडे जातांना वाटेंत १८ मैलांवर भोरच्या अलीकडे शिवापुर नांवाचें गांव लागतें, त्याला खेडशिवापुर असें जोडनांव प्रचारांत आहे. दोनही गांवें जवळजवळ आहेत. शिवाजीला मोगलांनीं पकडूं नये म्हणून लहानपणीं जिजाबाईनें त्याला गुप्त जागीं कांहीं काळ लपवून ठेविलें तें बहुधा ह्या शिवापुरांतच असावें. कारण तेथें भोसल्यांच्या मालकीची खासगी

§ पहा : ऐ. सं. सा. १, ले. ३०, पृ. ११७ जोशी ह्यांचा लेख शिवाजीचें बालपण ; व शि. च.सा. १, पृ.४६ व ४९, दादाजी कोंडदेव.

जमीन होती, तींत जिजाबाई व दादाजी ह्यांनीं आंब्यांची बाग लाविली, तिला शहाबाग हें नांव चालतें, तें शहाजीचें स्मारक असावें. ह्या बागेंतले आंबे पुण्याच्या बाजारांत अद्यापि विक्रीस येतात व ते उत्तम गणले जातात. सन १६३७ च्या आंत-बाहेर पुण्याचा वाडा तयार झाल्यावर त्यांत जिजाबाईनें शिवापुराहून शिवाजीस आणिलें असा ह्या शिवाजीच्या बालपणाशीं शिवापूरचा संबंध आहे. पुण्यास वास्तव्य झाल्यावर आणखी नवीन स्थलें निर्माण झालीं. पाषाणजवळ संभापूर हें गांव होतें, तें जिजाबाईनें वडील पुत्राच्या नांवानें बनविलें. शेंपन्नास वर्षें तें हयात होतें. सन १७१५ त तें दमाजी थोरातानें उच्छिन्न केलें, तें पुनः उठलें नाहीं. त्याच्याचजवळ जिजापूर म्हणून एक गांव नवीन वसविलें तें शिवाजीनें मोरयाच्या पूजेसाठीं ठकार उपाध्ये ह्यांस इनाम दिलें तेंही लुप्त झालें.*

शिवाजीचीं लहानपणचीं स्थलांतरें संदर्भासाठीं येथें सर्व एकत्रच सांगणें युक्त वाटलें. बंदोबस्ताच्या दृष्टीनें पुण्याचें वास्तव्य सोईचें ठरलें नाहीं. स्वराज्याच्या उभारणींत बचावासाठीं दुसऱ्या पहाडी स्थलाची जरूर उत्पन्न झाली तेव्हां दादाजी व जिजाबाई ह्यांनीं सिंहगडाचा आश्रय केला, त्यावरून कलह उद्भवला तो पुढें सांगण्यांत येईल. सिंहगडही गैर उपयोगाचा ठरला तेव्हां दुसरी हक्काची जागा हाताशीं असावी म्हणून त्यांनीं तोरणा किल्ला कबजांत घेतला. तेथें अवचित द्रव्य सांपडलें हाच शुभशकुन मानून तेथें व्यवस्था लावणार, तों अनेक अडचणी नजरेस येऊन तोरण्यावर राहण्याच्या व कारभाराच्या सोई हव्या तशा मिळेनात. सबब त्याच्याहीपुढें शोध करतां पलीकडे मुरूम देवाचा डोंगर म्हणून उंच खडकाळ सुळका होता तोच पसंत करून त्यावर सोईच्या इमारती बांधण्यांत आल्या. त्या बांधतांना तळाशीं मुक्काम झाला त्याचें नांव शिवापट्टण ठेवलें आणि वर गड बनला त्याचें नांव राज्य सिद्ध झाल्यावर राजगड असें ठेवलें. राजगडाहून पुढें वीस एक वर्षांनीं रायगड राजधानी बनली तो कथाभाग पुढचा आहे.



---

* शि. च. सा. ५–३ पृ. ५९.

# बालपणची तळमळ

## ६

शिवाजीचा जन्म जुन्नरजवळच्या शिवनेरीवर झाला. तें भोसल्यांच्या जहागिरीचें उत्तर टोंक. तेथपासून दक्षिणेकडे वाईपावेतों सह्याद्रीच्या अवघड मावळ प्रदेशांत त्याचा संचार होऊन ओळख पटत गेली, आणि त्याचें पहिलें जीवन एक प्रकारचें वन्य बनलें. ह्या जंगली निसर्गरम्य प्रदेशांत भटकत राहणें हाच त्याला लहानपणीं मुख्य नाद लागला. त्या वेळीं ह्या प्रदेशाची स्थिति काय होती, तें सांगणारे शेकडों कागद आतां प्रसिद्ध झाले असून त्यांवरून शिवाजीच्या बालपणाची कल्पना येते. दादाजी व जिजाबाई ह्यांना निदान निर्वाहाच्या खर्चासाठीं तरी जहागिरीचा हा भाग सुधारून त्याचें उत्पन्न वाढविणें भाग पडलें. चहूंकडे बेबंदशाही माजली होती ती मोडून बंदोबस्त व न्याय व्यवस्थेशीर चालावा ही पहिली गोष्ट त्यांनीं आरंभिली. गांवकामगार नेमून शिबंदी ठेविली, लागवड सुधारून पैदास करण्याचे उपाय योजिले, लोकांस उत्तेजन देऊन त्यांस शांततेच्या उद्योगांस प्रवृत्त केलें. त्यासाठीं प्रथम त्यांनीं आपलें पुण्याचें वास्तव्य नीट बनविलें. तेथें लहानसा वाडा बांधला तो लालबाग ह्या नांवानें पुष्कळ दिवस प्रसिद्ध होता. हल्लीं त्या जागेला जिजामाताबाग हें नांव देण्यांत आलें आहे.

शिवाजी अज्ञातवासांतून प्रथम ह्या वाड्यांत राहण्यास आला तेव्हां कामांची व माणसांची चहूंकडे धांदल व धावपळ चाललेली त्याच्या नजरेस आली आणि त्यानें मातेस् प्रश्न केला, "मासाहेब, ही सर्वांची धांदल कसली चालली आहे ? तुम्ही चिंताग्रस्त व व्यग्र दिसतां, मला सांगा कीं कांहीं काम, लहान असलों तरी मी तुम्हांस थोडाबहुत हातभार लावूं शकेन." मुलाचे हे धीराचे उद्गार ऐकून जिजाबाईला मोठें कौतुक व धन्यता वाटली. तिनें दादाजीला सांगितलें, मुलगा विचारतो त्याचें उत्तर तुम्हीच काय तें सांगा. एव्हांपासून त्याला आपल्या सर्व गोष्टी माहीत असलेल्या बऱ्या. आपण कोण, आज आपली दशा काय आहे, पुढें निभाव कसा करायचा, हें ह्या मुलास नीट माहीत असणें अवश्य होय. शहाजीराजांनीं तुमच्याच हातीं ह्या मुलास सोपलें आहे.

ह्यावरून दादाजीनें शिवाजीस बाजूला घेऊन गेल्या पांच चार वर्षांतील घडामोडींची माहिती त्याला बरोबर करून दिली. दादाजी बोलला त्याचा तात्पर्यार्थ हा :

"राजे, तुम्ही लहान आहां. तुम्हांला आजची आपली परिस्थिति माहीत नाहीं. त्या शूर शहाजीराजांचे तुम्ही पुत्र. आज ते प्राण वांचविण्यासाठीं परमुलखांत निघून गेले. तुम्ही आम्ही सर्वथा वनवासांत आहों. नुसती निजण्याबसण्यास सुद्धां सत्तेची जागा नाहीं. आज सात वर्षें त्या मोगल बादशहानें आपणांस सतावून सोडलें. त्याच्या महान् शक्तीपुढें शहाजीराजांचा निभाव लागणें शक्यच नव्हतें. सहीसलामत सुटले हेंच भाग्य. आज पंधरा वर्षें मी शहाजीमहाराजांची सेवा करीत असून आपला भावी उदय तुमच्या कर्तृत्वावर अवलंबून आहे. हा माझा देह त्यांच्याच आश्रयाखालीं वाढलेला आहे. पुण्याची ही वडिलार्जित जहागीर सर्वथा विच्छिन्न झालेली असून ती नीट सुधारली तरच आपणांस जगतां येईल. आज कैक वर्षें संकटें कशीं हात धुऊन पाठीस लागलीं. मुसलमानांनीं तर सर्वत्र कहर उसळून दिला आहे. जाधवरावांसारख्या पराक्रमी सरदारांस भेटीस बोलावून कपटानें ठार मारलें. शहाजीराजांची मातुःश्री दीपाबाई निंबाळकरांकडली. तिचे बंधु बजाजी निंबाळकर फलटणची जहागीर सांभाळून असतां, त्यांना विजापूरच्या शहानें भेटीस बोलावलें आणि तेथें नाहक छळ करून त्यांस मुसलमानी दीक्षा दिली. आज ते विजापुरास परधर्मी संसार थाटून निभाव करतात. केवढें हें आपल्या धर्माचें विडंबन ! देवाची कृपा कीं तुमच्या मातुःश्रींवर असा प्रसंग आला नाहीं."

असा हा मागील वृत्तान्त ऐकून शिवाजी राजा मुग्धच बनला, मनांत जळफळाट उत्पन्न झाला, त्यायोगें भावी उद्योगाची अंधुक लाट अंतःकरणांत खळबळूं लागली. इतउत्तर त्याचे विचार भिन्न रूप धारण करूं लागले. हें जीवन सर्वथा राष्ट्रोद्धारास द्यावयाचें हा पहिला संकल्प मनांत उद्भवला आणि पुढें सर्वदा तोच नाद त्यानें अखेरपर्यंत पाळला.

ह्या उद्योगाचें पहिलें अंग जहागीर सुधारणें, नंतर आपल्या राष्ट्राची संघटना करणें आणि हळुहळू मुसलमानी अत्याचारांना आळा घालणें. हीं नानाविध कामें त्यानें कशीं सुरू केलीं आणि ह्यासाठीं प्रथम त्यानें आपलीच स्वतःची तयारी कशी बनविली तें सांगितलें पाहिजे.

शिवाजीच्या जहागिरींत बारा मावळें जुन्नराखालीं व बारा पुण्याखालीं असून त्या अवघड प्रदेशावर मुसलमानांचा अंमल पूर्ण असा बनला नव्हता. मावळ म्हणजे दोन डोंगरांतलें खोरें, मध्यें वाहाणारी एक लहानशी नदी. प्रत्येक मावळावर एक देशमुख व याचा हिशेब ठेवणारा एक कारकून देशपांडे असे दोन अधिकारी असत. ज्या शिवापुरांत शिवाजी कांहीं काळ अज्ञात-वासांत राहिला तें तरी एक मावळच. ह्या जुन्नरपासून वाईपर्यंतच्या सुमारें शेंदीडशें मैल लांब व तीस एक मैल रुंद प्रदेशांत शिवाजीचीं बालपणचीं सात आठ वर्षें गेलीं. एवढ्या अवधींत हा सर्व प्रदेश त्यानें स्वतः हिंडून पाहिला, तेथील लोकांची पारख केली, त्यांचे रीतरिवाज समजून घेतले आणि त्या अनुभवावर पुढील उद्योगाची उभारणी केली. हा प्रदेश पुण्याच्या मावळती-कडचा म्हणून त्यास मावळ ही संज्ञा मिळून त्यांतल्या लोकांस मावळे नांव प्रचलित झालें. मावळे म्हणजे सर्व अठरापगड जातींचे लोक. देशमुख, देशपांडे व शेतीभाती करणारे समस्त रयत. डोंगराळ प्रदेशांत ते वाढल्यामुळें अवघड जागीं चढणें व साहसाचीं कामें करणें त्यांच्या पूर्ण अंगवळणीं पडलें. एका मार्मिक निरीक्षकानें शिवाजीच्या ह्या वेळच्या उद्योगाचें वर्णन पुढीलप्रमाणें केलेलें आढळतें. शिवाजीची लायकी तेव्हां प्रगट झालेली नव्हती आणि हा भलताच एखादा उपद्व्याप करून बसेल अशा समजुतीनें लोकांनीं पृच्छा केली तिला हें उत्तर आहे. तो त्याचा परिचित म्हणतो :

“ आज आठ वर्षें मी ह्या शिवाजीचा व्यवसाय बारकाईनें पहात आहें. हद्द आहे त्याच्या अकलेची व तपासाची. सारखा रानावनांतून अहोरात्र गांवोगांव भटकत फिरतो. ऊन, पाऊस, भूक, तहान कशाची पर्वा म्हणून नाहीं. वाटेल त्या झोपडींत जाऊन मिळेल तो तुकडा मागून खाईल, तिथेंच रात्र काढील, लोकांशीं मिसळून सारखी विचारपूस करील, त्यांची समजूत घालील, चोऱ्यामाऱ्या,



धर्माधर्म, आचारविचार सर्व कांहीं लोकांचें काढून घेईल. अशा भटकण्यांत किती काळ गेला ह्याचें जणूं काय भानच नाहीं. महिने-महाल बाहेर फिरत राहायचा. आई बिचारी घरीं सारखी चिंताक्रान्त असायची कीं हा कोठें आहे, काय करतो, खुशाल परत येतो कीं नाहीं ? परत येऊन समक्ष भेटींत तो आपले अनुभव व बेत मातु:श्रीला सांगूं लागला, कीं तिला त्याचें भारी कौतुक वाटावें. मुसलमान अंमलदार येऊन कोणास कसे लुबाडतात, बाटवतात, मंदिरें फोडतात, लुटतात, बायका पळवून नेतात, न्यायअन्याय पाहात नाहींत; अंधेरनगरीचा सर्व कारभार तो स्वत: पाहून घेतो. लोकांना धीर देतो कीं, तुम्ही हा जाच कां सहन करतां, जेव्हांच्या तेव्हां त्यांस ठोकून कां नाहीं काढीत ? असें बोलतांना स्वत: त्यानें अनेक लहानमोठीं माणसें जवळ जमविलीं आहेत. माणसांची खरी परीक्षा करावी त्यानेंच. स्वत: चिखलांत, पावसांत कष्ट करतो, नदीनाले पोहून धाडसानें कामें अंगावर घेतो. कुस्ती करतो, घोड्यावर बसतो, भाला तलवार खेळतो, भीति म्हणजे काय हें त्याच्या गांवीं नाहीं. रात्र म्हणूं नको, अंधार म्हणूं नको, सारखा स्वत:चा प्रयोग चाललेला असतो. वाटेल त्या सोंगाची बतावणी करण्यांत मोठा पटाईत. बहुरुप्याचीं सोंगें घेऊन बाहेरची बातमी मिळविण्याचें त्याचें कसब अप्रतिम आहे. वाणी तर इतकी मोहक कीं एकदां मनुष्य भेटला कीं पुरे, तो त्याच्या भजनीं लागलाच. सदा चौकशी चालायची कीं, कोणी साधुसंत, अलौकिक व्यक्ति किंवा हुन्नरी माणूस भेटतो का ? आणि तसा कोणी भेटला तर तासन्तास बसून त्याचें सामर्थ्य तपासून पाहील. ते देहूचे प्रसिद्ध तुकारामबावा नाहींत का त्यांचें कीर्तन असलें कीं, त्यांत भूकतहान विसरून तो रमेल. जेथें जातो तेथें सोबती जमवतो, लढाईच्या व पराक्रमाच्या गोष्टी बोलतो. चपळाईची तर गोष्ट विचारूं नये, आज येथें तर उद्यां पलीकडे पन्नास मैलांवर. सारखा हा फिरण्याचा छंद, समोर ब्र काढण्याची छाती नाहीं कोणाला व्हायची, कोणतें म्हणून कसब दिसलें कीं त्यानें उचललेंच. पशुपक्ष्यांच्या आवाजांची नक्कल इतकी बेमालूम करतो कीं ऐकणारे सहज फसून जातात. अडचण, संकट हें कधीं त्याच्या गांवीं नाहीं. मोठें युक्तिबाज डोकें. मावळांतले बहुतेक लहानमोठे देशमुख केवळ त्याच्या भजनीं आहेत. ”



अशा ह्या मुलाला जिजाबाईसारखी चाणाक्ष माता व दादाजी कोंडदेवासारखा नि:स्पृह मार्गदर्शक लाभला हें महाराष्ट्राचें भाग्य समजलें पाहिजे. मुलाच्या ह्या छंदाला त्यांनीं कधीं मोडता घातला नाहीं, त्याचें सर्व ऐकून त्याला उत्तेजन दिलें, सुचेल तें बरें वाईट दाखविलें आणि जरूर ते इशारे त्याच्या नजरेस आणिले. असें होतां होतां त्याचे अनुयायी पांचपन्नासांपासून हजारोंपर्यंत जमत गेले. हरप्रकारच्या गुन्ह्यांत पटाईत असलेले लोक देखील त्याचे अनुयायी बनून आपल्या कौशल्याचा उपयोग सत्कारणीं करूं लागले. मुसलमानांचे स्थानिक अंमलदार कोण कोठें आहेत, ते वागतात कसे, किल्ले वगैरेंवर त्यांची शिबंदी किती आहे, आपण अचानक हल्ला केला तर त्यांचें सामर्थ्य किती टिकेल ह्याचा अंदाज बांधण्यांत आला. देवळें, मंदिरें, सण, उत्सव, जत्रा, बाजार, मेळे अशा नानाविध प्रसंगांत शिवाजी व त्याचे सोबती ह्यांनीं बाह्यत: सामील होऊन मावळच्या अंत:स्थितीची भरपूर तपासणी केली. अश्वारोहण, निशाणबाजी, कुस्त्या, कसरत, शिकार हे व्यवसाय शिकून त्यांनीं आपली संघटना बनविली. तमाशे, डोंबारी, गारुडी, मांत्रिक, अशा हुन्नरी माणसांतही ते सामील झाले. सण, उत्सव लग्नादि समारंभांत चोऱ्यामाऱ्या, अचानक हल्ले होत, त्यांच्या बातम्या आगाऊ ठेवून त्यांवर उपाययोजना केली. लावण्या-पोवाडे ऐकण्याची शिवाजीला भारी आवड. सर्वांचें हृद्गत ओळखून एखाद्या सोंगाची बतावणी ताबडतोब करण्यांत तो व त्याचे सोबती निष्णात बनले. संघटनेनें आपण मुसलमानांना कसा आळा घालावा हा सर्वांचा विचार. स्वराज्याची कल्पना दृष्टिपथांत डोकावूं लागली.

# बालराजाची मिरवणूक

## ७

कैक वर्षे जम बसलेल्या बलवान् राज्यांस मूठभर अडाणी तरुणांनीं आळा घालणें हें काम अवघडच होतें. त्यांतून शहाजीराजे विजापूरचे एकनिष्ठ सेवक, जिजाबाई तर बायको माणूस, आणि दादाजी सुद्धां चाकरी करणारा विजापूरचा सेवक, अशा स्थितींत बालशिवाजीनें उघड चर्चा करून दादाजीला अनुकूल करून घेतलें. पुणें-विजापूरच्या टापूंत दादाजीची मान्यता सर्वत्र महशूर होती. त्यानें प्रथम मुसलमानांना आपल्या उद्योगाचा संशय बिलकूल येऊं दिला नाहीं. मावळ प्रदेश दरिद्री, मागासलेला. शेती, उद्योग इत्यादींची सुधारणा करून लोकांचें दैन्य वारावें, प्रांतांत बंदोबस्त ठेवून लोकजीवन निर्धास्त करावें, म्हणजे एक प्रकारची आपण मुसलमानी सत्तेला बळकटीच आणतों अशी भाषा प्रसृत केली आणि त्या दिशेनें हा पहिला उद्योग एकमतानें चालू झाला.

दादाजीच्या शब्दाला लोकांत भारी किंमत होती. तो बालशिवाजीला बरोबर घेऊन गांवोगांव दौरे काढूं लागला. पंचायती भरवाव्या, न्यायनिवाडे करावे, तलावविहिरींनीं पाण्याची सोय करावी, लोकांचीं गाऱ्हाणीं ऐकावीं असा हा उघड उद्योग दादाजीनें चालू केला. बालशिवाजीला चांगला पोषाख चढवून

त्यास सभेंत धन्याचे जागीं बसवावें. डोईवर पागोटें, त्यांतून हवेंत उडणारा तुरा, कमरेस तलवार, हातांत भाला, अशी ही बालकृष्ण मूर्ति सभेंत उच्चासनीं बसली कीं, लोकांना वाटूं लागलें, देवानेंच आपणांला हा नवीन मालक करून दिला आहे. दादाजी सभेंत भाषण करून सांगत, "हे आतां तुमचे स्वामी, तुम्हीं ह्यांच्या आज्ञेंत वागलें पाहिजे, तुम्ही वेडेवांकडे चालाल तर हे शासन करतील, नीट वागाल तर कोटकल्याणही करतील." अशा रीतीनें त्या मावळ देशांत नवचैतन्य उत्पन्न झालें. शेकडों वर्षांच्या गुलामगिरींत हताश बनलेल्या लोकांस नवीन उत्साह चढला. अल्पावकाशांत लोक बोलूं लागले, आमचा स्वतःचा राजा आला. ते त्याच्या पायां पडूं लागले. त्याचे उद्गार सन्मानानें झेलूं लागले. मधमाशांच्या पोळ्यासारखा देश घुमून पुढील काम मागूं लागला.

दोन तीन वर्षांच्या अवधींत हें नवीन वारें उघड दृष्टीस येऊं लागलें. प्रांताचा वसूल जमा होऊं लागला. गांवरक्षक नेमल्यामुळें लोकांचे उद्योग निर्वेध चालू झाले. कोल्हे, डुकरें, ससे, वगैरे प्राणी शेतांची नासाडी करीत, त्यांचा बंदोबस्त होऊन शेतीचें उत्पन्न वाढलें. दादाजीनें एकंदर जहागिरीचे हिशेब सालोसाल शहाजीराजांकडे रुजू करावे, आपला खर्च त्यांस दाखवावा, त्यांच्या आज्ञेनें व्यवहार चालावे अशी शिस्त चालू केली. जिजाबाई व शिवाजी ह्यांची दिवसेंदिवस सुस्थिति बनत चालली आहे, हें वर्तमान ऐकून शहाजीराजे संतुष्ट झाले. जिजाबाई सुद्धां स्वतः मजालसी भरवून न्यायनिवाडे करी. तिनें केलेले निकाल हल्लीं उपलब्ध आहेत.


बाहेरचा हा पसारा चालू असतांच खुद्द पुण्याच्या राहत्या वाड्यांत धर्माचें व नीतीचें शिक्षण शिवाजीला देण्याची सोय जिजाबाईनें केली. मुद्दाम पुराणिक नेमून रामायण व महाभारत ह्या ग्रंथांचें व धर्मपरंपरेचें श्रवण शिवाजीला घडविलें. पंतोजी नेमून त्यास लिहिणेंवाचणें व हिशेब हे विषय शिकविले. राहत्या वाड्यांत सवडीनुसार कथा-भजनाचे प्रसंग करवून बाहेर जवळच लोहगांवास तुकारामबावांचीं कीर्तनें होत तेथेंही शिवाजी आवडीनें जाऊं लागला. आई म्हणजे परमदैवत. तिचा संतोष हाच जीवनांतला मुख्य आनंद अशी शिवाजीची भावना बनत गेली. कोठें फिरतीवर जाऊं लागला कीं मातेला नमन करून निघावें.



तिचा प्रेमाशीर्वाद आपल्या पाठीशीं सतत उभा असला, कीं यश ठेवलेलें ही त्याची मनोरचना बनून गेली. परत येऊन तो आपलीं एकएक साहसाचीं कृत्यें आईला सांगूं लागला, कीं तिला ब्रह्मानंदाचें सुख वाटे. आकाश ठेंगणें बने.

सह्याद्रीच्या आसमंतांतील ह्या मावळ प्रदेशांत पायीं, घोड्यावरून फिरून लहानमोठे किल्ले, चोरवाटा, घाट, बंदोबस्त-इत्यादि सर्व स्वत: शिवाजीनें पाहून घेतलें. किल्ल्यांवरचे रखवाल-दार आपलीं कामें कशीं करतात, कोण व्यसनी किंवा गाफील आहेत, हें शिवाजीनें प्रत्यक्ष समजून घेतलें. ठिकठिकाणीं मुसलमानांचे अत्याचार त्याच्या नजरेस आले. हिंदूंचीं मंदिरें व सावकारांचीं घरें लुटून मुसलमान अधिकाऱ्यांनीं नेलेलीं त्याच्या नजरेस आलीं. हें पाहून त्याच्या अंगांत संताप चढून तो आपल्या सोबत्यांशीं त्याची चिकित्सा करी. वाटाघाटींत उपाय सुचत त्यांची योजना ते सदैव विचारपूर्वक ठरवीत. आपणही मुसलमानांसारखेच माणूस आहों, आपणांसही शक्ति आहे, उद्योग केल्यास आपणही त्यांचा प्रतिकार बरोबर करूं अशी ह्या मंडळीची तयारी बनत गेली.

अनुभवानें मनुष्य शहाणा होतो. जरूर लागली कीं उपाय सुचतो. सुरुवातीसच कांहीं सर्व प्रयोग परिपूर्ण नव्हता. मुला-मुलींचे खेळ चालू होऊन त्यांतून पुढें संसाराची उभारणी होते, तसाच कांहींसा प्रकार शिवाजीचा होत गेला. बाप जवळ नाहीं हा एक फायदाच म्हटला पाहिजे. त्यामुळें जहागिरीचा उद्योग एकतंत्री चालून भलतेच फांटे फुटले नाहींत. लोकांची संघटना होऊन त्यापासून पुढें आपणांस धोका आहे ही कल्पनाच प्रथम बाहेर कोणास झाली नाहीं, मग खुद्द आदिलशहास झाली नाहीं तर नवल काय! त्यांतून आदिलशहाची सर्व भिस्त काय ती त्याचा सुभेदार दादाजी ह्याजवर. तोच ह्या चळवळींत सामील झाल्यामुळें बाहेर बभ्रा झाला नाहीं. तथापि दुसरा स्फोट झाला तो आतां सांगूं.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

८

# शहाजीराजांचा स्वधर्मद्रोह


शहाजीराजांचा पराक्रम प्रथम निजामशाहींत प्रगट झाला. तें राज्य मोगलांच्या कब्रजांत गेल्यावर त्यानें विजापुरच्या आदिलशहाची नोकरी पत्करिली. आदिलशहानें त्याला कर्नाटकचा प्रदेश जिंकण्याच्या कामावर पाठविलें. इब्राहीम आदिलशहा म्हणून विजापुरचा लौकिकवान् सुलतान सन १६२७त, म्हणजे शिवाजीचा जन्म झाला त्या सुमारास मरण पावला. तो मुसलमान असला तरी मनाचा दयाळू व सर्व धर्मांना समानतेनें वागविणारा होता. हिंदूंची तर त्यावर एवढी भक्ति बसली कीं, इब्राहीमला त्यांनीं 'जगद्गुरु' हें नांव कायमचें दिलें. तो मरण पावल्यावर त्याचा पुत्र महंमद आदिलशहा गादीवर आला. तो बापाच्या सर्वथा उलट वागूं लागला. त्यानेंच शहाजीला जामीन राहून आपल्या नोकरींत घेतलें. ती जामीनगिरी म्हणजे शहाजीनें महाराष्ट्रांत पाय ठेवतां कामा नये. अर्थात् महाराष्ट्राबाहेरची कांहीं तरी नवीन कामगिरी शहाजीला देणें त्या महंमद आदिलशहाला भाग पडलें. रणदुल्लाखान नांवाचा शहाचा सेनापति असून त्याच्या हाताखालीं कान्होजी जेधे हा मावळचा प्रमुख देशमुख सल्लागार होता. कान्होजी व शहाजी ह्यांचा ऋणानुबंध फार

वर्षांचा असून त्याच्याच मार्फत शहाजीचा प्रवेश विजापुरांत झाला. अर्थात् शहानें ह्या सर्वांस कर्नाटक प्रांत जिंकण्याच्या कामावर पाठविलें. विजापुरी फौजेंत मराठ्यांचा भरणा मोठा असून, त्यांत कान्होजी व शहाजी ह्यांच्यावरच मुख्य भिस्त होती. हाताखालीं मावळ्यांचा जमाव होताच.

जिजाबाई व शिवाजी ह्यांस पुण्यास ठेवून शहाजीराजे ताबडतोब कर्नाटकच्या कामगिरीवर सेनापति रणदुल्लाखानाच्या हाताखालीं रवाना झाले. शहाजीचा वडील पुत्र संभाजीही स्वारींत बरोबर होता. तीन वर्षेंपावेतों हा उद्योग सतत लागोपाठ चालून कर्नाटकांतील समस्त हिंदु संस्थानांचा पाडाव झाला. इक्केरी नांवाचें बिदनूरजवळचें संस्थान, शिवाय केळडी, वसवा-पट्टण, सागर, शिरें, बंगलोर, म्हैसूर, श्रीरंगपट्टण, चित्रदुर्ग, कनकगिरि अशीं त्या बाजूचीं लहानमोठीं समृद्ध हिंदु संस्थानें कैक वर्षे नांदत होतीं. त्यांत व तेथील मंदिरांत अपार संपत्तीचा संचय बनलेला होता. तुंगभद्रा व कावेरी ह्या नद्यांच्या साहाय्यानें हा प्रदेश संपन्न होता. शेटसावकार वगैरे लोक तेथें आपले उद्योग शांतपणें चालवीत होते, असा हा आर्यांचा प्रदेश उद्ध्वस्त करण्याचें व तो जिंकून मुसलमानांच्या दौलतींत भर घालण्याचें काम शहाजीला करावें लागलें. पूर्वी उत्तरेंत गज्नवी महंमूद, अलाउद्दीन खिलजी अशांनीं जे अत्याचार गाजविले, त्यांचीच सुधारलेली नक्कल आतां ह्या कानडी मुलखांत घडून आली. त्यांतलें नवल म्हणजे शहाजीसारख्या पराक्रमी सरदारावर ही लूट मुसलमानांच्या चरणीं अर्पण करण्याचा प्रसंग आला. कांट्यानें कांटा काढण्यासारखी घटना सिद्ध झाली. केवळ निर्वाहासाठीं असलें स्वधर्मद्रोहाचें पाप करण्याची पाळी शहाजीवर आली. इक्केरीस वीरभद्र नायक नांवाचा हिंदु संस्थानिक होता, त्याची ह्या मुसलमानी जेत्यांनीं वाट लाविली. मंदिरें पाडिलीं, मूर्ती फोडल्या, संपत्ति सर्व हिरावून विजापुरास नेली, धनिकांचीं घरें जाळून लोकांस बाटविलें. अब्रू बचावण्यासाठीं हिंदु स्त्रियांनीं मुलांबाळांसकट विहिरींत उड्या टाकून प्राण सोडले. कित्येकांना मुसलमानांनीं भ्रष्ट केलें. तोफांनीं सर्व प्रदेशाची दैना उडून गेली. अशा स्वाऱ्या लागोपाठ तीन वर्षें होऊन शहाजीराजे व रणदुल्लाखान हत्ती, घोडे, उंट अशा शेंकडों जनावरांवर संपत्ति लादून विजयानंदानें विजापुरास दाखल झाले. त्या प्रसंगीं खुद्द महंमद-शहानें स्वतः कृष्णेपावेतों त्यांस सामोरे जाऊन त्यांचें स्वागत केलें आणि नंतर त्या द्रव्यानें त्यानें गोलघुमट व इब्राहीम रोजा ह्या प्रचंड इमारती विजापुरांत उभारल्या. अशा प्रकारें शहाजी-सारख्या पराक्रमी राजपूत हिंदु गृहस्थानें मुसलमानी धर्माची सेवा केल्याबद्दल शहानें त्याचें फार फार अभिनंदन केलें. निदान चार कोटि होन म्हणजे सोळा कोटि रुपये किंमतीची हिंदूंची मत्ता मुसलमानांस प्राप्त झाली असा तज्ज्ञांचा कयास आहे.

शहाजीच्या ह्या पराक्रमाची वार्ता यथाकाल पुण्यास जिजाबाईला व शिवाजीला पोंचली तेव्हां त्यांस काय वाटलें असेल ह्याची आतां वाचकांनीं कल्पना करावी. ह्यांचे मावळांतले उद्योग

स्वधर्मवृद्धीचे चालत असतां; तिकडे शहाजीराजांनीं आपली करामत स्वधर्मोच्छेदाच्या कामीं खर्च करावी, ह्यासारखा आणखी उद्वेगकर चमत्कार तो काय असणार ! शिवाजीचा सगळा इतिहास ह्या कौटुंबिक द्वैतानें बनलेलं आहे. शहाजीराजा मलिकंबरापासून मुसलमानांच्या सेवेंत उदय पावला, तर त्याचा पुत्र शिवाजी ह्याचा सर्व उद्योग स्वधर्मोद्धारासाठीं निर्माण झालेला, हें वाचक जाणतात. शिवाजी अत्यंत पितृभक्त होता, पण पित्याचा धर्मोच्छेदी व्यवसाय त्याला कधीं मानवला नाहीं. उलट पक्षीं शहाजी व पुढें त्याचा पुत्र व्यंकोजी हे अखेरपर्यंत मुसलमानांच्या सेवेंत निमग्न राहिले. शिवाजीला आदिलशहानें बंडखोर ठरविलें तेव्हां शहाजीला पेंच उत्पन्न झाला, त्याला शहानें कैदही दाखविली. अशा स्थितींत "पुत्र माझ्या आज्ञेंत वागत नाहीं, शहानें त्याला वाटेल ती सजा करावी, माझी हरकत नाहीं," अशी बतावणी करून शहाजीनें अखेरपावेतों आपला निभाव केला. तरी घरांतलें हें द्वैत कधींही मिटलें नाहीं. शिवाजीच्या उद्योगाचा व मराठ्यांच्या इतिहासाचा हा विशिष्ट मूलग्राही रोंख अभ्यासकांनीं सदैव लक्षांत बाळगिला पाहिजे. शिवाजी जहाल तर शहाजी मवाळ, शिवाजीला संपूर्ण स्वराज्य पाहिजे तर शहाजीला मुसलमानांचें दास्य सोडवत नाहीं. येणेंकरून पुत्रप्रेम व पतिनिष्ठा कसास लागणारे अनुभव जिजाबाईला सहन करावे लागले. त्यांतच तिचें नैसर्गिक कर्तृत्व प्रगट झालें, कसें हें आतां समजून घेऊं.



# बंगलोरच्या भेटी

## .९.

इकडे मावळांत नवचैतन्य झळकूं लागतें, तों तिकडे कर्नाटकांत शहाजीराजांचा विपरीत प्रकार बनूं लागला. शिवाजीदादाजींचा उद्योग फार काळ गुप्त राहणें शक्य नव्हतें. शिबंदी ठेवून किल्ल्यांचा बंदोबस्त ते करूं लागले. जेव्हां ही राज्याविरुद्ध बंडखोरी होय अशी शहाची खात्री होऊन त्यानें शहाजीला ह्याचा जाब विचारला, तेव्हां शहाजीनें सर्वांना आपल्या भेटीस कर्नाटकांत बोलाविलें. सुमारें सन १६४०–४१ त ह्या भेटी बंगलोर येथें झाल्या. बहुधा दादाजी कोंडदेव सुद्धां त्या समयीं सर्वांबरोबर शहाजीच्या भेटीस गेला असावा. दुसरें एक कारण ह्यावेळीं भेटीस जाण्याचें घडलें. सन १६४० च्या आंतबाहेर जिजाबाईनें शिवाजीचें लग्न घडवून आणिलें. फलटणच्या निंबाळकरांची मुलगी सईबाई वधू घरांत आणिली. ही नवी सून व शिवाजीचा संसार पहावा, जहागिरीचे सर्व हिशेब समक्ष तपासून खर्चवेच ठरवावे, विजापुराहून बंडखोरीच्या तक्रारी शहाजीकडे आल्या होत्या त्यांचा इत्यर्थ काढून, पुढील उपचार समक्ष ठरविण्यासाठीं शहाजीनें सर्वांना आपल्या भेटीस बोलाविलें. हे विषय समक्ष बोलल्याशिवाय भागणारे नव्हते. बंगलोर येथें शहाजीनें

आपला सर्व संसार नवीन थाटला, त्याची दखल जिजाबाईलाही हवीच होती. जमल्यास आतांच्या भिन्न परिस्थितींत नवऱ्याची मर्जी जोडून घ्यावी असाही जिजाबाईचा हेतु असावा. एकंदरींत सन १६४१ व ४२ हीं दोन वर्षें ह्या भेटींत खर्च होऊन सन १६४३ त सर्व मंडळी परत महाराष्ट्रांत आली. परत येतांना शहाजीराजेसुद्धा सर्व कुटुंबासह अल्पकाळ विजापुरास शहाच्या भेटीसाठीं गेले.

बंगलोरास भेटी झाल्या. त्यांत काय घडलें हें कल्पनेनेंच ताडलें पाहिजे. भेटीचा मुख्य उद्देश दिलजमाईचा उभयपक्षीं होता, तो मात्र बिलकूल सिद्धीस गेला नाहीं. शहाजीची मुसलमान-निष्ठा आणि शिवाजी-जिजाबाईंचा नवीन महाराष्ट्रीय उठाव ह्यांचा मेळ कसा बसावा ? उलट तो ह्या भेटींत जास्तच तिखट बनला. शहाजीराजांनीं कर्नाटकांत हिंदु धर्माचा उच्छेद केला हें शल्य नाहींसें कसें व्हावें ? जिजाबाईला पतीची निष्ठा मान्य होती, तथापि बंगलोरला जातांच तेथें सवतीचा संसार पाहून तिला एक प्रकारचा वीट उत्पन्न झाला आणि म्हणून आपणांला कांची-रामेश्वरपावेतों यात्रा करावयाच्या असें निमित्त करून, जिजाबाईनें बंगलोरांतून काढता पाय घेतला. वर्ष सहा महिने तिनें असे बाहेर काढून ती सर्वांबरोबर पुढें विजापुरास गेली. दादाजीनें हिशेब व व्यवस्था शहाजीराजांस समजावून लौकिकांत कुटुंबां-तली फाट उघडी न करतां प्रकरण समेटानें निभावलें. नवऱ्याशीं रहस्य जमावें ही जिजाबाईची मनीषा सिद्धीस गेली नाहीं.

शिवाजीचें सर्वच चरित्र इतकें अद्भुत आहे कीं, तें सर्व भरभक्कम पुराव्यानें निश्चित ठरविणें शक्य नाहीं. पुष्कळशा आख्यायिका, पोवाडे, कवनें, सनदापत्रें, वगैरे मागाहून बनलीं तीं सर्व जमेस धरून एकंदर जीवनवृत्तान्त नजरेंत भरतो तेवढाच सारांशानें येथें दाखल करण्यांत येईल. सन १६४३ च्या सुमारास शहाजीराजे सर्व कुटुंबासह बंगलोराहून विजापुरास आले. मावळच्या दंगलीबद्दल शहाचा रोष झाला होता तो समक्ष भेटून दूर करावा आणि शिवाजीस शहाचे पायांवर घालून गोडीनें प्रकरण मिटवावें हा शहाजीचा, उद्देश तर शिवाजीला शहाची सेवा अंत:करणांतून नको होती. विजापुरास बरीच सारवासारव झाली, पण शिवाजीला स्वतंत्र राज्य पाहिजे आणि शहाला आपलें राज्य कायम टिकवायचें, ह्या दोन विरोधी मतलबांचा जम बसला नाहीं. शिवाजीला बापानें शहाच्या दरबारास नेलें तेथें त्यानें जमिनीस कपाळ घासून शहास प्रणाम केला नाहीं. लहान मूल, दरबारचे रिवाज जाणत नाहीं असें समर्थन शहाजीनें शहास कळविलें. विजापुरच्या या मुक्कामांत एकदां शिवाजी शहरच्या रस्त्यांतून घोड्यावर बसून चालला असतां एक मुसलमान कसाई गोवध करतांना त्यास आढळला. त्याजबद्दल संताप येऊन शिवाजीनें कमरेची तलवार उपसून त्या कसायास जागच्या जागीं कंठस्नान घातलें. ह्या बनावाचा तपास होऊन शिवाजीस पकडणार असा अंदाज दिसतांच शिवाजी रातोरात विजापुरांतून निसटून स्वदेशीं परत आला. हे भेटीचे बनाव तात्पर्यार्थानें बरोबर दिसतात.

# सिंहगडचा निकर

## .१०.

सापाच्या शेपटीवर पाय देऊन शिवाजी विजापुरांतून जीव बचावून निसटला, ह्याचा परिणाम पुढें काय होणार हें जाणून तो आतां पुढील तयारीस लागला. दादाजी व जिजाबाई विवंचनेंत पडलीं. तीं दोघें बहुधा शिवाजीच्या अगोदरच महाराष्ट्रांत परत आलीं होतीं. हातीं घेतलेला उद्योग कसेंही करून सिद्धीस न्यावयाचा हाच निर्धार त्यांनीं मनाशीं ठरविला. विजापुरचा लष्करी घाला येणार हें त्यांनीं ताडलें, त्यासाठीं पुण्यास राहून आपला निभाव लागणार नाहीं हें ओळखून बचावासाठीं त्यांनीं सिंहगडाचा आश्रय केला. ह्या किल्ल्याच्या बाजूची रचनाच अशी आहे कीं त्याजवर तोफा डागण्यास जागा नाहीं. थोडीशी कणखर शिबंदी वर ठेवून प्रवेशद्वार बंद केलें कीं बाहेरून त्याजवर शत्रूचा इलाज चालण्याजोगा नव्हता. ही शक्कल मूळ दादाजीची. त्यानें गडावर थोडीबहुत डागडुजी करून तेथें जिजाबाई व शिवाजी ह्यांच्या राहण्याची तात्पुरती व्यवस्था लाविली आणि कांहीं जिवाचे सोबती मिळवून प्रसंग आला तर शरण न जातां किल्ला लढवायचा असा बेत ठरविला. ताबडतोब सर्व सिद्धता करण्यांत आली. कित्येक देशमुखांकडे संधानें बांधून त्यानें त्यांचें

साहाय्य मिळविलें. कान्होजी जेधे देशमुख हा त्यास मनापासून साहाय्य करूं लागला. हा बहुत दिवसांचा ऋणानुबंधी संकटांत उपयोगी पडला. प्रत्यक्ष वर्दळीस न येतां सम्मोपचारानें मिटतें घेण्याचा प्रयत्न ह्यांनीं चालविला. ह्यावेळीं शिवाजी कसा झाला तरी अल्पवयी असल्यामुळें सरकारी कागदांत किंवा लोक-व्यवहारांत दादाजीचेंच नांव प्रमुख होतें, शिवाजीचें नव्हतें.

मावळांत जी ही नवीन तयारी किंवा बंडखोरी चालू झाली, ती मोडण्यासाठीं आदिलशहानें मुद्दाम फौजा रवाना केल्या आणि मावळच्या देशमुखांस हुकूम फर्माविले कीं, सर्वांनीं आपापल्या पथकांसह जातीनिशीं येऊन हा बंडावा मोडावा. इतरांबरोबर रोहिडखोऱ्याचा देशमुख कान्होजी जेधे ह्यासही शहाचें फर्मान आलें तें आतां प्रसिद्ध असून त्याची तारीख १ ऑगस्ट सन १६४४ आहे. ह्या फर्मानांत पुढील मजकूर आहे — “ शहाजी भोसले ह्यास दरबारांतून काढून टाकण्यांत आलें असून, त्याचा मुतालिक दादाजी कोंडदेव ह्यानें कोंडाण्याच्या प्रदेशांत बंडखोरी चालविली आहे. हा दुष्ट हरामखोर व त्याचे साथीदार ह्यांस सजा करून प्रांत कबजांत आणण्यासाठीं खंडोजी खोपडे व बाजी घोरपडे ह्या आमच्या इतबारी सैनिकांस रवाना केलें आहे, तरी तुम्ही आपल्या जमावानिशीं त्यांस सामील होऊन कामगिरी बजावावी म्हणजे तुमच्यावर सरकारची मेहेरबानी होईल.”

हा कागद शिवाजीच्या चरित्रांत अत्यंत महत्त्वाचा असून स्वराज्याच्या उभारणीचा हा पहिला निश्चित पुरावा होय. पुढें ही विजापुरी फौज चालून आली कीं नाहीं, किंवा त्यांनीं काय इलाज केले त्याचा खुलासा मिळत नाहीं. आम्ही बंडखोरी करीत नाहीं, राज्याची सुधारणा करतों, शहांचे आम्ही एकनिष्ठ सेवक आहों, असें समर्थन दादाजीच्या विद्यमानें कळवून समजूत काढण्यांत आली असा प्रकार दिसतो. हें समर्थन विजापुरदरबारास मान्य झालें नाहीं. कारण लगेच शहानें खुद्द शिवाजीला उद्देशून कान्होजी जेधे ह्यास पुढील हुकूम पाठविला तो ३० मार्च सन १६४५ चा आहे. “ शिवाजी राजेलोकांचा जमाव करून शहाशीं बेइमानी करतो, हालीं रोहिडा किल्ला घेऊन राजगड नवीन बांधतो, मगरुरीचे जबाब देतो, तरी हुकूम पावतांच त्याचा बंदोबस्त करावा.”

ह्यावर शहाला स्वतः उत्तर न लिहितां शिवाजीनें कान्होजी जेध्यास जबाब पाठविला तो असा — “ आम्ही शहाशीं बेइमान-गिरी बिलकूल करीत नाहीं. रायरेश्वरानें आम्हांस यश दिलें आणि पुढेंही तो तुमचे आमचे हिंदवी स्वराज्याचे मनोरथ पूर्ण करण्यास समर्थ आहे. श्रीसमोर तुमचें आमचें इमान झालें तें वज्रप्राय कायम आहे.” अर्थात् रायरेश्वरासंनिध शिवाजीच्या व त्याच्या सहकाऱ्यांच्या ह्यापूर्वी गुप्त शपथा झाल्या तो प्रकार आतां सांगूं.

जेध्यांच्या निवासांत कारीजवळ रायरेश्वर नांवाचा डोंगर असून तेथें शंकराचें मंदिर आहे. विजापुराहून फौज येणार ही वार्ता कळतांच शिवाजीनें आपल्या साहाय्यकांस रायरेश्वराच्या मंदिरांत

एकत्र आणून आपल्या मधुर व उत्साही वाणीनें पुढील कळकळीचा आदेश दिला. तो म्हणाला, "आम्ही कांहीं मुसलमानी राज्याविरुद्ध किंवा त्यांच्या धर्माविरुद्ध बंडावा करीत नाहीं, त्यांनीं आपला धर्म आपल्या मर्जीप्रमाणें चालवावा, परंतु त्यांनीं आम्हांसही आमच्या मर्जीप्रमाणें धर्माचरण करण्याची पूर्ण मोकळीक द्यावी. धर्माच्या बाबतींत कोणीं कोणावर जुद्दम करूं नये. शहांच्या राज्यांत चोऱ्यामाऱ्यांचा बंदोबस्त होत नाहीं, न्यायनिवाडा चालत नाहीं, हे प्रकार आम्ही सुधारतों त्यांत गैर काय? उलट त्यांनीं आपण होऊन आम्हांस ह्या बाबतींत उत्तेजन दिलें पाहिजे. परमेश्वर आपला साहाय्यकर्ता आहे. इतक्या उपर शहा जर आमच्यावर भलतीच जबरदस्ती करूं लागतील, तर तें आम्ही कदापि सहन करणार नाहीं. आपण सर्वांनीं एकजुटीनें वागून प्रतिकार करूं. मी स्वत: सर्वांपुढें उभा राहण्यास सिद्ध आहें. तरी ह्या देवाच्या साक्षीनें आपण सर्वांनीं एकमेकांचें साहाय्य अंत:करणपूर्वक करूं, प्राण देऊं पण अन्याय सोसणार नाहीं, अशा शपथा घेऊं या." हें भाषण ऐकून जमलेल्या मंडळींनीं देवासमोर पवित्र शपथा केल्या. त्यांचें स्मारक अलीकडे भोर संस्थानच्या रस्त्यावर उभारलेलें दृष्टीस पडतें. तेथें जाऊन सर्वांनीं शिवाजीचा तो उद्योग पाहून घ्यावा. दादाजी कोंडदेव हयात असतांना हे प्रकार घडले, त्यावरून ते त्याच्या संमतीनें घडले ह्यांत संशय नाहीं.

सिंहगडचें प्रकरण एवढ्यावर मिटलें नाहीं. त्यामुळें शहाजीवर



संकटें ओढवलीं तीं पाहण्यास दादाजी कोंडदेव जगला नाहीं. ता. ७ मार्च सन १६४७ ह्या दिवशीं तो मरण पावला. हा सचोटीचा गृहस्थ शिवाजीस लाभला म्हणूनच त्याचें स्वराज्याचें बस्तान लवकर बसलें. त्याची वृद्धावस्था झाली होती. वय किंवा इतर तपशील उपलब्ध नाहींत. साठीच्या उमरींत त्याचा मृत्यु झाला असावा. मृत्युसमयीं शिवाजीस जवळ बोलावून त्याचा निरोप घेतला, तेव्हां तो म्हणाला, "राजे, आतां सर्व भार तुमच्यावर आहे. मला आजपावतों सुचलें तें सांगत व करीत गेलों. तुम्ही निष्ठेनें उद्योग करीत जा. सत्य सोडूं नका. लोकांचें भलें करीत जा, म्हणजे देव तुम्हांस यश देईल. स्वराज्याचा रोपटा लावलेला आहे ह्याची जतन करीत रहा." हे शब्द ऐकतांना उभयतांना मोठा गहिंवर आला. जिजाबाईलाही भारी दु:ख

झालें. दादाजीनें अनेक कलह तोडले व प्रांतांत आबादानी बनविली, त्याचे कागदपत्र पाहतां तो मोठा न्यायनिष्ठुर दिसतो. हुकमाची बजावणी तो यथायोग्य व ताबडतोब करी. मृत्यूनंतरही त्याची ख्याति देशांत गाजत होती. सन १७०० च्या सुमारास औरंगजेब बादशहा महाराष्ट्रांत असतां त्याजपुढें एक जुना वाद निकालाकरितां आला, त्यांतले कागद पाहतां वादाचा निकाल पूर्वी दादाजी कोंडदेवांनीं केलेला असतां तो पक्षकारांनीं मानला नाहीं, तेव्हां बादशहानें फर्माविलें, "दादाजींसारख्या थोर गृहस्थांनीं ज्या वादाचा निकाल केला आहे, त्याहून आम्ही जास्त काय ठरविणार, तोच निकाल आम्ही मंजूर ठेवितों." इतकी मान्यता दादाजीची पुढील काळांत होती.

दादाजीच्या पश्चात् शिवाजीनें आपले उद्योग जास्त तीव्रतेनें चालू केले. सिंहगडाच्या भानगडीमुळें पुढील अवघड मावळांत सन १६४५ त नवीन किल्ला बांधला तो राजगड व राजगडच्या पायथ्याशीं शिवापट्टण हें नवीन नगर वसविलें. तेथें जिजाबाई व शिवाजी ह्यांनीं वास्तव्य केलें. दरम्यान पुरंदर किल्लाही त्यांनीं आपल्या कब्जांत आणिला. दुसरी एक दैवी घटना शिवाजीला अनुकूल बनली. सन १६४६ च्या सुमारास विजापुरचा महंमदशहा अर्धांगवायूनें आजारी पडला आणि पुढील दहा वर्षांत सारखा खंगत गेला. अर्थात् शिवाजीचा कोवळा कोंब त्यास मारतां आला नाहीं. दादाजीच्या मृत्यूपूर्वी राजगड निर्माण होऊन स्वराज्य बनूं लागलें. वीस वर्षे राजगडच राजधानी होती.



# शहाजी-राजांची कैद

**११**

शिवाजीनें आपला सर्व उद्योग प्रथम कितीही गुप्तपणें चालविला तरी त्याची खबर विजापुरास पोंचण्यास उशीर लागला नाहीं. शहाची खात्री झाली कीं, शहाजी, शिवाजी, दादाजी सर्वच ह्या उठावणींत सामील आहेत. तेव्हां त्यांतला मुख्य जो शहाजी त्यालाच सजा केली पाहिजे. त्यावरून तसे प्रयत्न आदिलशहानें निकरानें चालविले. रणदुल्लाखान शहाजीचा मुख्य आधार होता, तो सन १६४२ त मरण पावला. तरी शहाजीसुद्धा पराक्रमी सरदार, सहजासहजीं आटोक्यांत येणारा नव्हे, सबब त्यास युक्तीनेंच शासन केलें पाहिजे. सन १६४५ पासून आदिलशहानें पूर्व कर्नाटकचा प्रदेश जिंकण्याचा उद्योग पुन्हा चालू करून त्या कामीं त्याचा प्रधान खानमहंमद, रणदुल्लाखानाच्या जागीं आणलेला सेनापति मुस्ताफाखान ह्यांस शहानें वेलोर, जिंजी, इत्यादि स्थळें घेण्यास रवाना केलें. मुस्ताफाखानाच्या हाताखालीं शहाजी भोसले,बाजी घोरपडे वगैरे सरदार होते.ही मंडळी कर्नाटकांत कामावर असतां शहानें मुस्ताफाखानास गुप्त हुकूम पाठविला कीं, शहाजीस हिकमतीनें कैद करून विजापुरास पाठवावें. मुस्ताफाखान व शहाजी हे एकमेकांस सदैव पाण्यांत पाहत होते.

जिंजीच्या आसपास संग्राम चालू असतां मुस्तफाखानानें संधान राखून शहाजीस पकडलें. स्वतः न पकडतां बाजी घोरपड्याकरवीं तें कृत्य त्यानें सिद्धीस नेलें. एके दिवशीं पहाटेच्या प्रहरीं शहाजी गैरसावध पाहून बाजी घोरपड्यानें त्याजवर एकदम छापा घालून निजल्याजागीं त्यास पकडून मुस्ताफाखानाच्या हवालीं केलें. अल्पावकाशांत जिंजी किल्लाही हस्तगत झाला आणि पुष्कळशी लूट पैदा झाली. अफजलखान नांवाचा दुसरा एक सरदार ह्यावेळीं विजापुरी लष्करांत कामावर होता, त्यानें शहाजीस कबजांत घेऊन मोठ्या बंदोबस्तानें विजापुरास आणिलें. बरोबर वीस कोटि लुटीची मत्ता ८९ हत्तींवर लादून त्यांचा मोठा तांडा व बंदिवान शहाजी असा हा थाट दोन महिने पायरस्त्यानें प्रवास करून विजयाच्या भरांत सन १६४९ च्या मार्चांत विजापुरास दाखल झाला. शहाजीराजे अटकेंत पडले ही वार्ता यथाकाल शिवाजी-जिजाबाईला कळली.

शहाजी कैद झाला तरी पुत्र संभाजीनें पथकाचा ताबा घेऊन कर्नाटकांतच वेळ पडल्यास निकरानें लढण्याची सिद्धता केली. बंगलोर त्याच्या ताब्यांत होतें, तेथें जाऊन त्यानें बापाच्या दौलतीचा सांभाळ केला. मिळून महाराष्ट्रांत शिवाजी व कर्नाटकांत संभाजी ह्या दोन पराक्रमी पुत्रांपुढें आदिलशहाचा जोर साफ फिका पडला. कान्होजी जेधे हा प्रतिष्ठित गृहस्थ विजापुरी लष्करांत होता, त्यानें रदबदली करून शहाजीच्या सुटकेचे इलाज चालविले. अतिप्रसंग करावा तर आपल्यावरच बेतेल असा रंग शहास वाटूं लागला. आजारानेंही तो जर्जर झाला होता. कान्होजीनें तोड सुचविली कीं, शहाजीचा कलह त्याच्या पुत्रांमुळें उपस्थित झाला आहे. एक कोंडाणा किल्ला व दुसरा बंगलोर असे ते दाबून बसले आहेत. त्या दोघांनीं तीं स्थळें सोडून द्यावीं, विजापुरी लष्करांनीं त्यांचा ताबा घ्यावा आणि शहानें शहाजीस कैदेंतून मुक्त करून पूर्ववत् कामावर घ्यावें. ह्याप्रमाणें करार ठरला. शहाजीनें दोघा पुत्रांस पत्रें पाठविलीं, त्यांत त्यानें शिवाजीस लिहिलें, " आमची सुटका करणें तुमच्या हातांत आहे. कोंडाणा सोडून परत द्यावा. " ह्या कामासाठीं शहानें कान्होजी जेधे ह्यासच शिवाजीच्या भेटीस पाठवून सिंहगड बादशहाचे कबजांत देण्याची कामगिरी सांगितली. परंतु शिवाजी हातांत आलेला कबजा सोडीना. विजापुराहून फौजा आल्या, त्यांच्याशीं शिवाजीनें निकराचा झगडा केला. अशीच दुसरी विजापुरी फौज बंगलोरास संभाजीवर गेली. परंतु संभाजीनेंही हिमतीनें लढून त्या फौजेचा पाडाव केला.

पुत्रांच्या ह्या कलहांत जिजाबाई मात्र अत्यंत पेचांत पडली. इकडे नवऱ्याच्या जिवास शहा अपाय करतो कीं काय, आणि तिकडे हे मुलगे हातांतील कबजा सोडण्यास नाखूष. पोटांतील अर्थ स्वराज्यनिर्मितीचा, पण पतीचें अनिष्ट टाळणें हेंही तिचें कर्तव्य. ह्या भीषण परिस्थितीची भरपूर चर्चा मातापुत्रांनीं केली. दोघेंही निकरावर येऊन बेतलीं. सोनोपंत डबीर म्हणून त्यांचा एक विश्वासू सेवक व हितचिंतक होता, त्यानें काय तो निकाल द्यावा आणि तो उभयतांनीं मान्य करावा असा सिद्धान्त मान्य

झाला. सोनोपंतानें निकाल केला कीं, तूर्त सिंहगड विजापुरच्या हवालीं करावा. माणसाचे अंगीं पराक्रम असेल तर तो पुन्हा काबीज करण्यास उशीर काय! ही मातापुत्रांची झोंबाझोंब शिवभारतकार परमानन्दानें विशेष रंगवून वर्णिली आहे. सोनोपंताला तो सुवर्णपंडित म्हणतो. "सुविक्रान्तस्य नृपतेः सर्वमेव महीतलं।" हा सुंदर उपदेश सोनोपंताच्या तोंडचा आहे. शिवभारताचा समग्र सोळावा अध्याय ह्या प्रकरणानें व्यापलेला आहे.

शहाजीच्या सुटकेचा हा काळ सन १६४९ चा असून त्यावेळीं सिंहगडचें प्रकरण तूर्त मिटलें. स्वराज्याची उभारणी सन १६४४ त झाली आणि तें सिद्ध होण्यास दहा वर्षें लागलीं. ह्याचा पुरावा शिवाजीनें सिद्धेश्वरभट ब्रह्मे ह्यांस लिहिलेल्या पत्रांत मिळतो. तें पत्र ता. १७ जुलै सन १६५३ चें असून त्यांत शिवाजी सांगतो, "स्वामींच्या अनुष्ठानबळें राज्यास अधिकारी झालों." त्यालगतचा दुसरा एक तसाच कागद ता. १ ऑगस्ट सन १६५३ चा मिळाला आहे. त्यावरील शिक्क्यांत "शिवनरपति हर्षनिधान। शामराज मतिमंत प्रधान" हीं अक्षरें आहेत. ह्यावरून निश्चित म्हणतां येतें कीं, शिवाजीचें पहिलें जागिरीचें राज्य सिद्ध झालें. सन १६४४ ते १६५४ हा शिवाजीच्या उद्योगांतला पहिला दशक काल होय.

पुण्याजवळच सुपें येथें संभाजी मोहिते नांवाचा एक बलवान् सरदार नांदत असून, तो शिवाजीच्या हुकमतींत वागण्यास तयार नव्हता. मोऱ्याप्रमाणेंच तो शिवाजीस विरोध करूं लागला. तो शहाजीराजांचा स्नेही असून त्याची बहीण तुकाबाई शहाजीची दुसरी बायको. शिवाजीनें कैक वेळां त्यास बजावलें कीं, बऱ्या बोलानें तुम्ही मला सामील व्हा, तसें न केल्यास जड जाईल. शहाजीच्या पाठिंब्यावर तो शिवाजीचा ताबा मानीना. तेव्हां त्यास दस्त करून इतर मंडळीस स्वराज्याची शिस्त शिकविणें शिवाजीनें योजिलें आणि कांहीं निवडक सोबती बरोबर घेऊन अकस्मात् रात्रीं त्यानें सुपें येथें मोहित्यावर छापा घातला, संभाजीस पकडून शहाजीकडे पाठवून दिलें आणि त्याची सर्व संपत्ति लुटून राजगडास आणिली. शहाजीलाही ह्या बाबतींत कांहीं प्रतिकार करतां आला नाहीं. एकदम चहूंकडे शिवाजीची दहशत बसली. मावळ प्रांतांत राजरोस चिमुकलें स्वतंत्र राज्य निर्माण झालें. परमानंद कवि सांगतो –

**महाराष्ट्रो जनपदः तदानीं तत्समाश्रयात्**
**अन्वर्थतामन्वगमत्समृद्धजनतान्वितः।**

अर्थ – महाराष्ट्र म्हणजे मोठ्या पराक्रमी लोकांचें राष्ट्र हा केवळ पोकळ शब्दप्रयोग होता. पण ह्या प्रदेशास शिवाजीचा आश्रय मिळतांच त्याचा खरा अर्थ सिद्ध झाला. मराठे लोक पराक्रमी आहेत, हें शिवाजीनें सिद्ध केलें. सर्व जनता आतां समृद्ध बनूं लागली.

# मोऱ्यांचा पाडाव

## १२.

सन १६४९ त शहाजीची सुटका झाल्यावर शिवाजीचा उद्योग शीघ्र वेगानें चालून सन १६५३ त त्याचें स्वतंत्र राज्य सिद्ध झालें. त्या वेळीं त्याचें वय पंचविशीच्या अंदाजांत होतें. त्यानें मावळांतले पुष्कळसे लोक आपल्या उद्योगांत सामील करून घेतले होते, तथापि त्याचा हेवा करून त्यास विरोध करणारेही स्वजातीय कांहीं थोडे नव्हते. जोंपर्यंत त्याचा उद्योग जगजाहीर व सर्वमान्य झाला नव्हता, तोंपर्यंत त्याला विरोधक हे असणारच. मुख्यत: मावळांतील ज्या देशमुखांस शिवाजीची बाधा झाली ते त्याचे द्वेष्टे बनले. महाबळेश्वरच्या पश्चिम पायथ्याशीं जावळी येथें मोरे नांवाचे प्रतिष्ठित सरदार विजापुरच्या ताब्यांत नांदत होते. ते आपणांस प्राचीनकाळीं होऊन गेलेल्या चंद्रगुप्त मौर्याचे वंशज क्षत्रिय समजत आणि शिवाजीच्या आक्रमणास विरोध करीत. विजापुरचा ताबा उडवून शिवाजी आपणांस स्वतंत्र राजा म्हणवूं लागला, त्यानें प्रधान नेमून फौजा वाढविल्या, छत्रपति हें नांव धारण करून मावळावर अंमल बसविला, तेव्हां त्याच्या ताब्यांत राहण्यास मोरे कबूल होईनात. हा अस्तनींतला निखारा शिवाजीस पीडा देऊं लागला, तेव्हां प्रकरण चिडीस गेलें. शिवाजीनें आपले


वकील मोऱ्यांकडे बोलणें करण्यास पाठवून त्यांच्या मुलीस मागणी घातली. भोसले शूद्र, त्यांच्याशीं सोयीरगत करण्याचें मोऱ्यांनीं मान्य केलें नाहीं. शिवाजीनें मोऱ्यांस सामोपचारानें कळविलें, " आम्हीं मावळ प्रांतावर स्वराज्य स्थापन करून स्वधर्माचा उत्कर्ष चालविला आहे, ह्या कामीं तुम्हीं आम्हांस संतोषानें सामील व्हावें. हें राज्य श्रीशंभूनें आम्हांस दिलें आहे. तुम्हीं आपणांस राजे म्हणवूं नये. आमच्याविरुद्ध विजापुराकडे फितुरी करूं नये. आपला मुलूख खाऊन हरतऱ्हेनें स्वराज्याची चाकरी करावी. गैरमार्गानें चालाल तर तुमची जावळी जमीनदोस्त करून तुम्हांस कैदेंत ठेवूं. "

ह्या विचार मोऱ्यांना पटला नाहीं. त्यांनीं उलट तिखट जबाब पाठविला कीं, "तुम्हांला राजे कोण म्हणतो? तुम्ही कालचे. राज्य कसलें आलें आहे तुमचें? आपले घरीं बसून आपणच राजे म्हटल्यास तुम्ही राजे बनतां कीं काय? येतां जावळी, जातां गोवली. या तर खरे जावळीवर चालून म्हणजे समजेल कसे गोवून पडाल तें! तुमचा एक मनुष्य जिवंत राहणार नाहीं. उद्यां यायचे ते आजच या. या प्रांताचे राजे आम्ही आहों. आमचा आधार श्रीमहाबळेश्वर, त्याच्या कृपेनें आम्ही राज्य करतों. पातशहानें आम्हांस राजे हा किताब व सिंहासन, मोर्चेल देऊन गौरव केला आहे. पिढ्यानुपिढ्या आम्हीं हा सन्मान उपभोगीत आहों. इतक्या उपर तुम्हीं आमच्या वाटेस जाऊं नये. आमचें नांव काढाल तर पस्तवावें लागेल. पुरता विचार करा. "

असें हें प्रकरण चिडीस गेलें. अटीतटीचा सामना उद्भवला. हे जातभाई, ह्यांजवर शस्त्र चालवूं नये अशी शिवाजीची भारी इच्छा असूनही त्यांस दस्त न करावें तर स्वराज्याचा सर्वच उद्योग सोडून देणें प्राप्त. हे मोरे शिवाजीला हलका समजत, हा घाव त्याच्या वर्मी लागला. मोरे जन्मानें क्षत्रिय असले, तर आपण पराक्रमानें क्षत्रिय आहों हें सिद्ध करण्याची वेळ आली. मातु:श्री, सोनोपंत डबीर, नेताजी पालकर, नारोपंत हणमंते अशा सर्वांनीं एकत्र जमून पुष्कळ वाटाघाट केली आणि मनाचा निश्चय करून कृष्णराव मोऱ्यांस सांगून पाठविलें, " मोर्चेल दूर करून, राजे हा किताब टाकून, रुमालानें हात बांधून, सेवकभावानें येऊन आम्हांस भेटा. नाहींतर सर्व मारले जाल. " ह्या प्रकरणांत शिवाजीचें एकंदर राजकारण स्पष्ट झालेलें असून स्वराज्यस्थापना म्हणजे काय हें त्यांत उत्कृष्ट दिसून येतें.

मोऱ्यांची बखर म्हणून एक जुनें प्रकरण छापलेलें असून त्यांत तो व्यवहार कसा बनला तें यथायोग्य दाखविलेलें आहे. म्हटल्याप्रमाणें लगेच शिवाजीनें जावळीवर फौजा पाठवून मोऱ्यांचा पाडाव केला आणि जावळीचें ठाणें व त्यांचा सर्व प्रदेश हस्तगत केला. हणमंतराव, कृष्णराव, यशवंतराव व सूर्यराव असे त्यांचे चार पुरुष मारले गेले. बाजीराव मोरे पळून विजापुरच्या आश्रयास गेला आणि तेथें तो पुढें कैक वर्षें शिवाजीविरुद्ध खटपट करीत राहिला. ह्या मोऱ्यांना 'चंद्रराव' असा सामान्य किताब चालत आला होता. रायगडचा डोंगर मोऱ्यांच्या ताब्यांत

होता. तो प्रदेश शिवाजीस प्राप्त होऊन तेथें पुढें शिवाजीनें बादशहाच्या कैदेंतून सुखरूप परत आल्यावर राजगड सोडून, आपल्या राज्याची कायम राजधानी रायगडावर केली. शिवाजीच्या एकंदर चरित्रांत निष्ठुर क्रूरपणा व्यक्त झालेलें असें हें एकच मोऱ्यांचें प्रकरण आहे. स्वराज्य म्हटलें, कीं त्यांत थोडा-बहुत अपहार व अन्याय येणें प्राप्त आहे. लगेच जावळीजवळ शिवाजीनें नवीन किल्ला बांधून त्याचें नांव प्रतापगड ठेविलें आणि ह्या गडावर भवानीदेवीची स्थापना करून तेथेंच तो पुष्कळदा मातुःश्रीसह राहूं लागला. मोऱ्यांच्या पाडावानें शिवाजीची छाप चहूंकडे कायम बसून त्याचा उद्योग निर्वेध बनला. मोऱ्यांचें प्रकरण सन १६५५ त निकरावर येऊन वर्ष सहा महिन्यांनीं संपलें. ' क्षत्रियकुलावतंस ' म्हणजे समस्त क्षत्रियांचा शिरोमणि हा विशिष्ट किताब राज्यारोहणप्रसंगीं शिवाजीनें घेण्याचें प्रयोजन मोऱ्यांनीं त्याला क्षत्रिय मानण्याला विरोध केला हें होय.



# राजगड राजाचा, प्रतापगड जिजाबाईंचा

## १३.


राज्य निर्माण झालें, तेव्हां सरकारी कागदांवर शिक्कामोर्तब करण्याची जरूर उत्पन्न झाली. त्यासाठीं मुद्रेचें संस्कृत वाक्य स्वीकारण्यांत आलें तें हें —

**प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।**
**शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥**

अर्थ — ही राजमुद्रा शहाजीपुत्र शिवाजीची असून ती जरी प्रतिपदेच्या चंद्रकोरेप्रमाणें बारीक असली, तरी दिवसेंदिवस वाढत जाणारी असून उत्तरोत्तर जगन्मान्य होणार आहे व ती लोककल्याणार्थ निर्माण झाली आहे.

ह्या सुटसुटीत वाक्यांत केवढा गूढार्थ दिसतो पहा. बापापासून आपणास स्वराज्याची स्फूर्ति मिळाली, उत्तरोत्तर हें राज्य वाढत जाऊन त्याची हिंदुपदपातशाही बनणार व ती समस्त जगाला वंद्य होणार, असा ह्या मुद्रेचा अभिप्राय व्यक्त होतो. लोककल्याण हाच ह्या उद्योगाचा मुख्य उद्देश होय. मुद्रेंत शिवाजीच्या एकंदर कर्तृत्वाचें सार भरलेलें आहे. असें सांगतात कीं, अशाच अर्थाची मुद्रा मोरे वापरीत होते, त्यांजपासून ती शिवाजीनें स्वीकारली.

गरिबांस उपद्रव द्यायचा नाहीं, रयतांचा न्यायनिवाडा योग्य प्रकारें करून त्यांचें संगोपन करायचें, लोकांच्या पराक्रमाचा उपयोग राष्ट्रकार्याकडे करायचा, असा शिवाजीचा बाणा प्रथमपासून लोकांच्या प्रत्ययास आल्यामुळें त्याचा उद्योग झपाट्यानें वाढत गेला. सर्व कामांत तो मातेची सल्ला घेऊन पुढें पाऊल टाकी. मोऱ्यांचें उच्चाटन झाल्याबरोबर शिवाजी हाच आपला राजा अशी लोकांची खात्री पटत चालली आणि तितक्या मानानें मुसलमानी राज्यांची इभ्रत कमी झाली. सन १६५६ च्या दसऱ्यास राजगड किल्ल्याच्या पायथ्याशीं शिवापट्टण येथें शिवाजी-जिजाबाईंनीं सीमोल्लंघनाचा मोठा समारंभ केला. ठिकठिकाणचे प्रतिष्ठित सरदार व शिष्टजन एकत्र आणले. मोठा मंडप उभारून सर्वांच्या भोजनाची व्यवस्था केली. कुस्त्या, घोड्यांचे खेळ, लष्करी शिस्त असे अनेक प्रकार ह्या प्रसंगीं घडवून शमीपूजनानंतर सोनें वांटण्यांत आलें. ह्या निमित्तानें लष्कराची उभारणी झाली. शामराज मतिमंत प्रधान व सरनोबत नेताजी पालकर ह्यांच्या नेमणुकी करण्यांत आल्या. ह्या मेळवड्यांत शिवाजीनें भाषण करून आपले एकंदर उद्देश जाहीर केले. "राजगड राजाचा, प्रतापगड जिजाबाईचा" असें तुळसीदास म्हणतो, त्यांत राज्य झालें त्याची राजधानी राजगड हा अर्थ अभिप्रेत आहे. राज्याचा मुख्य उद्देश स्वधर्मोत्कर्ष असल्यामुळें मुसलमान बनलेल्यांस प्रायश्चित्तानें परत स्वधर्मांत घेण्याचा उपक्रम जिजाबाईनें मुद्दाम केला. बजाजी निंबाळकर मुसलमान होऊन विजापुरास मुसलमानी थाटांत नांदत होता, त्यास तिनें परत फलटणास आणून प्रायश्चित्तानें शुद्ध करून घेतलें, आणि बजाजीचा पुत्र महादाजी ह्यास शिवाजीची कन्या सखूबाई देऊन त्या प्राचीन क्षत्रिय घराण्याची प्रतिष्ठा वाढविली. ह्यांत त्या बाईचें देशकालोचित पुरोगामी कौशल्य प्रगट होतें.



# स्वराज्याची झोळी

## १४.

शिवाजीनें मावळांत स्वतंत्र राज्य स्थापलें, हा प्रकार आदिलशहास झोंबला. त्यानें शिवाजीच्या नियंत्रणासाठीं अफजलखान ह्या आपल्या कडव्या सरदारास वाई प्रांताच्या कारभारावर नेमिलें. तेथें तो पांच चार वर्षें राहिला, पण त्याच्या हातून शिवाजीचा बंदोबस्त झाला नाहीं, मात्र तेवढ्या अवधींत खानानें मावळ प्रदेशाची व त्यांतील प्रमुख गृहस्थांची माहिती मिळवून मोरे, खोपडे असे कित्येक देशमुख आपल्या बाजूस वळविले, म्हणून त्या देशमुखांवर शिवाजीची नाराजी झाली. त्यांस तो राष्ट्रद्रोही व धर्मद्रोही समजूं लागला. सह्याद्रीच्या कुशींत पूर्वेस जसा वाई प्रांत तसा खालीं कोंकणांत कल्याणप्रांत हाही विजापुरचा उत्पन्नाचा मुलूख असे. सालोसाल कल्याणचा वसूल कल्याणहून गाडे व जनावरें भरून विजापुरास जात असे, त्याची आगाऊ बातमी राखून पुरंदरजवळ एकदम त्याजवर धाड घालून सर्व खजिना शिवाजीनें लुटून घेतला. तो म्हणे, ही अन्यायाची लूट नसून स्वराज्याची भिक्षा आहे. मुसलमान लोक आमचा धर्मच्छेद करतात त्याचा हा भूर्दंड आम्ही ह्या झोळींत उघडपणें मागत आहों. राज्याचा खर्च भागविण्यास अशा झोळीची आज मोठी

जरूर आहे. ह्यास्तव परकीय इतिहासकारांनीं शिवाजीला लुटारू ही संज्ञा दिली असून, ह्या लुटीचा शिवाजीचा उद्देश स्वराज्याची झोळी असाच समजणें न्याय्य होईल. मोऱ्यांच्या प्रकरणानंतर सुमारें एक वर्षानें कल्याणचा प्रांत शिवाजीच्या कबजांत आला आणि तेव्हांपासून उत्तरोत्तर समग्र कोंकण प्रांतावर व पश्चिम किनाऱ्यावर शिवाजीचा अंमल बसत चालला. कल्याणच्या स्वारींत तेथील मुसलमान सुभेदाराची सुस्वरूप तरुण सून सैनिकांस आढळली ती त्यांनीं शिवाजीपुढें आणून रुजू केली. हें अपकृत्य शिवाजीला मुळींच पसंत पडलें नाहीं. मुसलमानांनीं हिंदु स्त्रिया बळकाविल्या त्याचा वचपा म्हणून आपण त्यांच्या मुली पळवून आणाव्या, हें शिवाजीनें मान्य केलें नाहीं. उलट त्यानें ह्या अपकृत्याचा निषेध केला; आणि तिचा आदर करून तिला तिच्या नवऱ्याकडे आपला पाहरा देऊन सुरक्षित पोंचविलें. येणेंकरून शिवाजीचा लौकिक जाहीर होऊन त्याचें निष्पाप




वर्तन लोकांत जाहीर झालें. लवकरच बाळाजी आवजी चिटणीस ह्या भल्या गृहस्थाची ओळख ह्या कोंकणस्वारींत शिवाजीला झाली आणि त्यानें त्याला राज्याची खास चिटणिसी सांभाळण्याचें काम दिलें. श्यामराजपंत प्रधानपदावर होता, त्यास तें काम बरोबर होईना म्हणून त्याच्या जागीं मोरोपंत पिंगळे ह्यांची नेमणूक शिवाजीनें मुख्य प्रधान म्हणून केली. मोरोपंताची कर्तबगारी राज्याला फार उपयोगी झाली. तशाच लायकीचा आणखी एक गृहस्थ बहिरजी नाईक हा होय. हा ठिकठिकाणची उपयुक्त माहिती हिकमतीनें पैदा करून आणण्यांत अत्यंत निपुण होता. चहूंकडे फिरत राहून आणि प्रसंग पडेल तशी बतावणी करून शत्रूकडील माहिती, त्यांच्या हालचाली, द्रव्याच्या ठेवी, सावकारांचे संचय, किल्ल्यांच्या वाटा असे नानाविध विषय शिवाजीला बहिरजी व त्याचे साथीदार ह्यांजकडून कळूं लागल्यानें स्वराज्याचा उद्योग त्वरेनें फैलावत गेला. शिवाजीचीं अनेक अद्भुत कृत्यें हेरांनीं आणलेल्या अशा बातम्यांवर आधारलेलीं आहेत. अपयश असें त्याला कधीं आलेंच नाहीं. असा शिवाजीचा स्वराज्याचा उद्योग उत्तरोत्तर वाढीस लागत चालला असतां त्याजला नवीन संकटें उत्पन्न झाल्याची बातमी आली. बहिरजी नाईक वगैरे त्याचे कित्येक आत्मिक हेर विजापुरच्या हालचालींची बातमी घेऊन आले. बहिरजी नाईक शिवाजीस सांगतो.

" कित्येक वर्षें आंथरुणास खिळलेला विजापुरचा सुलतान महंमद आदिलशाहा मरण पावला ( ४ नोव्हेंबर सन १६५६ ). पश्चात् गादीचा मालक त्याचा पुत्र अली अल्पवयी म्हणून त्याची आई राणी बडीसाहेबा कारभार पाहतात. त्यांनीं आपल्या-वर ( शिवाजीवर ) फार वांकडी नजर धरली असून त्यासाठीं प्रचंड कारस्थानें चालविलीं आहेत. अहोरात्र खलबतें करतात. तो अफजलखान बाईचा केवळ उजवा हात बनला आहे. हर प्रयत्नानें आपणास पकडून वाट लावणार अशी त्यांची कारवाई चालली आहे. ह्याच दुष्टानें शहाजीराजांस पकडून गोत्यांत आणिलें. आपण युक्तीनें खानाचा तो डाव हाणून पाडला. सह्याद्रीच्या मावळ प्रदेशाची त्याला पूर्ण माहिती आहे. पुष्कळांना त्यानें फितविलें आहे. कनकगिरीवरच्या संग्रामांत (शिवाजीचा बंधु) संभाजी राजांस गोवून त्याचा प्राण घेण्याचा डाव ह्या अफजलखानानेंच सिद्धीस नेला हें मातु:श्रीसाहेब जाणतात. जावळीकर मोऱ्यांना सर्व भर ह्या हरामखोरानें दिली. त्यानेंच विजापुरचा चाणाक्ष प्रधान खान महंमद ह्याचा ( ११ नोव्हेंबर १६५७ रोजीं ) खून करून आतां आपण सूत्रचालक बनला आहे. नुकताच बडेसाहेबिणीनें एक गुप्त दरबार विजापुरांत भरवून पैजेचे विडे लावले कीं, भोसल्यांच्या ह्या पोराला जिवंत पकडून किंवा शिर कापून जो आणील त्याला आम्ही ह्या राज्याची पहिली उमरावगिरी बहाल करूं. फौज व साहित्य लागेल तें भरपूर देऊं. "

बहिरजी पुढें सांगतो, " धनिनीचें हें भाषण ऐकून अफजलखान पुढें आला. पैजेच्या विड्यास हात लावून त्यानें वचन दिलें कीं,

मी ही कामगिरी फत्ते करून दाखवितों, आपण निश्चिंत असावें. राणीनें त्याला एक गुप्त कानमंत्रही दिला आहे कीं, " शिवाजी मोठा युक्तिबाज आहे. युद्धास समोर उभा राहणार नाहीं. हिकमतीनें अपूर्व आमिष दाखवून त्यास गुप्त भेटीस आणा, सांपडल्यास जिवंत पकडा, नाहीं तर खलास करून टाका. एवढें काम तुम्हीं फत्ते करून दाखविलेंत कीं आम्हांस लक्ष जोड मिळाली." दहा हजार निवडक फौज त्यानें तयार केली असून त्याचे पुत्र व सेवक सर्व त्याची साथ करीत आहेत. खर्चास पैसा नव्हता तो पैदा करण्याची युक्ति राणीनें खानास सांगितली कीं, 'तुळजापूर, पंढरपुर येथील समृद्ध मंदिरें व दुसऱ्या व्यापारी पेठा आढळतील, त्या खुशाल लुटून ऐवज मिळवा. शिवाजी लूट करतो त्याची फेड अशी करा. मावळांतले देशमुख किंवा इतर जे कोणी विरुद्ध वागतील त्या सर्वांची एकजात कत्तल करून टाका, मुर्वत धरूं नका. ह्या मुसलमान राज्याची सर्व अब्रू आतां तुमच्या हातीं आहे.' असें सांगून राणीनें आपला हात ख़ानाच्या मस्तकीं ठेवून त्यास रजा दिली. वर्तमान पक्कें. इतक्यांत आपले प्रत्ययास येईल बघा. मी तसाच धावत आपणांकडे आलों."



# सोन्याचा तोडा बक्षीस

## .१५.

ही बातमी ऐकतांच शिवाजीनें खानाच्या प्रतिकाराची तयारी अत्यंत नेटानें व वारकाव्यानें चालू केली. खान महाकपटी आहे हें शिवाजी पूर्णपणें ओळखून होता. शहाजीच्या कर्नाटकच्या स्वारींत शिऱ्याचा नाईक कस्तुरीरंग अफजलखानाशीं लढत असतां खानानें त्यास शपथ देऊन भेटीस आणिलें आणि भेट चालू असतां त्यास ठार मारिलें. हा प्रकार मुलखांत महशूर होता, म्हणून त्या खानास तशाच रीतीनें वागवायचें असें योजून तत्संबंधाची तयारी आपल्या सहकाऱ्यांशीं शिवाजीनें केली. त्यांत असें ठरलें कीं, खानाशीं उघड संग्राम न करतां अवघड जागीं गोवून जमेल तसा त्याचा पाडाव करायचा. ह्यासाठीं पुणें प्रांत व राजगड राजधानी सोडून शिवाजी जावळीजवळ नवीन बांधलेल्या प्रतापगड किल्ल्यावर मातुःश्रीसह जाऊन बंदोबस्तानें राहिला. सन १६५९ च्या भाद्रपदांत पाऊस थोडा कमी होतांच खान आपल्या फौजेसह विजापुराहून निघाल्याची बातमी शिवाजीस पोंचली. आश्विन व कार्तिक दोन महिने हा उभयतांचा खेळ चालू झाला. येतांना वाटेनें खानानें तुळजापूर व पंढरपूर येथील मंदिरें उध्वस्त करून लूट मिळविली. गांवोगांव पैसा उकळीत

व फौज जमवीत शिवाजी प्रतापगडावर आहे असें पाहून पुण्याचा रोख सोडून, खान पूर्वेस वाई येथें मोठी फौज घेऊन उतरला आणि देशमुख मंडळीवर जरब बसवून शिवाजीस आटोक्यांत आणण्याच्या तयारीस लागला.

पुढील बनावाचे बारीक तपशील इतके आहेत कीं ते सर्व येथें सांगण्यास अवकाश नाहीं. उभय पक्षांची ही कारवाई दीड दोन महिने सारखी चालली. वाईचा कुळकर्णी कृष्णाजी भास्कर खानाचा केवळ उजवा हात होता, त्यास खानानें शिवाजीच्या भेटीस पाठवून शरण येण्याची सूचना केली. त्यावर शिवाजीनें कळविलें, "खानाशीं संग्राम करण्याची माझी शक्ति नाहीं. उभयतांची भेट होऊन समक्ष बोलणें करावें म्हणजे मी खान सांगतील तें करण्यास सिद्ध आहें." पंताजी गोपीनाथ बोकील हा शिवाजीचा वकील वाईस जाऊन खानास भेटला. त्यानें खानास कळविलें, "शिवाजी अत्यंत भयभीत झाला आहे, त्याला आपल्या वाईच्या छावणींत येऊन आपणांस भेटण्याची छाती होत नाहीं. आपणच प्रतापगडच्या खालीं त्याच्या भेटीस याल तर तो आपली सर्व बरदास्त उत्तम ठेवून आपण सांगाल त्याप्रमाणें वागण्यास सिद्ध आहे." अशा रीतीनें उभय वकिलांचीं येणींजाणीं व बोलाचाली पुष्कळ होऊन शेवटीं खानानें शिवाजीची सूचना मान्य केली. आपला डाव सिद्धीस जायचा तर त्याशिवाय दुसरा मार्ग खानास राहिला नाहीं. अवघड जागेंत युद्ध करून त्यास पकडणें शक्य नव्हतें. आपण फौजबंद जाऊन त्यास कबजांतच घेऊं म्हणजे झालें. एकवार भेट झाली कीं त्यास पकडण्यास काय उशीर! खान शरीरानें धिप्पाड व तलवार खेळणारा असल्यामुळें आपण शिवाजीस सहज पकडूं अशी त्याची खात्री होती. चंपाषष्ठीच्या दुसऱ्या दिवशीं मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी गुरुवार ता. १० नोव्हेंबर सन १६५९ हा भेटीचा दिवस मुक्रर झाला. तत्पूर्वी खान आपल्या पालखींतून येऊन प्रतापगड किल्ल्याखालीं छबिना तयार केला होता तेथें स्थानापन्न झाला. सभोवार ठिकठिकाणीं खानानें आपलें लष्कर बंदोबस्तास ठेविलें.

उलट पक्षीं त्या पहाडी प्रदेशांत गुप्त जागीं शिवाजीनें आपले साहाय्यक कान्होजी जेधे, नेताजी पालकर, मोरोपंत पिंगळे, बहिरजी नाईक वगैरे फौजबंद ठेवून दिले आणि जंगलांतल्या वाटा झाडें पसरून दुर्गम केल्या. एक पालखी जाण्याजोगी मुख्य वाट खानाच्या स्वारीची तेवढी तयार केली. सर्व गोष्टींचे सूक्ष्म तपशील शिवाजीनें आगाऊ बारकाईनें योजून प्रत्येकास त्याची कामगिरी बरोबर समजावून दिली. मनांत विचार सारखे घोळत राहिले कीं खानाशीं सामना होणार, त्यांत कोणास कोण मारणार? प्रत्यक्ष मृत्यूच्या दाढेंत उडी घेण्याचा तो प्रसंग. कितीही खबरदारी घेतली तरी आयत्या वेळीं काय प्रकार घडतो कोणीं सांगावें? कांहींनीं त्यास सुचविलें, दुसऱ्या एखाद्या खंबीर माणसास खानाच्या भेटीस पाठवा. पण दुसऱ्याचा जीव हलका लेखण्याची ही भ्याडपणाची सूचना शिवाजीनें झिडकारली आणि पूर्ण धाडसानें पण अत्यंत सावधपणानें त्यानें खानाची भेट स्वीकारली. मातापुत्रांस

आदल्या रात्रीं दुसरा विचार नाहीं. नंतर दोन प्रहरचें भोजन आटपून देवीस वंदन करून व मातेचा निरोप घेऊन शिवाजी किल्ला उतरून बैठकीस गेला. खान अगोदरच येऊन बसल्याची वर्दी त्यास आली. शिवाजी एक एक पाऊल धिमेपणें टाकीत सदरेकडे गेला. त्याजबरोबर वकील पंताजी गोपीनाथ होता. खानाजवळ कृष्णाजी भास्कर कुळकर्णी होता. स्वत: आंत जाण्यापूर्वी शिवाजीनें पंताजीस आंत पाठवून खानाजवळ दोन हत्यारबंद रक्षक होते ते बाहेर काढविले. जिवा महाला व संभाजी कावजी हे दोन शिवाजीचे रक्षक बाहेर लपून राहिले. महाराज एकटेच आंत गेल्याबरोबर खानानें उठून त्यांस आलिंगन देतांना आपल्या काखेंत शिवाजीची मान आवळली आणि कमरेच्या तलवारीनें त्याच्या डोक्यावर वार केला. पण शिवाजीच्या डोक्यास आंत टोप असल्या-मुळें जखम झाली नाहीं. दरम्यान शिवाजीनें एका हातांतील विचव्यानें व दुसऱ्या हातांतील वाघनखानें खानाचें पोट फाडून कोथळा बाहेर काढला. दगा दगा म्हणून खान मोठ्यानें ओरडला. शिवाजीची मान मोकळी झाली. खानाचे रखवालदार आंत घुसून शिवाजीला मारणार तोंच जिवा महाला व संभाजी कावजी ह्यांनीं त्यांस ठार केलें. इतक्यांत भोई आंत शिरले त्यांस जखमी करून संभाजी कावजी ह्यानें खानाचें डोकें कापून घेऊन तें थेट किल्ल्याच्या उंच शिखरावर लटकावून दिलें. अंधार होण्याची वेळ आली, इतक्यांत इशाऱ्याचे आवाज झाले ते ऐकतांच जंगलांत ठिकठिकाणीं लपून बसलेले शिवाजीचे लोक



उड्या ठोकीत बाहेर पडले. त्यांनीं चवताळून खानाच्या लष्कराचा धुव्वा उडवून दिला. जावळीचें जंगल शुक्ल सप्तमीच्या त्या रात्रीं आरोळ्यांनीं व कापाकापींनीं दुमदुमून गेलें. उजाडतांच नेताजी व मोरोपंत वाईच्या विजापुरी तळावर चालून गेले. अल्पावकाशांत त्यांनीं त्या छावणीची दाणादाण उडवून दिली. समस्त सामान व मत्ता लुटून घेतली. खानाचा वडील पुत्र फाजलखान जीव बचावून

पळून गेला. दुसरे दोन पुत्र व जनानखाना हस्तगत झाला, त्यांना शिवाजीनें आदरपूर्वक स्वगृहीं पोचतें केलें. जखमी झालेले लोक हातीं पडले त्या सर्वांस औषधोपचार करून शिवाजीनें खुशाल परत जाण्यास निरोप दिला. तसेंच लहानमोठ्या साहाय्यकांचा बक्षिसें वगैरे देऊन गौरव केला.

हा प्राणांतिक झगडा शिवाजीनें जिंकला त्या योगानें त्याची चहूंकडे वाहवा होऊन शत्रुमित्रांवर कायम छाप बसली. हा अद्वितीय पुरुष ईश्वरी संकेतानें निर्माण झाला अशी भावना होत गेली; आणि खानाच्या एकंदर घटनेस अद्भुत स्वरूप प्राप्त झालें. जिजाबाईचें अंत:करण कल्पनेनेंच ओळखावें. लगेच तिनें अज्ञान-दास शाहिरास पुण्याहून प्रतापगडास आणून त्याजकडून पोवाडा बनविला, तो लोक भक्तीनें गातात. अद्यापि तो मराठी भाषेचा एक उत्कृष्ट अलंकार समजला जातो. त्या काळचा रेडिओच तो. एक शेर सोन्याचा तोडा बाईनें शाहिराच्या हातांत घातला. मराठ्यांचा हुरूप वाढला. त्या मानानें विजापूरच्या राज्याची मानहानि झाली. हें अफजलखानवधाचें आख्यान समजून घेणें हेंच स्वराष्ट्रेतिहासाचें मुख्य प्रयोजन असून त्याचे सर्वच तपशील कागदावर उठले आहेत असें नाहीं. ते सर्व समजून घेण्याची उत्कंठा पूर्वी होती तशीच आजही लोकांत आहे. प्रकरण बनलें तेव्हांच त्याची जिज्ञासा लोकांस किती वाटली त्याचें मार्मिक विवेचन परमानंदानें केलेलें आढळतें तें असें.

**शिवस्याफजलो वेद हृदयं स च तस्य तत्**
**तं विधिं तु विधिर्वेद वेद संधिविधिं जनः ॥**

**अर्थ** — कोणी एका पृच्छकानें दुसऱ्यास विचारलें, "अहो अफजलखानाचा हा वध कसा झाला तें सांगा कीं आम्हांला." "अहो कसा झाला हा वध म्हणून काय विचारतां ! शिवाजीच्या अंतःकरणांत काय आहे हें खान पूर्ण जाणत होता आणि खानाचे अंतःकरणांत काय वागतें हें शिवाजी जाणून होता. उभयतांच्या भेटींत काय घडलें तें फक्त ब्रह्मदेवास माहीत. बाहेर इतकाच प्रकार माहीत होता कीं, ह्या उभयतांचा सल्ला किंवा स्नेह बोलाचालीनें घडून येत आहे.

# बाजीप्रभूचें प्राणार्पण

## .१६.

अफजलखानाचा पाडाव हा शिवाजीच्या करामतीचा प्रचंड विक्रम होय. शक्ति व बुद्धि ह्यांचा हा उत्कट झगडा असून पाशवी सामर्थ्य बुद्धिप्रभावापुढें निःसत्त्व ठरलें. ह्या पुरुषाला देव साहाय्यक आहे, हा म्हणेल तें सिद्धीस नेईल, ह्याच्याशीं विरोध करून कोणाचाही निभाव लागणार नाहीं अशी भावना चहूंकडे पसरली. विजापूरच्या राज्याला अंतसमय दिसूं लागला. आजपात्रेतों मी तुमचा नम्र सेवक असून तुमचेंच लोकहिताचें काम मी करीत आहें ही शिवाजीची बतावणी आतां संपली, तितक्या प्रमाणांत त्याच्या स्वराज्याचें बळ वाढलें. मुसलमानांच्या अत्याचारांस महाराष्ट्रांत आळा बसला. शिवाजीचा प्रत्येक साहाय्यक इतउत्तर त्याच्यासारखाच स्वतंत्र उद्योग करून राज्यवृद्धि कमावूं लागला.

तथापि एवढ्यानें विजापुरदरबारचा सर्व दम संपला नाहीं. अफजलखानाचा पुत्र फाजलखान जाणता होता तो विजापुरास जाऊन शिवाजीवर सूड उगविण्याच्या प्रयत्नास लागला. ही बातमी शिवाजीलाही कळलीच; आणि हा झगडा वाढत जाणार म्हणून तो त्या तयारीस लागला. त्यासाठीं त्यानें प्रथम

विजापुरी राज्यावर आक्रमण करून अफजलखानाच्या मृत्यूनंतर अठराव्या दिवशीं त्यानें त्यांचा पश्चिमेकडील मोठा बळकट किल्ला पन्हाळा काबीज केला, तेणेंकरून त्या बाजूचें विजापूरचें राज्य संपलें. लगेच एक महिन्याच्या आंत शिवाजीनें वेळगांव धारवाड-पर्यंत चाल करून पुष्कळशी लूट पैदा केली. अशी ही संधि विजापूरराज्यावर हात मारण्याची आली तिचा क्षणभर विश्रांति न घेतां शिवाजीनें भरपूर उपयोग केला. अफजलखानाच्या वधानंतर दोनतीन महिन्यांत त्यानें त्या राज्याचा घाटावरचा व कोंकणचा मुलूख लुटून फस्त केला आणि पन्हाळ्याबरोबर विशाळगड, रांगणा इत्यादि बळकट किल्ले हस्तगत केले. दरम्यान अली आदिलशहानें विजापूरचा कारभार मातु:श्रीकडून आपल्या हातीं घेतला आणि सिदीजौहर म्हणून त्याचा एक कारभारी कर्नाटकांत होता त्यास शिवाजीच्या बंदोबस्ताचें काम सांगितलें.

इकडे शिवाजीनें आपली फौज वाढवून निरनिराळ्या दिशांस आदिलशहाचे मुलखांत आपले सरदार रवाना केले. तेव्हां तर हा संग्राम चांगलाच रंगला. विजापुरकरांशीं सामना देण्याच्या उद्देशानें स्वत: शिवाजी मार्च महिन्यांत पन्हाळगडावर जाऊन राहिला. सिदीजोहरनें येऊन पन्हाळ्यास वेढा घातला. नेताजी पालकर, मोरोपंत पिंगळे, प्रतापराव गुजर इत्यादि सरदार बाहेरून विजापुरी लष्करावर घाले घालूं लागले. स्वत: शिवाजी युद्धाची देखरेख करण्याकरितां गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर पन्हाळ्या-वर गेला, तो त्या वेढ्यांतच अडकून पडला. तीन चार महिने पन्हाळ्यावर मोठें रणकंदन माजलें. दिवसेंदिवस वेढा सक्त होऊन धान्य, वैरण, युद्धाची सामुग्री वगैरे बाहेरून किल्ल्यांत येणें सर्वथा बंद झालें. जिजाबाई शिवापट्टणास राहून युद्धाची खबर ठेवी, तिला शिवाजीचें कांहींच वर्तमान कळेना. तिनें नेताजी पालकरला बोलावून त्याच्याशीं उपाययोजना केली, पण तोही हताश बनला. किल्लेकरांना अन्नावांचून मरण्याची पाळी आली. किल्ला स्वाधीन करावा तर शिवाजीलाही शत्रूंच्या हातीं पडावें लागणार आणि एकदा त्यांच्या हातीं शिवाजी लागला कीं ते अफजलखानाच्या वधाचा सूड घेतल्याशिवाय राहणारे नव्हत. इतकें होईपर्यंत पावसाळा सुरू होऊन लष्करी हालचाली थोड्या मंदावल्या, हें पाहून शिवाजीनें केवळ आपल्या बुद्धिप्रभावानें कांहीं एक चमत्कार करून दाखविला, त्या योगानें सर्व शत्रुमित्र बुचकळ्यांत पडले.

वेढा निकरावर आला असतां शिवाजीनें आपले कांहीं वकील सलाबतखानाच्या भेटीस पाठविले आणि "माझा इलाज नाहीं, आपण जीवदान द्याल तर किल्ला सोडून मी स्वाधीन होतों" असें बोलणें लाविलें, तें खरें करून घेण्याकरितां खानानें शिवाजीस भेटीस बोलाविलें. दगा करणार नाहीं अशा शपथा घेतल्यावर शिवाजीनें जाऊन खानाची भेट घेतली आणि उद्यां स्वाधीन होतों असें सांगून तो परत किल्ल्यांत आला. त्या रात्रीं संग्राम ढिला पडला. उद्यां किल्ला व शिवाजी कबजांत येणार असा निश्चय ठरल्यानें वेढ्याचे लोक रोजचीं कामें सोडून पाहण्यामध्यें

बेफिकीर राहिले. १३ जुलई सन १६६० आषाढ वद्य १ प्रतिपदेचा दिवस, वारापाऊस जोराचा असून खानाचे लोक तह झाला ह्या भावनेंत खुशाल झोपीं गेले. किल्ल्याच्या सर्व चोरवाटा शिवाजीच्या परिचयाच्या असल्यामुळें मध्यरात्रीनंतर तो दहापांच जिवाचे सोबती बरोबर घेऊन एका अडचणीच्या वाटेनें चाहूल न लागतां बाहेर पडला. लगेच जोरानें धावत ही मंडळी रातोरात तीस मैल पळून दिवस उगवल्यावर विशाळगडाजवळ आली. तत्पूर्वी ह्या पळापळीची बातमी खानास पोंचून त्यानें चपळ स्वारांची तुकडी पाठलागास पाठविली. घोड्यावर पळत येऊन त्यांनीं विशाळगडाजवळ शिवाजीस गांठलें. घोडखिंड नांवाची अरुंद वाट विशाळगडांत शिरण्यास आहे त्या खिंडींत शिवाजीचा एक विश्वासू नोकर बाजी प्रभु म्हणून होता. त्यानें आपले साथीदार बरोबर घेऊन शिवाजीस इशारा दिला, "मी ह्या पाठलाग करणारांस ह्या अडचणीच्या खिंडींत अडवून धरतों, तुम्ही बचावून किल्ल्यावर जाऊन दरवाजे बंद करा." किल्ला तसा दुर्घट होता. बाजी प्रभूनें निकराचा सामना करून प्रहरभर शत्रूंस अडवून धरलें, आणि शिवाजीचा बचाव केला. इतक्यांत आणखी लोक त्या बाजी प्रभूवर चालून आले. त्यांच्याशीं लढतांना तो शूर वीर रणांगणीं मरून पडला. शिवाजीला आपण वांचविलें ह्या उदात्त कल्पनेंत त्यानें प्राण सोडला. असे प्राणार्पण करणारे सेवक शिवाजीनें पैदा केले म्हणूनच त्याला एवढें यश प्राप्त झालें.

पन्हाळ्याचें प्रकरण आटोपतांच शिवाजीनें विजापुरी कोंकण



ताबडतोब स्वारी करून कबजांत आणिलें. दाभोळपासून चिपळूण, संगमेश्वर, राजापूर, सावंतवाडी हा सर्व किफायतीचा प्रदेश शिवाजीनें हस्तगत केला. शृंगारपूरचे सुर्वे, राजापूरचे इंग्रज, सावंतवाडीचे मालक सावंत-भोसले अशा अनेक मंडळींना शिवाजीनें आपल्या सत्तेंत मिळवून घेतलें, ते सर्व प्रसंग महत्त्वाचे गणले जातात. त्यांतील राजापूरचा प्रसंग स्मरणीय बनण्याचें एक विशिष्ट कारण घडलें. हें व्यापाराचें बंदर मालानें गजबजलेलें, त्या वेळीं युद्धाच्या व राज्याच्या दृष्टीनें शिवाजीच्या सोयीचें असून तेथें इंग्रज कंपनीची मोठी वखार होती. हे इंग्रज परस्थ व्यापारी, त्यांना एतद्देशीयांच्या राजकारणी व्यवहारांत पडण्याचें कारण नव्हतें. पण पन्हाळ्याच्या वेढ्यांत त्यांनीं सलाबतखानास तोफा व दारू-

गोळा पुरवून शिवाजीचें भारी नुकसान केलें. हा दंश शिवाजी कसा विसरणार! राजापुरास येतांच त्यानें इंग्रजांस भेटीस बोलावलें. रेव्हिंग्टन व दुसरे सहा इंग्रज त्याच्या भेटीस गेले असतां त्या सर्वांस शिवाजीनें कैद करून अपरिचित किल्ल्यांवर बंदींत ठेविलें, आणि त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था उत्कृष्ट ठेविली. दोन वर्षांनीं त्यांस सोडून दिलें. शिवाजीची दहशत बसली. कोंकणचा हा भाग व मावळ प्रदेशाचा वरचा भाग आदिलशाही राज्यांत असल्यामुळें शिवाजीला प्रथम त्या राज्याशींच झगडावें लागलें. शिवाजीचें पहिलें चिमुकलें स्वराज्य सह्याद्रीच्या डोंगराळ भागांत निर्माण झालें, त्यांतूनच पुढें हिंदवी स्वराज्य व हिंदुपदपातशाही ह्या कल्पना उत्तरोत्तर बनत गेल्या. परिस्थितीनें त्याला विजापुराशीं विरोध करावा लागला, पण त्याचा खरा सामनेवाला दिल्लीपति औरंगजेब हा होता; आणि इतउत्तर त्याच्याशीं झगडण्यांतच शिवाजीचें जीवन पूर्णत्वास आलें. विजापूरचा तर पुढें त्यानें कैवार घेऊन बचावच केला. नियतीनें औरंगजेब व शिवाजी ह्या दोन प्रसिद्ध व्यक्ति निर्माण करून महाराष्ट्राचा इतिहास बनविला. हा झगडा कसा उत्पन्न झाला हें समजून घेणें आपल्या इतिहासाचें आद्य प्रयोजन आहे.



# शायिस्ताखाना-वर मात

## .१७.

औरंगजेब हा शहाजहान बादशहाचा पुत्र सन १६१८ त जन्मला, म्हणजे शिवाजीहून दहाबारा वर्षांनीं मोठा आणि शिवाजीच्या पश्चात् सदतीस वर्षे तो जगला, जणूं काय महाराष्ट्राचा परिपूर्ण इतिहास बनविण्याची मुख्य कामगिरी त्यास परमेश्वरानेंच ठरवून दिली होती. हा महाकपटी खोल विचाराचा व मुसलमानी धर्माचा कट्टर अभिमानी होता. शहाजी-शहाजहानच्या युद्धांत तो दक्षिणेंत असून सन १६३६ त शहाजहाननें अहमदनगरचें राज्य जिंकलें, त्या नवीन महाराष्ट्रीय प्रदेशाचा कारभार पाहण्यास बादशहानें ह्या आपल्या कर्तबगार पुत्राची नेमणूक केली. हा कारभार त्यानें प्रथम आठ वर्षें व पुन्हा सन १६५३ पासून चार वर्षें केला. ह्या अवधींत त्याला महाराष्ट्राची व मराठ्यांच्या हालचालींची पूर्ण ओळख झाली. शिवाजीचा समग्र उद्योग तो डोळ्यांत तेल घालून पाहात होता. सन १६५७ त शहाजहान अर्धांगवायूनें आजारी झाल्याचें वृत्त ऐकतांच हा औरंगजेब तावडतोब उत्तरेंत निघून गेला तेव्हां त्यानें विजापुरच्या आदिलशहास मुद्दाम बजावलें, "हा शिवाजी मोठा कात्रेबाज दिसतो, त्याजवर सूक्ष्म नजर ठेवा. हा तुम्हांस दगा

करील." पुढें औरंगजेबानें बापाशीं व भावांशीं युद्ध करून दिल्लीचें तख्त बळकावलें, बापास कैदेंत घालून भावांची वाट लावली, तो त्याचा दोन वर्षांचा उपद्व्याप वाचक जाणतात. राज्याधिकार हातीं येतांच त्यानें आपला कर्तबगार मातुल शायिस्ताखान ह्यास दक्षिणच्या कारभारावर नेमून त्याच्या हाताखालीं जसवंतसिंग राठोड ह्यास दिलें. ते दोघे शिवाजीवर त्वेषानें चालून आले.

खुद्द औरंगजेबानें त्यांस जळजळीत हुकूम सोडलेले पाहावे. तो लिहितो, "मराठ्यांना दयामाया बिलकूल दाखवूं नका. सापडतील तेथें कापून काढा. त्यांचा प्रदेश सर्व लुटून उध्वस्त करा. पुणें, चाकण वगैरे शिवाजीचीं स्थळें धुळीस मिळवा. जे कोणी शिवाजीचें साहाय्य करतील त्यांचा शिरच्छेद करा."

बादशहाचा हा भीषण निकर शिवाजीला हेरांच्या द्वारें पूर्णपणें कळून आला. सोनोपंत डबीर ह्यास पूर्वींच त्यानें औरंगजेबाच्या भेटीस पाठवून सलुयाचें बोलणें चालविलें होतें. म्हणजे आपला उद्योग काय आहे, आमचें म्हणणें तरी ऐकून घ्या, अशी विनवणी शिवाजीनें केली पण हे सर्व प्रयत्न औरंगजेबानें झिडकारून नवीनच दुष्टावा आरंभिला. औरंगजेबाला जेव्हां अफजलखानाचा प्रकार कळला तेव्हांच त्याला शिवाजीच्या खऱ्या कर्तृत्वाची पूर्ण कल्पना झाली आणि अखेरपावेतों त्यास त्यानें छळलें.

बुद्धिप्रभाव हें एकच तीक्ष्ण हत्यार शिवाजीपाशीं सदैव सज्ज होतें. शायिस्ताखानाची मगरमिठी सुटेना. प्रतिबादशहाच अशी त्याची मिजास होती. सन १६६० च्या जानेवारींत औरंगाबाद सोडून तो पुण्यास दाखल झाला आणि खुद्द शिवाजीच्या वाड्यांत तळ ठोकून राहूं लागला. शिवाजीनें सोनोपंतास खानाच्या भेटीस पाठवून शिष्टाईचें बोलणें चालविलें. खानानें तें मनावर घेतलें नाहीं. सुसज्ज तोफखाना, भरपूर फौज, मुबलक द्रव्य, हाताखालीं पराक्रमी साहाय्यक अशा तयारीनें खान शिवाजीचा साफ संहार उडवणार असा समय उद्भवला. हा प्रकार सारखा तब्बल तीन वर्षें चालला. आजूबाजूचे प्रदेश कबजांत घेऊन मावळांत मोगल फौजा धावल्या. राजगडावर धाड आली. कल्याणकडे मोगल फौजा घुसल्या, त्यांचा मात्र शिवाजीनें युक्तीनें फन्ना उडविला. त्या वेळीं कल्याणवर उतरण्याचा मार्ग सह्याद्रीच्या उंबरखिंडींतून होता. ही खिंड फार अरुंद व दहापांच मैल लांब होती. करतलबखान नांवाचा शूर मोगल सरदार ह्या फौजेवर मुख्य होता त्यास शिवाजीनें चांगलें गोत्यांत आणिलें. खानाची फौज खिंडींत पूर्णपणें उतरलेली पाहून शिवाजीनें मागचींपुढचीं प्रवेशद्वारें अडवून धरलीं आणि त्या अरुंद खिंडींत समग्र लष्कर अडकून अन्नपाण्याविना तडफडूं लागलें. रायबागण ही शूर ब्राह्मण स्त्री मोगलांचें साहाय्य करीत होती तिनें शिवाजीशीं रदबदली करून खानाची सुटका केली. करतलबखानाचा हा तेजोभंग शिवभारत-कारानें उत्कृष्ट रंगविला आहे तो वाचकांनीं पाहावा.

पण ह्या अल्प करामतीनें पुण्याची मिठी सुटली नाहीं. रात्रं-दिवस जावें तिकडे शत्रु पाठीवर, केव्हां पकडून ठार मारतील ही

शिवाजीच्या पोटांत सदैव धास्ती. अहोरात्र हा एकच शीण शिवाजीला तीन वर्षें भोवला. पुण्याच्या बंदिस्त छावणीवर समोर हल्ला करणें बिलकूल शक्य दिसेना. अशा स्थितींत अनेकांनीं विचार कर करून खानावर अवचित चोरटा छापा घालावयाचा बेत ठरविला. वाड्याची रचना शिवाजीच्या परिचयाची होती. त्याचाच तो राहता वाडा, पाठीमागच्या भिंती कच्चा होत्या त्यांत भोक पाडून कांहीं इसमांनीं वाड्यांत प्रवेश करून दंगल उडवावी आणि सांपडतील तितके इसम कापून काढावे. अशा ह्या कामास माणसें, साधनें, समय, बतावणी वगैरे तपशील कसोशीनें ठरविण्यांत आले. मोगलांचे पाहारे केव्हां कसे बदलतात, त्यांची संख्या किती, पोषाख कसे हें सर्व तपासल्यावर पहिल्या रात्रीं एका टोळीनें पाहारे सोडविण्याची कामगिरी व दुसरीनें मध्यरात्रीच्या सुमारास पडक्या भिंतींतून प्रवेश अशा स्वरूपाचा हल्ला शिवाजीनें ठरविला. सन १६६३ चा चैत्र महिना. मुसलमानांचा उपवासाचा काळ, शुक्रवार शुक्लाष्टमी ता. ५ एप्रिल हा दिवस मुक्रर झाला. पूर्वरात्रीं कांहीं मंडळींनीं मोगली पोषाख चढवून आपण पाहारेकरी सोडविण्यास चाललों असा बहाणा करून आंत प्रवेश केला. मोगलांस कांहीं एक कल्पना नाहीं. मंडळींनीं रमजानचा उपवास सोडून नुकती पहिल्या झोपेची ती वेळ. चंद्रास्त होतांच दिवे मालवून प्रयोग सुरू झाला. निजलेल्या माणसांवर एकदम तलवारींचे वार चालू लागल्यानें तोबा उडाला तो विचारूं नये. दरम्यान नवीन टोळ्या आंत घुसल्या. जनानखान्यांतील पडदानशीन स्त्रियांवर हे परके पुरुष तुटून पडले, तेव्हां एकच आकांत उडाला. ओरडाओरड होऊन खानाचे रक्षक आंत येण्यापूर्वींच पुष्कळसे लोक कापले गेले. कित्येक अवघडून पडले व दुखावले. त्याबरोबर शिवाजीच्या लोकांनीं पोबारा केला. पळ काढून जमवाजमव करीत दिवस उगवल्यावर मंडळी सिंहगडावर परत आली. मागाहून बातमी कळली कीं, खानाचा एक मुलगा, सहा बायका व दासी मारल्या गेल्या. खुद्द खानाचीं बोटें तुटलीं, दुसरे दोन मुलगे व आठ दासी जखमी झाल्या. खान मात्र जिवानिशीं निभावला. दुसरे दिवशीं जसवंत-सिंग सिंहगडावर चालून गेला, पण त्या किल्ल्यावर त्याचा इलाज चालला नाहीं. ह्या बनावानें समस्त मोगलांची मोठी नाउमेद झाली. शायिस्ताखानानें पुणें सोडून आपला मुक्काम औरंगाबादे-वर नेला. शिवाजीचा पुरा सूड घ्यावा अशी खानाची उत्कंठा होती, पण बादशहानें त्यास नालायक ठरवून त्याची बदली बंगाल प्रांतावर केली, तेव्हां खानास तिकडे निघून जाणें भाग पडलें. त्याची बायको औरंगजेबाची मामी शिवाजीवर इतकी चिडून गेली कीं, तीन वर्षांनीं शिवाजी बादशहाच्या भेटीस आग्र्यास गेला असतां तिनें शिवाजीस ठार मारण्याची पराकाष्ठा केली.

# हेरगिरीचा प्रहार

## १८

शायिस्ताखानावरील ह्या छाप्यानें जरी मोगलांचें संकट फारसें निवारण झालें नाहीं, तरी पुण्याची मिठी सुटून शिवाजी बाहेर संचार करण्यास मोकळा झाला आणि लोकांत त्याची दहशत बसली हा परिणाम थोडा नव्हे. औरंगजेबानें तर शिवाजीचा पिच्छा पूर्णपणें चालविला. मात्र स्वत: शिवाजीवर चालून येण्याची छाती त्यास उभ्या जन्मांत कधीं झाली नाहीं. शिवाजीनें औरंगजेबाचा कावा चांगला ओळखून तदनुसार पुढील उद्योग चालविले. दुर्बलानें समर्थावर मात करण्याचे उपाय शिवाजी योजूं लागला. शायिस्ताखानाच्या प्रकरणानें शिवाजीनें मोगल बादशहाशीं कायमचें वैर जोडलें. माघार घेण्याची सोय नव्हती. प्रचंड सामर्थ्य असलेल्या ह्या बादशहाशीं हा हीनबल शिवाजी संग्राम तरी कसा चालविणार ! फौज तोफा सजवायच्या म्हणजे खर्चाचें काम. हा खर्च कसा भागवायचा ह्याची विचक्षणा शिवाजीनें नेताजी वगैरेंशीं बोलून ठरविली कीं, बादशहाच्या विस्तृत मुलखांत जीं शहरें व प्रदेश समृद्ध आहेत ते बेलाशक लुटून पैसा उभारावा. शायिस्ताखानानें उघड युद्धाचा अवलंब केला, त्याचा प्रतिकार तशाच रीतीनें


करणें प्राप्त आहे. त्यासाठीं प्रथम शिवाजीनें आपले पद्वीचे हेर जमवून चहूंकडची बातमी आणण्यास पाठविले. औरंगाबाद, ब्ऱ्हाणपुर, धरणगांव, कारंजा अशीं किती तरी समृद्ध स्थळें व खानदेश, वऱ्हाड, गुजरातसारखे प्रदेश कैक वर्षांच्या शांततेनें धनसंपन्न बनले होते ते सर्व बेलाशक लुटून घ्यावे आणि फौज व तोफखाना सजवावा असा उपाय सर्वानुमतें ठरला. त्यासाठीं बातमी आणण्याची एक विशिष्ट हेरांची उभारणी शिवाजीनें केली आणि चहूंकडे हे नवीन दूत संचारार्थ पाठवून दिले. कोणत्या ठिकाणीं मोगल फौजा सज्ज आहेत, किल्ले व तटबंदीचा बंदोबस्त कोठें कसा आहे, सावकार व धनिक लोक कोण कोठें नांदतात, आपणाला अनुकूल पडतील असे गृहस्थ कोणी आहेत कीं नाहींत, अशा प्रकारची नानाविध माहिती मिळविण्याचा मोठा खटाटोप त्या वेळीं शिवाजीनें केला. त्यामुळें ही हेरगिरीची कला शिवाजीनें शिकस्तीनें पैदा केली. मराठ्यांचा तो व्यवसायच बनला. शिवाजीच्या स्वराज्ययोजनेचें हें एक प्रधान अंग त्या वेळीं कसें पूर्णत्वास पोंचलें हें समजून घेणें अवश्य आहे.

हेरगिरीचा पाया बहुरूपी सोंगें घेऊन बतावणी करण्यावर अवलंबून असतो. गोसावी, बैरागी, भिल्ल, भिक्षेकरी, अपंग अशा स्वरूपाची नक्कल वेळ पडेल त्याप्रमाणें अल्पावकाशांत करून दाखविण्याची ही कला आहे. त्यास साहित्यही तसें फार लागत नाहीं. खाकेंत पिशवी किंवा झोळणा, खांद्यावर घोंगडें किंवा धोतर, हातांत बांबूची लोखंडी वळीं बसविलेली मजबूद



काठी, डोक्यास कमी अधिक लांबीचें मुंडासें, कमरेस दुसऱ्या कांहीं मोलवान किंवा सटरफटर चिजा, नानाभाषांचें थोडेंसें ज्ञान आणि मुख्यत: प्रसंगावधान एवढी तयारी बस होते. हे सोंगाड्ये चहूंकडे भटकून जी माहिती आणीत, त्यावर शिवाजी व त्याचे हस्तक आपले बेत व मोहिमा ठरवीत. गेले बेत सिद्धीस तर चांगलेंच, आणि न सिद्धीस गेले तर फारसें नुकसान नाहीं, असा हा समर्थांना वठणीस आणण्याचा खेळ ह्या वेळीं शिवाजीनें स्वीकारला. सुरतेची लूट हा ह्या कलेचा पहिला प्रयोग होय. हेरांनीं अनेक ठिकाणची बातमी आणली ती लक्षांत घेऊन सन १६६३ अखेर शिवाजीनें सुरतेवर छापा

घालण्याचा बेत ठरविला. अहमदनगर, औरंगाबाद, बऱ्हाणपूर व सुरत अशा कित्येक मोगलाई नगरांचा बारीक शोध लावण्यांत आला. पैशाच्या दृष्टीनें त्या काळीं सुरतेइतकें धनाढ्य शहर समस्त बादशाहींत दुसरें नव्हतें. दिल्लीसुद्धा सुरतेच्या खालीं. शिवाय परदेशी व्यापारामुळें तेथें अपार संपत्ति जमा झाली असेल अशी कोणालाही कल्पना नव्हती. एका बाजूचें शहर. मक्केस जाणाऱ्या यात्रेकरूंशिवाय सुरतेचें नांव देखील बाहेर अपरिचित होतें. परदेशचें एकही जहाज सुरतेच्या बंदरांत आल्याशिवाय जात नसे. केवळ तेथें सोन्याचा धूर निघत होता असें म्हणणें अतिशयोक्त नव्हे. शिवाजीलाच एका हिंदु व्यापाऱ्याच्या घरीं अठ्ठावीस शेर वजनाचे मोत्यांचे कंठे प्राप्त झाले, ह्यावरून तेथील द्रव्यसंचयाची कल्पना करावी. आरब, हिंदु, खिस्ती असे निदान वीस तरी व्यापारी, दहावीस कोटींची मत्ता प्रत्येकाची असावी एवढे त्या नगरांत निर्वेध नांदत होते. व्यापारी मालाचे ढीग चहूंकडे पसरलेले असून युरोपीय गलबत माल नेण्यास आलें कीं तें अल्पावकाशांत भरलें जाई. शिवाय सुरतेस लष्करी बंदोबस्त मुळींच नव्हता. ह्या बाजूस शत्रूची धाड येईल असा संशयसुद्धा कोणास नव्हता. फौजेची नेमणूक मिळे ती अधिकारी लोक स्वत: खिशांत टाकून बेफिकीर राहात. अशा ह्या दूरच्या बंदरावर शनीसारखी शिवाजीची नजर वळली.




# सुरतेवर धाड

.१९.

नाक दाबलें कीं तोंड उघडावें अशी ही शिवाजीची युक्ति कोणाच्याही ध्यानींमनीं नव्हती. कोणीकडे पुणें आणि कोणीकडे गुजरातेंतलें सुरत. इकडे धाड येईल ही कल्पना तरी कोणास आणि त्याचा बंदोबस्त तरी कसा व्हावा ! आपण आतां कोणीकडे जाणार ह्याची वार्ता कोणास लागूं न देतां शिवाजीनें कल्याण-जवळ एक व नाशिकजवळ दुसरा असे दोन लष्करी तळ जमा केले आणि आवई पाडली कीं, कोंकणांत गोव्याच्या बाजूस मुलुखगिरी करणार. दोन्ही ठिकाणचा प्रत्येक शिपाई शिवाजीनें स्वतः निवडून पसंत केला. प्रत्येक छावणींतून दोन दोन हजार असे चार हजार सुसज्ज घोडेस्वार त्यानें प्रयाणासाठीं निवडले आणि सर्वांस ताकीद केली कीं, उदईक प्रातःकाळीं ता. १ जानेवारी सन १६६४ रोजीं कांहीं एक प्रश्न न विचारतां सर्वांनीं महाराजांच्या पाठोपाठ प्रयाण करावयाचें. काखेंत खाण्याची पिशवी, मांडीखालीं उमदा घोडा, हातांत भाला व कमरेस तलवार एवढी सामुग्री प्रत्येकाबरोबर होती.

शुक्रवारीं उजाडतांच शिवाजी कल्याण सोडून उत्तरेच्या बाजूस जाऊं लागला. लोकांस आश्चर्य वाटलें कीं स्वारी इकडे




कोणीकडे जाणार. पांचव्या दिवशीं सवाशें मैल मजल होऊन शिवाजीनें गणदेवीस मुक्काम केला. हें ठिकाण हल्लींच्या बिलिमोरा स्टेशनजवळ आहे. तेथून त्यानें आपले वकील सुरत तीस मैलांवर होतें तेथच्या मोगल अधिकाऱ्याकडे पाठवून त्याला कळविलें कीं, "बादशहानें आज कैक वर्षे आमचा उच्छेद चालविला असून त्याच्याशीं आमचें उघड युद्ध चालू झालें आहे. आम्हांस तो स्वगृहीं सुखानें धर्माचरणही करूं देत नाहीं. ह्यास्तव केवळ जीव जगविण्यासाठीं आम्हांस लढण्याशिवाय गत्यंतर नाहीं. अर्थात् युद्धास खर्च पाहिजे, तो सर्व लोकांनीं यथाशक्ति पुरवावा, ह्यासाठीं हातीं स्वराज्याची झोळी घेऊन आम्ही भिक्षाटण करीत आहों. सुरतेंत पुष्कळ धनाढ्य व्यापारी आहेत त्यांनीं आपसांत पन्नास लाखांची भिक्षा आम्हांस जमवून द्यावी म्हणजे कोणासही मारहाण न करितां आम्ही ही भिक्षा घेऊन लगोलग परत जाऊं. उगाच कोणाला इजा द्यावी अशी आमची इच्छा नाहीं. आमचें वैर बादशहाशीं आहे, लोकांशीं नाहीं, हें समजून बऱ्या बोलानें आमची पाठवणी सर्वांनीं करावी. तसें न केल्यास

लोकांवर जबरदस्ती करावी लागेल त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं."

अशा आशयाचीं वर्तमानें शिवाजीनें निरनिराळ्या व्यापाऱ्यांस व इनायतखान म्हणून सुरतेस सुभेदार होता त्याच्या नांवें देऊन आगाऊ वकील पुढें रवाना केले आणि ता. ६ रोजीं आम्ही सुरतेस दाखल होऊं, त्यांनीं समक्ष भेटून आमचा संतोष करावा अशी मागणी केली. लोकांस मोठें आश्चर्य वाटलें, कोण हा कोठला शिवाजी? त्याचें बोलणें एकानेंही मनावर घेतलें नाहीं. इनायतखानानें पत्र आणणाऱ्या त्या वकिलांस अटकेंत ठेविलें आणि आपण किल्ल्यांत जाऊन बंदोबस्तानें राहिला. ता. ६ रोजीं शिवाजीनें सुरतेस येऊन बऱ्हाणपूर दरवाज्यापुढें मुक्काम ठोकला. स्वतःची एक लहानशी राहुटी असून सभोंवार स्वार उतरले. तें पाहून इनायतखानानें आपलीं माणसें शिवाजीकडे पाठवून कळविलें. "तुम्ही कोण हें आम्ही ओळखीत नाहीं. तुम्ही आमच्या वाटेस जाऊं नये." शिवाजीनें त्याच माणसांबरोबर परत जबाब पाठविला, "मी कोण तें तुम्हांस कळेल." सावकारही कोणी शिवाजीच्या भेटीस आले नाहींत. तेव्हां शिवाजीनें आपले कांहीं अंमलदार शहरांत पाठवून प्रमुखांस जाहीर केलें, "शिवाजी-महाराज आले आहेत. त्यांस भेटून पन्नास लाख रक्कम पोंचवा. न दिल्यास शहरास तसदी पोंचेल." तरी कोणी हजर झाले नाहींत. तेव्हां शिवाजीनें स्वार पाठवून कित्येक व्यापाऱ्यांस पकडून आपल्यासमोर आणिले. दरम्यान किल्ल्यांतून इनायत-खानाचे दोन इसम शिवाजीच्या भेटीस आले आणि म्हणाले, 'खानाकडून आम्ही बोलणें करण्यास आलों आहों.' त्यावर शिवाजी त्यांस म्हणाला, 'खान असे बायकांसारखे लपून कां बसतात? आमच्या समक्ष येऊन कां बोलत नाहींत?' वकिलांनीं शिवाजीस जरा बाजूला बोलावलें आणि एकदम हातांतील खंजीर बाहेर काढून शिवाजीच्या पाठीस वार केला. शिवाजीही सावध होताच, थोडें रक्त आलें ह्यापलीकडे अन्य अपाय झाला नाहीं. जवळच्यांनीं लगेच त्या खुनी इसमांचे हात तोडले.

खुनाच्या ह्या प्रयत्नावरून तिसऱ्या दिवशीं शिवाजीनें उग्र स्वरूप धारण केलें. ता. ८ जानेवारीस शहरांत अनेक इमारतींनीं एकदम पेट घेतला. आग व लूट ह्यांची सरबत्ती चहूंकडे सुरू झाली. दोन दिवसपावेतों मोठी दंगल माजून शिवाजीपुढें लुटीचे ढीग जमा झाले. शिवाजीनें कित्येक व्यापाऱ्यांस आणून कैदेंत बसविलें. ह्या प्रसंगीं इंग्रज व डच व्यापारी आपापल्या वखारींत बंदोबस्तानें राहिले. त्यांची कुरापत शिवाजीनें काढली नाहीं. ता. १० रोजीं बातमी आली कीं, बऱ्हाणपुराहून मोगल फौजा शिवाजीच्या पारिपत्यास निघाल्या आहेत. त्याबरोबर सर्व लूट जमा करून कमी वजनाचें व मोलवान असें सामान घोड्यांवर लादून त्यानें लगोलग सुरतेंतून पाय काढला. निदान एक कोटीपासून पांच कोटींची मत्ता त्यानें लांबविली असा अंदाज आहे. बरोबर किंमती तरी कोणी किती केल्या असतील काय सांगावें! सुरतेची ही लूट व जाळपोळ केल्याबद्दल

कित्येक लोक शिवाजीस दूषणें देतात, पण शिवाजीला स्वराज्य स्थापायचें त्याला दुसरा मार्ग नव्हता. आजच्या विसाव्या शतकांतही पर्यायानें हीच युद्धनीति चालू नाहीं काय ? ॲटम बॉम्बचा संहार कोण मोजूं शकेल ? सुरतेच्या ह्या बनावानें शिवाजीची दहशत समस्त मोगल बादशाहीस बसली. कवि भूषण म्हणतो, " शिवाजीनें सुरतेची बेसुरत करून बादशहाच्या छातीवर एवढा जाळ पेटवून दिला कीं, त्याच्या धुरानें त्याच्या कीर्तीस कायमचा काळिमा प्राप्त झाला. " पुढें कैक वर्षे सुरतेचा व्यापार साफ बसला. बादशहाचें एक प्रकारचें नाकच कापलें गेलें. मक्केच्या यात्रेस नवीन विघ्न निर्माण झालें.



# शहाजीराजांचा अंत

## २०

संकट निवारण करायला जावें, तों त्यांतून दुसरा एखादा कठिण प्रसंग उत्पन्न व्हावा अशी शिवाजीच्या जीवनाची एक अनुबद्ध सांखळीच बनलेली दिसते. त्यांतही नवीन उद्भवणारें प्रकरण पहिल्याहून जास्त अनिवार्य अशी तऱ्हा निष्पन्न होत गेली. औरंगजेब बादशहा होऊन मराठ्यांच्या इतिहासास भलतेंच वळण देईल अशी आरंभीं अपेक्षा मुळींच नव्हती. सृष्टिक्रमानें दाराशेखो जर शहाजहानच्या पश्चात् राज्यावर आला असता तर महाराष्ट्राचें भवितव्य निराळेंच झालें असतें. ह्यास्तव इतिहास म्हणजे केवळ कार्यकारणपरंपरेचें उद्घाटन इतकेंच नसून त्यांत अकल्पित व अतर्क्य अशा नियतीची भर पडत जाते हें अभ्यासकांच्या लक्षांत पाहिजे. ह्यास इंग्रजींत The play of the unforeseen and the contingent असें नांव आहे. एखाद्या क्षुल्लक गोष्टीनें चालू व्यवहारास भलतीच कलाटणी मिळत जाते. ह्याचें नांव संसार आणि हा संसार म्हणजेच इतिहासाचा आविष्कार. असो.

स्वराज्याच्या उद्योगांत दिवसेंदिवस शिवाजी जास्तजास्तच गुरफटत गेला. ज्या प्रदेशांत त्याला स्वारी करावी लागली त्यांतलाच अंश पैदा होऊन स्वराज्य वृद्धि पावलें. सुरतेच्या स्वारीनें त्याचें

पूर्वीचें मावळांतलें राज्य उत्तरेकडे पसरूं लागलें. त्याला तशींच कारणेंही घडत गेलीं. शिवाजीनें दक्षिणेंतील मोगल अधिकाऱ्यांस जाहीरपत्रें लिहून विचारलें, “आज तीन वर्षें बादशहाचे मोठे सेनानायक आमचा प्रदेश काबीज करण्यासाठीं चालून येतात. बादशहा तुम्हांस तसे हुकूम करतात आणि तुम्ही त्यांस जबाब पाठवितां आतां लवकरच शिवाजीस काबीज करतों. आमच्या ह्या दुर्गम प्रदेशांत तुमचा इलाज चालत नाहीं. तुम्ही भलत्याच खोट्या बातम्या बादशहास लिहून आपली प्रौढी सांगतां ह्याची तुम्हांस शरम कशी वाटत नाहीं? इकडचा खरा प्रकार तुम्ही त्यांस कां नाहीं कळवीत! शायिस्ताखानानें तीन वर्षें बढाई मारली, परिणाम काय झाला तो जाहीर आहे. तुम्ही बादशहाकडे वाटेल तें लिहून पाठवा. मी आपलें कर्तव्य करीतच राहाणार. अफझलखानाची वाट काय झाली लक्षांत ठेवा.”


सुरतच्या लुटीनें शिवाजीचा धीर चेपला. उद्योग करूं तर पैशास काय तोटा असा त्याचा व त्याच्या साहाय्यकांचा उत्साह वाढत गेला. ठिकठिकाणीं धनसंचय आहेत, ते उद्योग केल्यास आपलेच आहेत, अशा भावनेंत शिवाजीचे हेर चहूंकडे हिंडूं लागले. सुरतेची लूट रायगडावर पोंचवून लगेच त्यानें राजापूर-मालवण, वेंगुर्ला वगैरे ठिकाणें कबजांत घेऊन दक्षिणेस राज्यवृद्धि केली. वाडीकर सावंतापासून उत्कृष्ट भवानी तलवार पैदा करून त्यास आपला साहाय्यक बनविलें. मुधोळचा बाजी घोरपडे व विजापूरचा सरदार खवासखान चालून आले त्यांचा शिवाजीनें फन्ना उडविला. एवंच स. १६६४ हें साल शिवाजीच्या पराक्रमाचा उच्च बिंदु प्रकट करतें. मालवणचा सिंधुदुर्ग व जवळचा विजयदुर्ग हे दोन प्रचंड जलदुर्ग त्यानें नवीन बांधून पश्चिम किनाऱ्याचा बंदोबस्त केला. एक कवि लिहितो —

> स चखान यदा यदा भुवं धनमिच्छासदृशं प्रलब्धवान् ।
> सकलाहि मही हिरण्मयी कृतपुण्यस्य नरस्य सर्वदा ॥
>
> — पुरुषोत्तम-शिवकाव्य १-१३

अर्थ — शिवाजीनें जिथें खणावें, तिथें तिथें त्याला स्वेच्छे-प्रमाणें धन प्राप्त होत जावें, असा त्याचा योग होता. पुण्यवान माणसाला सर्व पृथ्वीचा सुवर्णमय होय. तोरण्यावर जातांना झाडाच्या फांदीनें पालखी अडविली. शिवाजीनें आज्ञा केली पालखी कां अडते, इथें खणा पाहूं. जमीन खणतांच शिवाजीला पुरलेले द्रव्याचे हंडे प्राप्त झाले. शिवाजीचा हा प्रालब्धयोग त्या वेळीं सर्वत्र जाहीर होता.

सुरतेची लूट आणून मातेचें दर्शन शिवाजी घेतो, तोंच त्याला पित्याच्या मृत्यूची दुःखवार्ता येऊन पोंचली. शहाजीराजे विजापुरी राज्यांत कामावर होता. विदनूर काबीज करून बंगलोरास परत येत असतां तुंगभद्रातीरीं बसवापट्टणजवळ होदिकेरी येथें मुक्काम झाला. तेव्हां शिकारीचें जनावर जवळ आल्याची बातमी येतांच तो त्या नादांत तसाच घोड्यावर बसून धावत गेला. ईश्वरइच्छेनें घोड्याचा पाय जमिनीच्या भोंकांत अडकून दोघे खालीं पडले.

लगेच प्राण गेला. पुत्र व्यंकोजीराजानें येऊन उत्तरक्रिया केली. मृत्युदिन २३ जानेवारी स. १६६४. मातुश्रीस केवढें दुःख झालें त्याचें वर्णन करतां येत नाहीं. तिनें सती जाण्याचा आग्रह धरिला, पण शिवाजीच्या समजुतीस्तव तिनें तो बेत रहित केला. रायगडची उभारणी झाल्यावर वृद्धावस्थेंत जिजाबाईला ती भीषण चढण सोसेना म्हणून तिच्यासाठीं पायथ्याशीं पाचाड येथें स्वतंत्र निवास शिवाजीनें तयार केला, त्यांत तिचीं शेवटचीं कांहीं वर्षें गेलीं. गडावरून जातां येतांना तो मातेचें दर्शन घेऊन मग कोणतेंही काम हातीं घेत असे. पांचाड हें स्थळ अद्यापि वंदनीय बनलेलें आहे. त्यांत सुंदर पायऱ्या बांधलेली मधुर पाण्याची विहीर आहे, तीच भाविकांस त्या साध्वीची आठवण देते. मिळून स. १६४४ चा स्वराज्यारंभ, पुढील १६५४ ची स्वराज्यसिद्धि आणि १६६४ चीं अद्भुत कृत्यें हीं तीन दशकें त्याच्या आयुःक्रमाची चढती कमान दर्शवितात. तसेंच त्या पुढचें चौथें १६७४ चें दशक राज्याभिषेक समारंभामुळें सर्वांचा कळस समजतां येईल.



# शिवाजी-जयसिंह संवाद

## .२१.

सुरतेच्या अनपेक्षित प्रहारानें औरंगजेब गांगरून गेला. शायिस्ताखान गेल्यावर वर्ष सहा महिने त्यानें आपला वडील पुत्र मुअज्जम ऊर्फ शहा आलम व जसवंतसिंह ह्यांस दक्षिणचा कारभार सांगितला; त्यांच्या हातून शिवाजीचा बंदोबस्त कांहींच होईना, तेव्हां विचार कर करून त्यानें मीर्झा राजा जयसिंह व दिलेरखान ही जोडगोळी निवडून शिवाजीवर रवाना केली. जयसिंह कसलेला मनुष्य, औरंगजेबास बादशाही पद मिळवून देणारा, त्या वेळच्या दरबारांत प्रमुख असून राजकारण व युद्धकौशल्य दोनही कला खेळण्यांत निपुण असा होता. शिवाय शिवाजी हिंदूंचा कैवारी तसाच हा औत्तरीय राजपुत सेनानी शिवाजीवर गेल्यानें कांट्यानें कांटा काढल्यासारखें झालें. तथापि दोघांचें संगनमत घडून घात होईल ह्या शंकेस्तव बादशहानें आपला खास विश्वासाचा सेवक दिलीरखान ह्यास मुद्दाम बरोबर पाठवून जयसिंहावर दाब ठेवण्याची शक्कल लढविली. जयसिंह ह्या वेळीं साठीचे उमरींत असून अपयश हें त्याला कधीं माहीत नव्हतें. औरंगजेबाचा तर तो केवळ आत्मलिंग बनलेला होता. त्यास बादशहानें उत्कृष्ट साहित्य व भरपूर खजिना देऊन स. १६६४

अखेरीस दक्षिणेंत रवाना केलें. स. १६६५ च्या ९ जानेवारीस नर्मदापार होऊन १० फेब्रुवारीस तो औरंगाबादेस दाखल झाला. तेथें पुढील व्यवस्था लावून मार्चचे आरंभीं जयसिंह पुण्यास आला आणि सिंहगड काबीज करणें अवघड समजून त्यानें लगेच पुरंदर किल्ला घेण्याचा निश्चय ठरवून सासवडास आपली छावणी बनविली. त्याच्या आगमनाची वार्ता शिवाजीस गोकर्णमहाबळेश्वरास कारवार येथें असतां पोंचली, त्याबरोबर तो पुढील इलाज योजण्यासाठीं त्वरेनें परत आला, तों त्याला कळून चुकलें कीं जयसिंहाचा रोख सिंहगड व राजगड घेऊन शिवाजीचें स्वराज्य नाहींसें करण्याचा आहे; परंतु हे गड मोठ्या लष्करी छावणीला गैरसोयीचे म्हणून पहिला मारा त्यानें पुरंदरावर केला. दिलीरखानानें पुरंदरास वेढा घातला, तेव्हां तेथें शिवाजीचा सरदार मुरारबाजी रखवालदार होता, तो किल्ला लढवूं लागला. जयसिंहानें ह्याव्यतिरिक्त चहूंकडील शिवाजीचें साह्य बंद पाडून त्यास सर्व बाजूंनीं आवळीत आणलें. शिवाजीला आधार म्हणून उरला नाहीं. सर्व प्रांत मोगलांनीं व्यापला. पैशाची व अकलेची खैरात जयसिंहानें भरपूर वापरली. समग्र एप्रिल महिन्यांत मोगलांचा संचार इतका तीव्र बनला कीं आतां पुढें उभें राहाण्याला जागा नाहीं अशी शिवाजीची कुचंबणा बनली. वीस वर्षांची एकंदर करामत कोसळून पडणार! सर्व आभाळ फाटलें. पुढें काय! हा सर्व प्रकार कसा घडला त्याचा वृत्तान्त जयसिंह, औरंगजेब व दिलीरखान ह्यांच्या पत्रांत विस्तारानें दिला असून अभ्यासूंनीं तें सर्व वाङ्मय नीट लक्षांत घ्यावें.

जयसिंग आल्यावेळेपासून त्याजकडे बोलणें करण्यास शिवाजी आपले वकील सारखे पाठवीत होता. तह वगैरे करावयाचा किंवा भेटीच्या गोष्टी बोलतांच त्यास जयसिंहानें एकच उत्तर कळविलें कीं, " आम्हांस तुमच्या भेटीची किंवा तह करण्याची इच्छा नाहीं. बऱ्या बोलानें विनशर्त शरण या आणि किल्ले सर्व सोडून द्या; बादशहा कृपा करतील ती मान्य करा, नाहीं तर आम्ही तुमचा सर्व प्रदेश काबीज करीतच आहों. तुमचा निभाव लागणार नाहीं." ह्या कठोर जबाबानें शिवाजीची अत्यंत निराशा झाली. प्रथम शरणागति, मग पुढें भेटीचीं बोलणीं, असें जयसिंहाचें धोरण लक्षांत आणतां हा हिंदु असून आपल्या धर्माबद्दल बिलकूल पर्वा करीत नाहीं ह्याबद्दल शिवाजीला भारी संताप आला. मातुश्री व सल्लागार ह्यांच्याशीं त्यानें भरपूर चर्चा केली. इतक्यांत दिलीरखानाशीं लढतांना मुरारबाजी व त्याचे सैनिक पुष्कळ मारले गेले आणि किल्ला मोगलांच्या ताब्यांत जाण्याची वेळ आली. अशा स्थितींत सर्वांच्या विचारें आपण होऊन शिवाजी सासवडच्या छावणींत जयसिंहाच्या भेटीस गेला, बरोबर एक चाकर व वकील रघुनाथ पंडित. रघुनाथ पंडितानें पुढें जाऊन वर्दी दिली, शिवाजीराजे येतात. भेटीची जरूर नाहीं असें उत्तर जयसिंह देतो तोंच शिवाजी समोर आला. मग त्यास जयसिंहानें आंत नेऊन त्याच्याशीं बोलणें केलें. दोन दिवस ठेवून घेतलें.



प्रथम जयसिंहानें शिवाजीस पुरंदरखालीं दिलीरखानाच्या भेटीस पाठविलें. नंतर खान व शिवाजी असे दोघे जयसिंहाकडे परत येऊन भेटले. एकत्र बोलणें होऊन तह ठरला, कीं शिवाजीनें आपले तेवीस किल्ले बादशहाच्या कब्जांत द्यावे, फक्त तेरा आपल्याकडे ठेवून इतःपर बादशहाची चाकरी इमानानें करावी. हा तह जयसिंहानें यथाकाल बादशहाकडून मंजूर करून आणिला आणि शिवाजीस सूचना केली कीं "तुम्ही स्वतः आग्र्यास जाऊन बादशहाची भेट घ्यावी म्हणजे ते तुमचा उत्कर्ष करतील. तुमच्या जिवास अपाय होणार नाहीं ह्याची खात्री आम्ही देतों." ह्याप्रमाणें पुढील व्यवहार घडून आला. शिवाजीनें बादशहाची सेवा पत्करून जयसिंह विजापूर जिंकण्यास चालला होता, त्याची साथ शिवाजीनें करून आपलें कर्तव्य पुरें केलें.

शिवाजी जयसिंहाच्या ह्या भेटीचा व शरणागतीचा विस्तार एवढा मोठा आहे कीं तो थोडक्यांत सांगणें शक्य नाहीं. शिवाजीला मोठी उमेद होती कीं हा राजपुत गृहस्थ स्वधर्माभिमानी असेल, निदान आपण त्याला वोढून धर्माचा पाझर आणूं, स्वराष्ट्राच्या आपल्या उद्योगांत त्यास गोवून औरंगजेबाचा गर्व उतरवूं. ही शिवाजीची मनीषा तूर्त पुरी झाली नाहीं. योगायोग असा घडला कीं पुढें दहा पंधरा वर्षांनीं औरंगजेबाला ह्या राजपुतांविरुद्ध युद्ध करावें लागलें, तें अगोदरच झालें असतें तर शिवाजी-राजपूत मिलाफानें हिंदुपदपातशाहीची निर्मिति शिवाजीच्या उद्योगांतून सफल व्हावी असा तो काल होता. शिवाजी-जयसिंहाच्या भेटीचें एक मार्मिक कवन फारसींत उपलब्ध आहे त्यांत त्या उभयतांचा संवाद समक्ष असणाऱ्या निरीक्षकानें लिहिलेला अभ्यासूंनीं अवश्य वाचावा. त्यांतील थोडा मतलब संवादरूपांत पुढें देतों.

**शिवाजी**—तुम्ही एवढे पराक्रमी, राजपुत म्हणून लौकिक मिरवितां आणि स्वधर्माविषयीं बेफिकीर होऊन त्या दुष्ट बादशहाची सेवा करण्यांत धन्यता मानतां ही मोठी लाजीरवाणी गोष्ट आहे. ह्यापेक्षां लढून प्राणार्पण केलेलें काय वाईट !

**जयसिंह**—तुम्ही म्हणतां तें मलाही मान्य आहे, पण आज हा बादशहा सर्वशक्तिमान असून त्याचे आम्ही एकनिष्ठ सेवक आहों. त्याचे हुकूम पाळणें आमचें कर्तव्य आहे.

**शिवाजी**—मग शहाजहान बादशहाचे तुम्ही सेवक असतां त्याच्याशीं दगाबाजी करून तुम्ही औरंगजेबास सामील होऊन दाराचा वध केला तेव्हां कोठें गेली होती तुमची ही निष्ठा? शहाजहानशीं विश्वासघात करतांना तुमची ही लाज कोठें गेली होती? दाराशेखोनें तुमचा काय अपराध केला होता कीं तुम्ही त्यास पकडून औरंगजेबाच्या हातीं द्यावें?

**जयसिंह**—मागें व्हावयाच्या गोष्टी होऊन गेल्या, त्यांचा आतां संबंध उरला नाहीं.

**शिवाजी**—केलेल्या पापाचीं फळें तुम्हांस भोगावीं लागतील. त्यांतून तुम्हांस सुटका मिळणार नाहीं.

हा संवाद होऊन फार काळ लोटला नाहीं. जयसिंहाच्या पापाचे घडे भरले. शिवाजी आग्र्यास जाऊन बादशाही कैदेंतून निसटला त्यास हा जयसिंह व त्याचा पुत्र सामील आहेत असें समजून बादशहानें त्यांना नोकरींतून दूर केलें. दक्षिणेंत असतांच अप्रतिष्ठा होऊन हा बादशहाचा एकनिष्ठ सेवक मीर्झा राजा जयसिंह ता. २८ ऑगस्ट स. १६६७ रोजीं बऱ्हाणपूर येथें मरण पावला. शिवाजीची कठोर वाणी खरी झाली.

# सिंहाच्या जबड्यांत

## .२२.

आतां आपण पुढील प्रकार पाहूं. कबूल केल्याप्रमाणें २३ किल्ले शिवाजीनें सोडून दिले. त्यांतला मुख्य सिंहगड स्वतः शिवाजीनें तेथें जाऊन जयसिंहाच्या हवालीं केला. समस्त किल्ल्यांच्या प्रवेशद्वारांच्या किल्ल्या जयसिंहानें बादशहाकडे पाठवून दिल्या. पुढें शिवाजीनें बादशहाच्या भेटीस जाऊन त्याची समजूत पाडावी असा आग्रह जयसिंहानें शिवाजीस चालविला. बादशहाची खरी पारख जयसिंहापेक्षां शिवाजीलाच बरोबर होती. तो महाकपटी, प्रसंग पडेल तसें वागणारा, वाटेल तेव्हां बिनदिक्कत वचन मोडणारा निगरगट्ट अशी शिवाजीची बालंबाल खात्री होती. त्याच्या भेटींत आपल्या जिवास अपाय होणार हें ओळखीत असतांही अनेक कारणांस्तव शिवाजीनें हा जिवावरचा खेळ मुद्दाम पत्करला. जयसिंहाशीं त्याच्या गांठीभेटी चार आठ महिने पुष्कळ होऊन मनमुराद खल झाला. संकट आलें तर बुद्धि-प्रभावानें आपण निभावूं शकूं अशी मनांत खात्री होती. त्याच्या अंतःकरणांतली मोठी तळमळ हिंदुपदपातशाहीची. ह्या मुसलमानांनीं शेंकडों वर्षें हिंदभूमीवर आक्रमण करून लोकांस छळलें, एकाकडूनही त्यांचा प्रतिकार झाला नाहीं, तो आतां

आपण कां न करावा. दक्षिणची भरपूर माहिती आपणास आहे, परंतु उत्तरेची ओळख आपणास नाहीं. आपण औरंगजेबाचें नुसतें नांव ऐकतों पण त्याचें सामर्थ्य काय आहे, कारभार कसा चालतो, लोकविचाराचे प्रवाह कसे वाहतात, तिकडे आपणास शत्रुमित्र कोण, आपण दक्षिणेंतून उठावा केला तर त्याला उत्तरेंतून कितीसा पाठिंबा मिळेल, त्याचे उमराव व प्रजा त्याजवर किती अनुरक्त आहेत हे प्रकार प्रत्यक्ष आपण डोळ्यांनीं पाहून येणें आपल्या भावी उद्योगास जरूर आहे हें शिवाजीनें ओळखलें आणि मुद्दाम होऊन सिंहाच्या गुहेंत शिरण्याचा निश्चय केला. बादशहाच्या भेटीस गेलेंच पाहिजे अशी अट नव्हती. आपण स्वधर्मस्थापनेसाठीं जन्मास आलों तो प्रयत्न प्राणार्पण करूनही सिद्धीस नेला पाहिजे ही त्याची मनोदेवता सांगत होती.

औरंगजेबाच्या छळानें त्रस्त झालेल्या प्रजांना सोडवावें असा आदेश प्रत्यक्ष परमेश्वरानें आपणास दिला आहे अशी खुद्द शिवाजीची भावना होती. तर ह्या कार्यासाठीं आपण बादशहाची भेट घेतलीच पाहिजे अशी त्याची विचारी दृष्टि बनली. ह्या परिस्थितीचा भरपूर विचार त्यानें जयसिंहाशींही केला. जयसिंह एका अर्थानें शिवाजीस सामील झाला अशी खुद्द बादशहाची खात्री झाली. वेळ पडली तर हे दोघे हिंदु एक होऊन आपणास उडवून देतील ही दहशत बादशहाच्या मनांत सदैव वागत होती. तेव्हां तसा प्रयत्न शिवाजीनें स्वीकारला ह्यांत वावगें कांहीं नाहीं. तो आपल्या ब्रीदास जागला असेंच इतिहास बोलेल.

भूतलावरील अत्यंत ऐश्वर्यवान बादशहा औरंगजेब आणि मावळच्या जंगलांत वाढलेला खेडवळ शिवाजी ह्यांची ही भेट अनेक कारणांनीं अपूर्व मानली जाते. महाराष्ट्राचे व उत्तरेंतील जनतेचे डोळे ह्या भेटीवर अल्प काळ खिळून गेले. एक मनांत विचार करतो कीं हा प्राणी येऊं दे तर खरा आपल्या तावडींत, आपण त्यास क्षणमात्रांत चिरडून टाकूं. दुसऱ्याच्या मनांत विचार कीं कसा प्रसंग आला असतां काय करावें ? उभयतांचे मनास निश्चिति मात्र बिलकूल नव्हती. दोघेही एकमेकांवर मात करण्यास टपले होते. बादशहानें अत्यंत गोड भाषेनें व आदरप्रदर्शनानें शिवाजीस भेटीचें आमंत्रण दिलें, त्याच्या खर्चाची भरपूर तजवीज केली; आणि रस्त्यानें समस्त अधिकाऱ्यांनीं त्याचा योग्य सत्कार करावा असे खास हुकूम सोडले. शहाजहान आग्र्याच्या किल्ल्यांत पुत्राचा कैदी होता, तेथेंच मयूर सिंहासन होतें, तो स. १६६६ च्या फेब्रुवारींत मरण पावला. पुढील तीन महिने सुतकांत गेले. १२ मे स. १६६६ हा दिवस औरंगजेबाच्या राज्यारोहणाचा होता त्या दिवसापूर्वीं शिवाजीनें आग्र्यास येऊन पोंचावें असा कार्यक्रम ठरला. पुत्र संभाजी, अनेक साहाय्यक व तीनशें शिबंदी असा मेळा घेऊन मार्चच्या आरंभीं शिवाजी रायगडाहून निघाला, तो वेळेवर आग्रा येथें दाखल झाला. जयसिंहाचा पुत्र रामसिंह बादशहाजवळ होता त्यानें त्या राजधानींत शिवाजीचा सत्कार ठेविला.

# दुःसह अपमान

## २३.

एक निरीक्षक लिहितो, शिवाजीचा बांधा सडपातळ, वजन सुमारें दीडशें पौंडांच्या अंदाजांत व वर्ण निमगोरा असून पाहतांक्षणीं हा कोणी जबरदस्त पुरुष असावा अशी त्याची छाप पडते. दाढी राखली असून उंची मध्यम साडेपांच फुटांच्या आंत असावी. अणकुचिदार पोपटी नाक ही त्याची मुख्य खूण लगेच मनांत भरे. शनिवार १२ मे रोजीं रस्त्यांत थोडी चुकामूक होऊन शिवाजी आग्रा येथें सकाळच्या प्रहरीं बादशहापुढें आला. ठरलेल्या वेळेपेक्षां त्यास उशीर झाल्यामुळें त्या प्रसंगाचा दिवाणीआमचा दरबार आटपून बादशहा दिवाणीखासमध्यें बसला असतां कुमार रामसिंहानें शिवाजी व संभाजी ह्या दोघांस बादशहापुढें आणिलें. या ‘ शिवाजी राजे ’ असे शब्द बादशहानें उच्चारतांच शिवाजीनें पुढें जाऊन १५०० मोहरांचा नजराणा व एक हजार रुपयांचा सत्का म्हणजे ओंवाळणी ठेवून तीन वेळां प्रणाम केला. त्या वेळीं बादशहानें रामसिंहाकरवीं शिवाजीस पाठीमागच्या रांगेंत नेऊन उभें केलें. लगेच शिवाजीनें रामसिंहास विचारलें हे माझ्या समोर व बाजूला कोण आहेत. त्यांचीं नांवें सांगतांच बादशहानें वचन मोडून आपला अपमान केला अशी :शिवाजीची खात्री

पटली. शहाजाद्यांप्रमाणें दरबारांत शिवाजीचा मान राहावा असा पूर्वींचा ठराव होता. त्याविरुद्ध भरदरबारांत असा आपला अपमान बादशहानें केल्याबद्दल शिवाजीला भारी चीड आली आणि दरबारची शिस्त मोडून तो तसाच बाजूला जाऊन खालीं मटकन घालून बसला. हें बादशहानें पाहून रामसिंहास जवळ बोलावून त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. तुमच्या तक्रारी ऐकून मागाहून त्यांचा निकाल करूं असें सांगून त्यास रामसिंहा-करवीं मुक्कामावर पाठविलें. "अपमान करण्यापेक्षां पाहिजे तर माझें येथें डोचकें मारा" असे कांहीं क्रोधयुक्त शब्द शिवाजीनें जातांना उच्चारले, आणि दरबारीं शिस्त मोडली. बादशहाची खात्री झाली कीं हें प्रकरण सामान्य नव्हे. दोघांनाही पुढील परिणामाची कल्पना झाली आणि तदनुसार प्रकार बनत गेले. हीच काय ती अल्पावकाशाची त्या दोन प्रसिद्ध व्यक्तींची पहिली व शेवटची भेट.

हा प्रकार ता. १२ मेचा असून पुढील तब्बल तीन महिने-पावेतों उभयपक्षांत अनेक रंग बनून आले ते सर्व लिहूं म्हटल्यास मोठा ग्रंथ होईल. रामसिंह शिवाजीस सामील आहे अशी बादशहाची पक्की समजूत होऊन त्याजवर इतराजी झाली. तोच प्रकार बादशहानें मीर्झा राजाचा केला आणि त्यास पुढील सल्ला विचारली. जयसिंहानें उत्तरीं बादशहास कळविलें, "शिवाजीस विनाकारण दुखवूं नये. अपाय केल्यास वाईट परिणाम होईल. वचन मोडून त्यास शासन करणें राज्यास बाधक झाल्याशिवाय राहाणार नाहीं." हा जयसिंहाचा इशारा बादशहास रुचला नाहीं. दरम्यान दरबारांत, लोकचर्चेंत, आंतबाहेर सारखा हा शिवाजीचा एकच विषय चर्चिला जाऊन जो तो आपापल्यापरी तर्ककुतर्क चालवीत होता. शायिस्ताखानाची बायको खटपट करूं लागली कीं ह्यास एकदम मारून टाकावा. उलटपक्षीं पुष्कळ विचारवंतांना व प्रत्यक्ष बादशहाच्या एकदोन मुलींना शिवाजीबद्दल कौतुक व आदर उत्पन्न झाला. उपवर मुलींना असा वीर पुरुष पाहतांच त्याजवर मर्जी बसावी असा तो काळ होता. जनानखान्यांत किती तरी मुली समान योग्यतेचा नवरा मिळत नाहीं म्हणून पिचून जाऊन वृद्धावस्थेस पोंचत. औरंगजेबाच्याच चार प्रबुद्ध मुली सुविद्य असून वाटेल तशा खटपटी करण्यांत कालक्रमणा करीत. बादशहाचा प्रधान जाफरखान विचारी होता, त्याची बायको शायिस्ताखानाची व मुम्ताजमहलची बहीण. शिवाजीनें प्रधानाची भेट घेण्याचा प्रयत्न केला. तो त्या बाईनें सिद्धीस जाऊं दिला नाहीं. तिनें नवऱ्यास कळविलें, "तुम्ही ह्यास भेटूं नका, हा तुमचा प्राण घेईल. नानाप्रकारच्या चेटकी विद्या हा जाणतो, भलतेंच अरिष्ट उभें करील." शिवाजीबद्दलच्या अशा अवास्तव भावना त्या वेळीं देशभर लोकांत पसरलेल्या होत्या. त्याला कांहीं अद्भुत विद्या अवगत आहेत, म्हणून तो पाहिजे त्याला आहारीं आणतो असें लोक समजत. ह्या प्रकारचे समज प्रचलित असल्यानें ते तीन महिने आग्र्यांत कसे गाजले असतील हें कल्पनेनें जाणलें पाहिजे.


दरम्यान शिवाजीनेंही आपल्या बचावाचे शक्य ते इलाज चालविले. अर्ज, भेटी, पहारे, बंदोबस्त अशांची चर्चा सारखी चालू होती. शिवाजीस मुसलमान बनवून राज्याच्या कामांत घ्यावा अशी सूचना होती. त्यास एकदम मारून टाकावा अशी दुसरी सूचना. ह्यांतून निभावणी कशी करायची ही शिवाजीची विवंचना. असे किती तरी प्रयोग सुचविले गेले. शिवाजीचा मुक्काम रामसिंहाच्या बागेंत होता, तेथें पहाऱ्याचा बंदोबस्त नीट राहात नाहीं अशी तक्रार पोलीस अधिकारी पोलादखान ह्यानें बादशाहाकडे केली, तेव्हां दुसरी एक बंदिस्त इमारत तयार होत होती तेथें शिवाजीस ठेवण्याचा हुकूम बादशहानें दिला. आपले दिवस भरले असा ह्याचा अर्थ शिवाजी उमगला. दरम्यान संभाजी बादशहाचे दरबारास जात असे. राजधानींत दरबारी, उमराव व इतर गृहस्थ होतेच. त्यांजकडे शिवाजीनें वशिला बांधण्याची खटपट चालविली. कांहीं तरी भेट पाठविण्याचा रिवाज त्या काळीं जारी होता. फळांच्या व मिठाईच्या करंड्या, केव्हां हमालाच्या डोईवर तर केव्हां कावडीनें पोंचवीत. पहाऱ्यावरील व इतर लोक जवळ असत त्यांचा परिचय शिवाजीनें केला. कैदेंतून कसें निसटावें हाच एक अहर्निश ध्यास जवळच्या मंडळींशीं बोलण्यांत चालू झाला आणि नवीन घरांत जाण्यापूर्वी सुटकेचा बार उडवून देण्याची तयारी शिवाजीनें निश्चित केली.



# अद्भुत प्रयोग

## .२४.

होतां होतां प्रकृति बिघडल्याचा बहाणा शिवाजीनें करून औषधोपचार चालू केले. अस्वस्थ आहेत, झोंप लागत नाहीं अशी स्थिति झाली. ता. १७ ऑगस्ट शुक्रवार स. १६६६ ह्या दिवशीं फार प्रकृति बिघडली असें दर्शवून अंथरुणांत निजून राहिले. जवळ नोकर पाय चेपीत बसले. सायंकाळीं अंधार पडण्याच्या संधीस मिठाईच्या टोपलींत संकोचानें बसून बापलेक दोघे दोन कावडींतून बाहेर पडले आणि यमुनापार होऊन उत्तरेकडे गेले. कोठें कसे गेले, वेष काय घेतले, मदतनीस कोण इत्यादि तपशील कागदावर लिहिलेला उपलब्ध नाहीं. प्रत्येकानें कल्पना चालवावी. हिरोजी फर्जंद, मदारी मेहतर, रघुनाथ पंडित, परमानंद कवि असे किती तरी ह्या कामांत खपत राहिले. दुसऱ्या दिवशीं दोन प्रहर पूर्वी तपास लागला कीं पिंजऱ्यांतला पोपट उडून गेला. चेटकी विद्येनें अदृश्य होऊन पळाला असें पोलादखानानें बादशाहास कळविलें. तें सर्व खरें मानण्याइतका बादशाह भोळा नव्हता. मथुरा, अयोध्या, प्रयाग, इत्यादि यात्रा बैराग्याच्या वेषानें करीत पूर्वेकडील गोंड-वनांतून शिवाजी तीन महिन्यांनीं मार्गशीर्ष शुक्ल ५ ता. २० नोव्हेंबर रोजीं तो अवचित रायगडास मातुश्रीपुढें प्रगट झाला.




त्यास पकडण्याचे जहाल हुकूम बादशाहानें सोडले असल्यामुळें नेहमींच्या वाटा त्यानें टाळिल्या. तीन महिने प्रवासास लागले. बादशाहास ह्या गोष्टीनें भीषण उद्वेग उत्पन्न झाला. ह्यास ताबडतोब ठार मारलें नाहीं ही जन्मांतली आपली मोठी चूक असें बादशाहास मरेपर्यंत सारखें जाचत होतें. तीन महिन्यांच्या आग्र्याच्या मुक्कामांत बादशाहास एक दिवसही चैन पडलें नाहीं. हा शिवाजी लपतछपत संधि साधून केव्हां येऊन आपल्या जिवास अपाय करील ह्या दहशतीनें बादशाहा अत्यंत बंदोबस्तानें रात्रीचा देखील जागत राहात असे असें वर्णन आहे. मारुतीप्रमाणें एकदम लांब उडी मारतो अशी शिवाजीबद्दल

अफवा होती, ती देखील बादशाहास माहीत असली पाहिजे. ह्यास्तव पुन्हा एकदाही बादशाहानें शिवाजीस समक्ष भेटीसाठीं जवळ आणलें नाहीं. बादशाहाचा दीर्घद्वेषी स्वभाव आग्रा येथें सर्वतोमुखीं होता. भावांची, प्रत्यक्ष बापाची व पुत्राची वाट त्यानें कशी लावली हे प्रकार त्या वेळीं लोकस्मरणांत ताजे होते. बलवान लोक सत्तेच्या जोरावर दुर्बलांस छळतात तेव्हां लहानशा जीवजंतूंना सुद्धा आत्मसंरक्षणाकरितां चेव आल्याशिवाय राहात नाहीं, तशी दशा त्या तीन महिन्यांत शिवाजीची होती. केवळ बुद्धिप्रभावानें तो निभावला. टोपलींतून निघण्याची एकच कल्पना शिवाजीच्या मनांत होती असें नाहीं. नानातऱ्हेच्या दुसऱ्या युक्त्या कैक दिवस मनांत घोळवीत शेवटीं ही एक त्यानें स्वीकारली. किती वैद्य, किती हुन्नरी लोकांकडे सुटकेसाठीं शिवाजीनें त्या अवधींत अनुसंधानें लावलीं असतील सांगवत नाहीं. शिवाजी-सारखे दिसणारे किती तरी प्रवासी संशयावरून पकडलेले बादशाहानें नंतर मारून टाकले. शिवाजीच्या पलायनांत बहुधा प्रयाग येथें कविकलश ह्या गृहस्थाचा परिचय क्षेत्रोपाध्या म्हणून शिवाजीस घडला असावा.

शिवाजीच्या अद्भुत सुटकेची बातमी हां हां म्हणतां तावडतोब देशभर पसरून लोकांत त्याजबद्दल अपरिमित कुतूहल निर्माण झालें. प्रत्यक्ष परमेश्वर त्यास साह्य आहे असें लोक म्हणूं लागले. औरंगजेबाला कपटनीतीचें योग्य फळ मिळाल्याबद्दल सर्वत्र संतोष निर्माण झाला. त्याच्या कीर्तीनें व जयघोषानें महाराष्ट्र तर दुमदुमूं लागलेंच, पण आग्र्यांतील ह्या सुटकेनें शिवाजी हा अखिल हिंदचा आधार बनला. सर्व देशांतून अनेक लोक मुद्दाम त्याच्या दर्शनास महाराष्ट्रांत येऊं लागले. छत्रसाल बुंदेला, कविभूषण, परमानंदबावा, गागाभट्ट असे किती तरी औत्तरीय गृहस्थ शिवाजीच्या भजनीं लागले. मातेच्या आनंदास तर पारावारच नाहीं. तिनें व शिवाजीनें दानधर्म करून परमेश्वराचे उपकार मानले. समस्त महाराष्ट्र आनंदलहरीनें फुलून निघाला. नानाविध साहाय्यकांचे उपकार यथायोग्य फेडण्यांत आले. पण ह्या सर्वांहून खुद्द शिवाजीला बादशाही कारभाराचा व उत्तरेंतील घडामोडींचा जो प्रत्यक्ष अनुभव आला तो तर बहुमोलच समजला पाहिजे. बादशाहीची मिजास व अंदाधुंदी त्याच्या नजरेंत भरून त्याच्याशीं वागण्याचा पूर्वीचा पवित्रा शिवाजीनें साफ सोडून दिला. उघड युद्धसंग्राम टाळून भेदनीतीचें व सामोपचाराचें धोरण आतां पुढें शिवाजीनें स्वीकारलें. बादशाहाला प्रतिशह देण्या-करितांच, स्वतःस राज्याभिषेक करून नवीन समान प्रतिस्पर्धी निर्माण करण्याची, कल्पना जन्मास आली. हिंदुपदपातशाहीचा देखावा दृष्टिपथांत अवतरला. इतउत्तर अनेक नवीन काव्याचे प्रसंग ह्यापुढें शिवाजीनें स्वीकारले नाहींत. आग्र्यांतील सुटका ह्या एका प्रचंड प्रसंगानें इतर कपट प्रकार मागें पडले. साल्हेरीवर उघड रणसंग्राम दीर्घकाल करून शिवाजीनें बादशहास जर्जर केलें. स्वतःच्या राज्यकारभारांत सर्व लक्ष घालून देशाची आबादानी हेंच राज्याचें खरें फल हा परिणाम

राज्यांत त्यानें घडवून आणिला. खुद्द बादशहाला त्यानें गोड पत्रें लिहून व नरमाईचें वर्तन स्वीकारून त्याला थोडेंबहुत शांत केलें. त्यानें बादशहाशीं नवीन तह केला, त्यांत बादशहानें त्याला राजे हा किताब दिला आणि आपण आपल्या लष्करानिशीं बादशाहीचें साह्य करूं अशी कबुली शिवाजीनें दिली. स्वत: बादशहाचा सेवक म्हणवून घेणें शिवाजीला अवघड वाटल्यामुळें पुत्र संभाजीला व प्रतापराव गुजर ह्याला त्यानें औरंगाबादेस सुभेदाराच्या तैनातीस पाठविलें. बादशहानें आपला वडील पुत्र शहाआलम ह्यास दक्षिणच्या सुभेदारीवर नेमिलें. दोन एक वर्षे संभाजी मोगल छावणींत औरंगाबाद बऱ्हाणपूरच्या दरम्यान असा निरंकुश राहिला. त्या वेळीं मोगल अधिकाऱ्यांच्या संगतींत शिकार व तत्सम व्यवसाय ह्यांची चटक संभाजीस जडली हा संभव दिसतो.



# सूड व प्रतिसूड

.२५.

औरंगजेबाला जगापुढें नामोहरम करणारा एकच प्राणी भेटला. ह्या शिवाजीनें आपलें नाक कापलें, त्याचा सूड हिंदुधर्मावर उगविण्याचा निश्चय बादशहानें मनाशीं ठरविला. मीर्झा राजा, जशवंतसिंग वगैरे समस्त हिंदु राजे हरामखोर आहेत, त्यांचा पाडाव करण्यासाठीं त्यानें पुढें उघड युद्ध तर पुकारलेंच, पण ता. ९ एप्रिल स. १६६९ रोजीं त्यानें एक नवीन खातें उत्पन्न करून हिंदूंचीं मंदिरें पाडणें, त्यांची संपत्ति लुटून घेणें आणि लोकांस बाटविणें ह्यासाठीं स्वतंत्र कामगार नेमले आणि दरमहा किती मंदिरें पाडलीं, किती मूर्ती फोडिल्या, किती लोक स्वधर्मांत आणिले ह्याची तपशीलवार माहिती रुजू करण्याचे हुकूम सोडले. त्याला मोठा संशय कीं आपण जशी आपल्या बंधूंची वाट लावली तशी आपले पुत्र आपली गत करतील, त्यांस राजपुतांचा पाठिंबा सहज मिळेल, सबब ह्या राजपुतांसच ठेचून काढलें पाहिजे. जयसिंग बिचारा इतक्यांत मरण पावला म्हणून सुटला. जशवंतसिंगाची त्यानें कशी गत केली तो भाग इतिहासांत नमूद आहे. मंदिरें पाडण्याचा हुकूम ताबडतोब अंमलांत आला. काशीचें विश्वनाथ मंदिर पाडल्याची खबर ४ सप्टेंबर १६६९ ला

बादशहाला पोंचली. तेथें प्रचंड मशीद उभारली गेली ती अद्यापि विद्यमान असून पूर्वींचा इतिहास लोकांस सांगत आहे. मथुरेंतील केशवरायाचें मंदिर जानेवारी सन १६७० त जमीनदोस्त झालें. असे प्रकार किती म्हणून वर्णन करावे. शिवाजीनें कयास बांधला तो खोटा नव्हता कीं ही बादशाही जरा धक्का दिला कीं साफ कोसळून पडेल, म्हणून त्याला उत्तरेंतील राजपुतांचें साहाय्य पाहिजे होतें. गोष्ट अशक्य नव्हती. संभाजीनें हा प्रयोग पुढें करून दाखविला तेव्हां औरंगजेबाचा पुत्र अकबर त्यास येऊन मिळाला.


बादशहाच्या ह्या हालचाली यथाकाल दक्षिणेंत पोंचल्या. शिवाजी व जिजाबाई ह्यांना भारी चीड आली. जिजाबाईनें तर शिवाजीला सूड घेण्याचा तगादाच लाविला आणि प्रथम निदान सिंहगड तरी बादशहाच्या कबजांतून सोडव अशी निकड चालविली. तदनुसार तानाजी मालुसऱ्यास इरेस घालून घोरपडीच्या दोरानें ता. ४ फेब्रुवारी सन १६७० रोजीं तो किल्ला पुनरपि शिवाजीनें कसा काबीज केला त्याची कहाणी महाराष्ट्रांत आबालवृद्धांच्या तोंडीं आहे, ती येथें सांगण्याची जरूर नाहीं. औरंगजेबाचा एकनिष्ठ सरदार उदेभान राठोड ह्यानें त्या प्रसंगांत प्राण दिले. हा किल्ला न घेशील तर मी तुझ्या राज्याला शाप देईन असा धाक जिजाबाईनें शिवाजीला घातला, त्याचें इंगित वरील घडामोडींत शोधावें लागतें. लगेच पुढें पुरंदर व इतर जयसिंहास दिलेले बहुतेक किल्ले शिवाजीनें जिंकून घेतले. पुन्हा एकवार शिवाजीनें सुरतेवर धाड घालून त्याच सालच्या ऑक्टोबरांत भरपूर लूट पैदा केली. बादशहाला योग्य प्रायश्चित्त मिळालें.

उत्तरोत्तर शिवाजीचा पसारा व राज्यविस्तार सारखा वाढत गेला. कारवारपासून तापीनदीपर्यंतचा समस्त महाराष्ट्र त्यानें सोडवून आपल्या सत्तेंत आणिला, तो प्रकार येथें विस्तारानें सांगण्याचें प्रयोजन नाहीं. प्रतापराव गुजर, हंबीरराव मोहिते, मोरोपंत पिंगळे, अनाजी दत्तो असे किती तरी साहाय्यक त्याच्या ह्या राज्याच्या कामांत प्रसिद्धीस आले. खानदेश व वऱ्हाड हे बादशहाचे सुपीक व समृद्ध प्रदेश शिवाजीला मिळाले, तेणेंकरून अखिल महाराष्ट्राचा तो स्वामी बनला. त्यासाठीं साल्हेरीवर दोन वर्षें प्रचंड संग्राम § मोगलांशीं घडून आला, त्यानें शिवाजीचा पराक्रम जास्तच स्मरणीय बनला. प्रत्यक्ष त्याचें स्वतःचें युद्धकौशल्य सर्वत्र कळून आलें. विजापुरकरांचा पन्हाळा किल्लाही पुनरपि शिवाजीच्या कबजांत आला. ह्यावरून शिवाजीच्या कर्तबगारीचें हें तिसरें दशक सन १६६४–७४ चें त्याच्या जीवनाची चढती कमान दाखवितें. त्यापूर्वींचीं तीन दशकें १६४४–६४ सुविदितच आहेत.

---

§ साल्हेरच्या ह्या युद्धाचें पुष्कळसें नेतृत्व पेशवा मोरोपंत पिंगळे ह्याचें आहे. त्याच्या संबंधानें बखरींत खालील कवन दाखल आहे: पुण्याच्या कप्या गर्जताती शिवाजी। तिथें नांदतो पेशव्या मर्दगाजी। जशीं मर्दिलीं कौरवें अर्जुनानें। तशीं मारिलीं मोगलें पेशव्यानें॥

आग्रा दिल्लीच्या सफरीनें शिवाजीचा दृष्टिक्षेपही एक तऱ्हेनें पुष्कळ बदलला. सुरत, बऱ्हाणपूर, बेदर, बिदनूर, कारंजा, अशा विस्तृत टापूंत त्याच्या हालचाली सुरू होतांच पूर्वीचा मावळ प्रदेशाचा आकुंचित अनुभव अपुरा पडूं लागला. आरंभीं मावळच्या तोकड्या जागिरींत व कोंकणपट्टींत त्यानें स्वतःचे अंमलदार नेमून सुटसुटीत राज्यव्यवस्था निर्माण केली, परंतु आतां उत्तरेंतून परत आल्यावर त्याला हिंदुपदपातशाहीची शक्यता दिसूं लागली. आणि त्या धोरणानें ह्या बाहेरच्या विस्तृत प्रदेशाच्या राज्यकारभाराची कांहीं तरी विशिष्ट व्यवस्था लावल्याशिवाय त्यास राज्य असें कसें म्हणायचें ! हे दूरचे प्रदेश त्याच्या संपूर्ण मालकीचे नव्हते. दिवसें-दिवस त्याचा उद्योग वाढत असून तो समग्र हिंदुस्थानांत फैलावणार असा संभव उद्भवला. त्यांजवरील आपला हक्क गाजविण्याची एक नवीन शक्कल त्यानें काढली. आपल्या स्वतःच्या ताब्यांतले प्रदेश म्हणजे स्वराज्य, आणि बाह्य दूरपल्ल्याचे आपल्या कक्षेंत येणारे प्रदेश होते त्यांजवर शिवाजीनें चौथाई व सरदेशमुखी हे नवीन हक्क लागू केले. अशा प्रदेशांचें संरक्षण शिवाजीनें करावयाचें, त्याच्या खर्चासाठीं एकचतुर्थांश वसूल चौथाई म्हणून त्यांनीं भरावा, म्हणजे त्यांजवर लूट किंवा स्वारी मराठ्यांनीं करूं नये अशी ही योजना होती. म्हणजे एखाद्या क्षेत्राची वसूल आकारणी १०० रुपये असली तर त्यावर रुपये २५ चौथाई कर लागू झाला. हा कर वसूल करण्यास देशमुख म्हणून अधिकारी शिवाजीनें नेमला. त्यास सरदेशमुखी म्हणून आणखी शेंकडा दहा असा हक्क शिवाजीनें बाह्य प्रदेशावर लागू केला. सरदेशमुखी कर त्यानें खास छत्रपतीची मालकी दाखविणारा आपल्याकडे घेतला. अशा रीतीनें चौथाई सरदेशमुखीचें तत्त्व मराठी राज्यांत सुरू होऊन त्यामुळेंच पुढें मराठी राज्य देशभर विस्तारलें. ही हिंदुपदपातशाहीची पहिली अंधुक कल्पना होय. शिवाजीची ही विस्तृत राज्याची योजना गुप्त राहिली नाहीं, बादशहाच्या अधिकाऱ्यांनाही ती उत्तरोत्तर दिसूं लागली.




# जीवित-साफल्य

## .२६.

शिवाजीचा असा धीर चेपत जाऊन राज्याचा पसारा वाढला, तेव्हां महत्त्वाचे नानाविध प्रश्न उत्पन्न होऊन त्यांची वासलात लावणें शिवाजीला भाग पडलें. ते प्रश्न व पुढील राज्यकारभाराची व राज्याभिषेकसमारंभाची निकड कां व कशी निर्माण झाली तें प्रथम समजून घेतलें पाहिजे. ह्यासाठीं शिवाजीनें आपले सर्व सल्लागार एकत्र जमवून त्यांना आपलें पुढील हृद्गत जाहीर केलें तें संवादरूपानें पुढें दर्शवितों.

**शिवाजी :** आज ह्या प्रसंगीं तुम्हां सर्व प्रमुख व अनुभवी मंडळींना मुद्दाम येथें बोलावण्याचें कारण असें. तुम्ही आम्ही सर्वांनीं आज पंचवीस तीस वर्षें खपून स्वराज्य कसें उभारलें तें तुम्ही जाणतां. सामान्य जनापासून प्रत्यक्ष बादशहापर्यंत समस्तांवर आपली दहशत बसली आहे. पण ह्या उद्योगास कायमचें टिकाऊ स्वरूप मिळालेलें नाहीं. बादशहा काय, त्याचे अंमलदार काय, किंवा त्यांच्या अनुरोधानें सामान्य लोक व प्रत्यक्ष आमची मंडळीसुद्धा पुष्कळदां आम्हांस लुटारू, पुंड, बंडखोर, उपटसुंभ असें उघड उघड म्हणतात. खरें म्हटलें तर आमच्या ताब्यांतील प्रदेशांत जी सुबत्ता किंवा व्यवस्था नांदते

तिच्या शंभराव्या अंशानेंही बादशहाच्या राज्यांत आढळत नाहीं. तथापि त्यांचें राज्य लोकमान्यता पावतें. प्राचीन काळच्या सत्ताधीशांनीं दिग्विजय व अश्वमेधादि यज्ञ करून राज्याभिषेक-समारंभ केल्याचीं वर्णनें आपण पुराणांतरीं वाचतों. देवगिरीच्या यादवांनीं प्रतापचक्रवर्ति, समस्तभुवनाश्रय, महामंडलेश्वर अशा आपल्या पदव्या जाहीर केल्या, तसा कांहीं तरी प्रकार आपण स्वीकारल्याशिवाय आमचें राज्य लौकिक दृष्टया कायदेशीर मानलें जात नाहीं. छत्रपति हें अभिधान व स्वतंत्र मुद्रा आम्हीं ह्यापूर्वीच धारण केली आहे, कांहीं प्रधानही नेमले आहेत, परंतु त्यास व्यवहारांत अद्यापि धार्मिक स्वरूप आलेलें नाहीं. औरंगजेब आमचीं मंदिरें उध्वस्त करून संपत्ति लुटून नेतो तरी त्याला लोक सम्राटाचा मान देतात आणि मयूरसिंहासनाचा उपभोग घेऊन तो आपली सार्वभौम सत्ता मिरवितो. तरी ह्याचा उपाय आपण काय करावा, आपला महाराष्ट्रधर्म भारतभूमीवर चिरकाल नांदेल अशी कोणती व्यवस्था ठरवावी, तें तुम्ही विचार करून आम्हांस सांगा. घरीं बसल्या आम्हीं आपणांस राजे म्हणवून घेतलें, तरी लोक आम्हांस राजे म्हणतील कीं काय असें मोरे आम्हांस विचारतात, आम्ही क्षत्रिय नाहीं, कलियुगांत क्षत्रिय अस्तास गेले, हा प्रवाद दूर कसा करावा ? केवळ अमुक कुळांत जन्मला त्यास तेवढा मान, खरा पराक्रम दाखविला तरी तो फुकट, ह्या लोकभ्रमाचा परिहार कसा करावा तें आम्हांस सांगा.



शास्त्रीपंडित व प्रधानादि मंडळींनीं आपसांत खल करून प्रश्नांचीं उत्तरें दिलीं त्यांचा तात्पर्यार्थ असा :— मोरोपंत पिंगळे, बाळाजी आवजी चिटणीस, खुद्द जिजाबाई, समर्थ रामदास, परमानंदबावा अशा अनेकांनीं ह्या प्रकरणांत पूर्ण भाग घेतलेला आढळतो.

( १ ) शुभमुहूर्त पाहून महाराजांनीं आपणास यथाविधि राज्याभिषेकपूर्वक सिंहासनारोहण करावें, रायगड राजधानी करावी. समारंभासाठीं विद्वान् पंडित बोलवावे, तीर्थोदकें आणवावीं, अशा प्रकारें आपल्या कार्यास धर्माचें जाहीर स्वरूप द्यावें, आणि स्वराज्य जाहीर करावें. म्हणजे लोक मानूं लागतील कीं, भारत-भूमीचें पारतंत्र्य दूर झालें, मुसलमानी आक्रमण संपलें, प्राचीन आर्यधर्म चालू झाला.

( २ ) ह्या प्रसंगीं "क्षत्रियकुलावतंस व सिंहासनाधीश्वर" ह्या दोन विशिष्ट पदव्या म्हणजे बिरुदें आपण स्वीकारावीं. पहिल्याचा अर्थ आपण क्षत्रियांत श्रेष्ठतम आहां, स्वपराक्रमानें हा आपला अधिकार आपण मिळविला असा होतो. दुसऱ्याचा अर्थ मोगल बादशहाला कळून येईल कीं, त्याच्याचसारखे आपण सिंहासनाचे अधिकारी बनलां. लोकनियंत्रणा व राज्यव्यवस्था करण्याचा हक्क त्याच्या इतकाच आपलाही आहे. करवसुली, न्यायदंड वगैरे जे आपण ठरवाल ते मंजूर व कायदेशीर मानले जातील. ह्यांत असाही अभिप्राय व्यक्त होतो कीं, परमेश्वरी कृपा असेल तर हाच पराक्रम वाढवीत जाऊन ह्या परकीय औरंगजेबास सिंहासना-वरून काढून आपण सर्व देशाचे सम्राट् होऊं शकाल.

( ३ ) महाराज व छत्रपति हें आपलें लोकोपचाराचें अभिधान राहावें.

( ४ ) आपल्या भोसले कुळाची उत्पत्ति सिसोदिया राजपुतां-पासून झालेली आहे हें सिद्ध करण्याकरितां उदेपूरच्या वंशवेलाचा दाखला आणवावा. त्यासाठीं आपले चिटणीस बाळाजी आवजी तिकडे जाऊन पूर्तता करतील. काशीस जाऊन गागाभट्टांस ह्या समारंभास आणून त्यांच्या सूचनेनें सर्व कार्य करावें.

( ५ ) अष्टप्रधान नेमून त्यांच्याकडे राज्याचीं कामें नेमून द्यावीं. त्यांच्या कर्तव्याचे निर्बंध ठरवावे.

( ६ ) हल्लीं फारसी राजभाषा आहे ती बदलून मराठी करावी. त्यासाठीं लागणारे दरबारी शब्दांचे पर्याय व मायने निश्चित करावे. हें काम रघुनाथपंडित हणमंते स्वीकारतील आणि ते राज्य-व्यवहारकोश यथाकाल बनवितील.

( ७ ) राज्याभिषेक शक नवीन चालू करावा म्हणजे आपण शककर्ते बनाल.

( ८ ) किल्ले म्हणजे भूदुर्ग व जलदुर्ग पूर्वी आपण सिद्ध केले आहेत ते व नवीन जरूर ते करून लष्कर व आरमार हे देशसंरक्षणाचे उपाय पूर्ण करावे.

अशा ज्या नानाविध सूचना महाराजांपुढें आल्या त्या सर्व त्यांनीं योग्य रीतीनें सवडीनुसार अंमलांत आणिल्या. राज्याचा धनी छत्रपति झाला. त्या प्रसंगीं शिवाजीनें सरकारी पत्राचा नमुना

कायम केला. त्या एका कागदांत वरील सर्व प्रकार एकत्र नमूद असून, त्याची भाषा मराठी आहे. मराठी राज्यांत अखेरपर्यंत हा परिपाठ कायम होता. त्याच्या माथ्यावर प्रतिपच्चंद्ररेखेव ही मुद्रा असे. शिवाजीनें स्वीकारलेलीं समस्त बिरुदें त्यांत गोवलेलीं आहेत, त्या कागदाचा लेख असा :—"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १५९६ आनंदनाम संवत्सरे ज्येष्ठ शुक्ल १३ मंदवासरे (६ जून सन १६७४) क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति सिंहासनाधीश्वर स्वामी यांणीं समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री मोरेश्वर पंडित प्रधान यांसी आज्ञा केली ऐसीजे."

राज्याभिषेक व सिंहासनारोहण ह्यांचा हा समारंभ रायगडावर ज्येष्ठ शुद्ध १३ शुक्रवार शके १५९६ आनंद संवत्सर ता. ५ जून सन १६७४ रोजीं मोठ्या उत्साहानें पार पडला, सर्व महाराष्ट्राचाच हा भाग्यदिन समजला जातो. छत्रपतीची मिरवणूक हत्तीवरून निघाली. सिंहासनाची स्थापना होऊन शिवछत्रपति त्याजवर विराजमान झाले, तेव्हां औरंगजेबास काय वाटलें त्याचें वर्णन हणमंते करतो तें असें :

**निर्जित्य सर्वानवनीमहेन्द्रान्नृपः स सिंहासनमध्यरोहत् ।**
**योऽधत्त दिल्लीपतिचित्तशल्यमनन्यनच्छन्नृपतीतिशब्दम् ॥**

अर्थ—समस्त भूपतींना जिंकल्यावर शिवाजीनें सिंहासनारोहण केलें, त्यामुळें मी एकमेव भारतसत्ताधीश असा जो अभिमान दिल्लीपतीला झालेला होता, तो सर्व लयास जाऊन त्याच्या हृदयाला कायम जखम झाली.

दुसऱ्या एका मराठी कवीनें हाच अभिप्राय पुढील भिन्न प्रकारें वर्णिलेला आढळतो. औरंगजेबाला वाटलें—

**सरित्पतीचें जल मोजवेना । माध्यान्हिचा भास्कर पाहवेना ।**
**मुष्टींत वैश्वानर बांधवेना । तैसा शिवाजी मज जिंकवेना ॥**

औरंगजेबाला शिवाजीचा हा उपक्रम अगदीं जिव्हारीं लागला. शिवाजीनें अनेक घाले मोगल बादशाहीवर घातले, पण दुसरा स्वतंत्र सत्ताधीश आतां आपल्या छातीवर येऊन बसला हा सर्वांत मोठा आघात होय. ह्याच्या उलट समस्त महाराष्ट्राला, श्रीसमर्थांना व प्रत्यक्ष त्या जिजामातेला शिवाजीच्या ह्या उपक्रमानें केवढी कृतकृत्यता वाटली असेल तें कल्पनेनेंच जाणावें. शिवाजीच्या ह्या यशाचें श्रेय पुष्कळसें जिजाबाईच्या कर्तृत्वास असून पुत्राचें हें भाग्य डोळ्यांनीं पाहण्याची तिची पुण्याई असीम होय. समारंभानंतर बाराच दिवसांनीं ती परंधामास गेली.



# पराकाष्ठेची सद्भावना

## २७

श्रीसमर्थ रामदास ह्या समारंभाच्या उत्पादनांत संविभागी बनले होते. आनंदवनभुवन हें जें त्यांचें उत्कृष्ट कवन प्रसिद्ध आहे त्यांत ह्या उत्सवानें त्यांचें अंत:करण कसें भरून आलें तें पाहावयास मिळतें. तें कवन प्रत्येकानें वाचण्यासारखें आहे. तसेंच रामदासांबद्दल शिवाजीला केवढा आदर वाटत होता हें त्यानें स्वामींच्या चाफळमठास इनामाची सनद दिली तिजवरून कळून येतें. तींत शिवाजीचे पुढील शब्द आहेत—

“ह्या चरणरजानें जे जे मनोरथ मनीं धरिले ते स्वामींनीं आशीर्वादप्रतापें पूर्ण केले, संपादिलेलें सर्व राज्य चरणीं अर्पण करून सर्वकाळ सेवा घडावी ऐसा बिचार मनीं आणिला असतां आज्ञा झाली कीं, पूर्वीं धर्म सांगितले तेच करावे. तीच सेवा होय.” इ०. सर्वच पत्र वाचण्याजोगें आहे.

साधुसंतांची सेवा, सर्व धर्मांना समान आदर, वर्णाश्रमव्यवस्था इत्यादि प्राचीन सनातन धर्माचीं मूलतत्त्वें व आचार यथायोग्य पाळण्याचा शिवाजीचा परिपाठ असून त्याची मनोरचना सनातनी वृत्तीची होती, तींत आधुनिक सुधारणेचा गंध नव्हता. जरी त्याला मुसलमानी राज्यांशीं झगडावें लागलें हा प्रकार खरा



असला, तरी व्यक्तिशः त्यानें मुसलमानी धर्माचा द्वेष असा कधीं केला नाहीं, अनेक मुसलमान गृहस्थ त्याचे एकनिष्ठ सेवक होते. दर्यासारंग इब्राहीमखान त्याचा नाविक दलपति होता. केळशीचा बावा याकूत त्याचा गुरु होता. मुल्ला हैदर हा कैक वर्षें शिवाजीचा सेक्रेटरी असून बादशहा वगैरेशीं गुप्त कारस्थानें करण्यांत तोच प्रमुखपणें वागत होता. हा मुल्ला हैदर इतका भला व विद्वान् होता कीं, शिवाजीच्या पश्चात् त्याला औरंगजेबानें आपल्या पदरीं घेऊन दिल्ली येथें मुख्य काझी म्हणून नेमिलें. हिंदुधर्माचा पुरस्कार करणें हें जरी शिवाजीनें मुख्य पवित्र कर्तव्य सिद्धीस नेलें तरी त्यांत मुसलमानी, ख्रिस्ती वगैरे इतर धर्मांचा द्वेष असा बिलकूल नव्हता. ज्यानें त्यानें आपला धर्म मर्जीमाफक पाळावा, त्यांत जबरदस्ती व दुराग्रह असूं नये, असाच शिवाजीचा कटाक्ष होता. मुसलमान हिंदूंवर अत्याचार करीत ते त्यांनीं सोडून द्यावे, एवढेंच शिवाजीनें आपलें उद्दिष्ट


ठेविलें. रायगडाची राजधानी सिद्ध झाली तेथें शिवाजीनें जसें जगदीश्वराचें मंदिर उभारलें तशीच मुसलमानी धर्माच्या लोकांसाठीं त्यानें आपल्या महाद्वारासमोर स्वतंत्र मशीद बांधून दिली. ब्राह्मणांचें त्याला विशेष अगत्य वाटलें, तरी गोब्राह्मणप्रतिपालक हें अभिधान त्यानें स्वतः स्वीकारलेलें नसून तें लोकांनीं प्रचारांत आणिलें. त्याच्या गुरूंची नामावळीच पांचपन्नासांची उपलब्ध असून त्यांत संन्यासी, बैरागी, संत, कवि, अशा अनेक प्रकारची मंडळी आहेत. पाटगांवचे मौनीबुवा म्हणून होते त्यांच्या भजनीं शिवाजी लागला. जन्मांतला त्याचा मोठा हव्यास म्हणजे माणसें जोडण्याचा असल्यामुळें कोणत्याही नवीन स्थळीं तो गेला, जंगलांत, मंदिरांत, तीर्थयात्रेंत कोठेंही हिंडत असला, तरी त्याचा पहिला शोध तेथें अद्वितीय पुरुष किंवा हुन्नरी व्यक्ति कोण आहेत त्याचा सूक्ष्म तपास करून त्यांचा आपल्या कामांत संग्रह करायचा.§ अनेक अट्टल चोर, लुटारू, खुनी, दरवडेखोरसुद्धा त्यानें तपासून जवळ आणून कामास लावले. त्याच्या किल्ल्यांच्या अनेक आख्यायिका बनलेल्या ऐकल्या कीं त्याच्या विस्तृत दृष्टीची हद्द वाटते. श्रीशैल मल्लिकार्जुनाचें निसर्गरम्य स्थळ बल्लारीजवळ कृष्णाकांठीं आहे, त्याच्या दर्शनास गेला असतां तेथें त्याची तंद्री एवढी लागली कीं, सर्व कामें टाकून तो तेथेंच कायम निवास करण्याचा हट्ट धरून बसला. मोठ्या शिकस्तीनें लोकांनीं त्यास तेथून उठवून आणिलें. आदिलशाही व कुत्बशाही ह्यांच्या महाराष्ट्रीय प्रदेशावर त्यानें स्वराज्याच्या पहिल्या भरांत जरी भरपूर ताव मारला, तरी पुढें त्यानें स्वतः पुढाकार घेऊन तीं राज्यें बचावण्याचीही पराकाष्ठा केली. गोवळकोंड्याच्या तानाशहाची त्यानें स्वतः भेट घेतली, तो अद्वितीय प्रसंग शिवाजीच्या अजब कर्तबगारीच्या इतिहासांत स्मरणीय बनला आहे. मिळून शिवाजी हा पुरुष अलौकिक झाला हें सत्य आहे. अलीकडील हजार पांचशें वर्षांत भूतलावर अशी ही एकच थोर व्यक्ति परमेश्वरयोजनेनें निर्माण झाली असें इतिहासकार मानतात.

शिवाजीनें राज्यारोहण केलें तेव्हां औरंगजेबाला केवढा उद्वेग वाटला त्याचें वर्णन आढळतें तें असें : "पातशाह बहुत दिलगीर जाहले. तीन दिवस बाहेर आले नाहींत. अत्यंत कष्टी जाहले. खुदानें मुसलमानांची पातशाही दूर करून शिवाजीसच दिधली असें वाटलें. शिवाजीची चिंता जिवीं सोसवत नाहीं, काय करावें अशी अवस्था जाली. मग बहादूरखान कोका पातशाहाचा दूधभाऊ

---

§ उदाहरण म्हणून शिवाजीच्या चौकस वृत्तीचा पुढील उल्लेख लक्षांत ठेवण्यासारखा आहे. सन १६७१ त साल्हेरवर भीषण संग्राम माजला त्या वेळचा हा प्रकार आहे. "मौजे मुदलगांव येथें महापुरुष तपोनिधि देवभारती गोसावी महादेवाच्या देवालयांत अनुष्ठान करीत, त्यास साल्हेर मोल्हेरच्या मोहिमेस जात असतां शिवाजी महाराज ह्या पुरुषाचें दर्शन घेण्यास आले. त्यांहीं आशीर्वचन दिधलें कीं "जा, नववे दिवशीं किल्ले फत्ते होतील." जातांच किल्ले घेतले, तेव्हां "मुदलगांव त्या भगवानांस मुकासा करून दिला." शिवाजीला अडीअडचणींत थोर पुरुषांचा आशीर्वाद घेण्याची एवढी आतुरता वाटे कीं, बहुधा त्याचीं सर्व अघटित कृत्यें अशा आख्यायिकांनीं भरलेलीं आहेत.

ह्यानें येऊन समाधान केलें, आपण चिंता करूं नये मी जाऊन शिवाजीस जेर करतों. असें सांगून पातशाहांस आणून तख्तावर बसविलें. पातशाहांनीं बहादुरखानास नवाजून वस्त्रें, अलंकार, दौलत पोख्त दिधली. सत्तर हजार स्वार व हारोळीस ( आघाडीस ) दिलीरखानास हुकूम करून दिल्हा. येणेंप्रमाणें बहादूरखान शिवाजीराजांवर चालून आला." ह्या खानानें पुढें आपली शिकस्त केली, पण शिवाजीनें त्यास जुमानलें नाहीं. बहादूरखान म्हणजे 'पेंडीचें गुरूं' असें शिवाजी म्हणे. ह्या खानानें पांडे पेडगांव येथें आपलें ठाणें बांधून किल्ला बनविला तो बहादूरगड म्हणून प्रसिद्ध आहे. ह्या ठिकाणीं पुढें कैक वर्षें खुद्द औरंगजेबाची छावणी होती.



# भीषण उपरति

## २८

राज्याभिषेकसमारंभानें शिवाजीनें आपल्या जीवनाचें परमोच्च शिखर गांठलें. इतउत्तर त्याची उमेद पुढें अधिकाधिक मावळत जाऊन त्यास अल्पायुष्यांत मरण आलें. एवढा दमदार व कणखर पुरुष पुढील चार पांच वर्षांत प्रकृतीनें व मनानें अत्यंत खंगून गेला. ज्या तीव्र वेगानें व अप्रतिम धडाडीनें त्यानें अनेक संकटांतून आपली निभावणूक करून भारतभूमीवर छाप बसविली तो जोम ह्यापुढील काळांत हळुहळू मंदावत जाऊन त्यास आकस्मिक रीतीनें अकालीं मरण आलें. सिंहगड काबीज करणें, मोऱ्यांना वठणीस आणणें, अफजलखानाचा फन्ना पाडणें, शायिस्ताखानास हात दाखविणें, सुरतेची संपत्ति लुटून आणणें आणि शेवटीं आग्र्यास बादशहाच्या भेटीस जाऊन त्याच्या बंदींतून सहीसलामत सुटून येणें हे त्याचे पराक्रम एकाहून एक अशा चढत्या पायरीनें भाग्यशिखर गांठीत गेले. उत्तरेच्या अनुभवानें त्याला एक प्रत्यय आला कीं, मोगल बादशहास नरम आणण्याची तूर्त शक्यता नाहीं. महाराष्ट्रांतच किंवा फार तर दक्षिण हिंदच्या थेट मर्यादेपर्यंत आपणास आक्रमण करतां येईल, पण दिल्लींद्राशीं झुंज खेळण्याचें तूर्त आपणास सामर्थ्य नाहीं. राज्यारोहणानंतरचा

सहा वर्षांचा शिवाजीचा आयुःकाल मानसिक उद्वेगांत खर्च झाला. मनुष्यानें कितीही यत्न केला तरी कित्येक विषय प्रयत्नसाध्य नसतात, तेव्हां त्यास आपण दैव असें म्हणतों. 'दैवंचैवात्र पंचमं' हा गीतेचा सिद्धान्त अपरिहार्य आहे. औरंगजेब काय किंवा शिवाजी काय दोघेही आपापल्यापरी चांगले सुदृढ होते, असें असतां एकास नव्वद वर्षांची आयुर्मर्यादा लाभावी आणि दुसऱ्यानें अर्धशतकच गांठावें ही विधिघटना अतर्क्य आहे. आजार असा शिवाजीला कधीं शिवला नाहीं, आणि एक आला तो शेवटचाच. औरंगजेबाचीं तर अनेक दुखणीं जिवावरचीं गेलीं. राजपूत राजे आपणावर केव्हां उठाव करून आपला नाश करतील ही धास्ती त्याच्या पोटांत सदैव जागृत होती. पुढें त्यानें राजपुतांवर युद्धही चालविलें. त्यांत अपयश येऊन त्याचा पुत्र अकबर संभाजीच्या आश्रयास महाराष्ट्रांत आला. तेव्हां शिवाजी हयात असता तर, दक्षिणेंतून मराठे व उत्तरेंतून राजपूत असे संगनमतानें चालून येते आणि त्यांजपुढें औरंगजेबाचा निभाव लागला नसता. ह्यासंबंधानें पुढें संभाजीनें रामसिंहास पत्र लिहिलें त्यांत संभाजीची हीच सूचना आहे. हस्तिनापुरांत हिंदु-सम्राट् विराजमान असावा ही भावना शतकानुशतकें जागृत होती आणि महाराष्ट्रांत छत्रपतीचें राज्यारोहण झाल्यावर ती भावना साकार होण्याच्या मार्गास लागली. तींत अशक्य असें कांहींच नव्हतें. ती शिवाजीच्या हातून कां पूर्ण झाली नाहीं हें आतां पाहूं.

राज्यारोहणाचा उत्कट भर ओसरतांच शिवाजी व त्याचे हस्तक ह्यांना मुख्य प्रश्न उपस्थित झाला कीं आतां पुढील कर्तव्य काय? सिंहासनाधीश्वर हें भपकेदार बिरुद तर आपण घेऊन बसलों, पण त्या अधीश्वराची सत्ता मात्र महाराष्ट्राच्या लहानशा भागापलीकडे पोंचली नव्हती. सत्तेला व पराक्रमाला क्षेत्र पाहिजे आणि तें ताबडतोब सिद्ध करावें हा सिद्धान्त सर्वांना पटला, पण शक्यतेचा विचार करतां तूर्त तरी उत्तरेंत मोगलसत्ता बद्धमूल आहे ती उखडून काढण्याइतकें आपलें बल नाहीं. हें बल प्रथम दक्षिण देश जिंकून वाढवावें आणि मग उत्तरेचा कार्यभाग हातीं घ्यावा, ही कार्यरेषा मंजूर झाली. तिला अनुसरून शिवाजीला प्रथम आपला प्रत्यक्ष बंधु व्यंकोजी मुसलमानांचा सेवक आहे, त्यास आपल्या छायेंत आणला पाहिजे हें कर्तव्य उपस्थित झालें. आणि त्याचा विचार चालू असतां व्यंकोजीचा प्रधान रघुनाथ नारायण हणमंते भोसले कुटुंबाचा एकनिष्ठ साहाय्यक तंजावराहून शिवाजीच्या भेटीस रायगडावर आला. त्याच्याशीं वाटाघाट करून दक्षिण दिग्विजयाची सिद्धता ठरविण्यांत आली.

राज्याभिषेकानंतर शिवाजीची प्रकृति विशेष बिघडली. सन १६७५ त सातारा किल्ला त्याच्या कबजांत आला, तेव्हां पावसाळ्या-नंतर किल्ला पाहण्याकरितां म्हणून तो तेथें गेला असतां त्यास ज्वर येऊन दोनतीन महिने त्याची प्रकृति अत्यंत अस्वस्थ झाली. त्यांतून निभावत नाहीं अशीच पुष्कळांची भावना झाली. शिवाजी मरण पावला अशीसुद्धा भूमका बाहेर पसरली. ह्या दुखण्याचे

उल्लेख तत्कालीन इंग्रजांच्या बातमीपत्रांतून आढळतात. त्या दुखण्यांतून शिवाजी निखालस बरा झाला, तरी त्या वेळेपासून त्याच्या वृत्तींत एकदम मोठा पालट उत्पन्न झाला. पूर्वीची दुर्दम्य उमेद सर्व लयास जाऊन त्या ठिकाणीं अनिवार उपरति जवळच्या लोकांस स्पष्ट दिसूं लागली. कदाचित् पुत्राचें दुर्वर्तन हें एक कारण असेल. पण सातार्‍यावरील दुखण्यांत आपण निभावत नाहीं, ह्या समजुतीनें तो संसार असार आहे, नको हा एवढा व्याप, असें म्हणून त्याचें चित्त अस्थिर व उदास बनत गेलें. त्याच्या शेवटच्या पांच-चार वर्षांच्या कारामतींत ही निरिच्छेची छटा भरपूर दिसते. पूर्वींची उमेद मावळली.

शिवाजीला दुखण्यांत असतां सत्समागमाचा ध्यास लागला. समर्थ रामदासांना वर्तमान समजतांच त्यांनीं सातार्‍यास येऊन शिवाजीची भेट घेतली. बरेच दिवस उभयतां एकत्र वास करीत असावे. शिवाजीला विरक्ति येऊन त्यानें सर्व राज्य समर्थांस अर्पण केलें. ह्या दगदगींतून मला मुक्त करा अशी शिवाजीनें समर्थांस गळ घातली. त्यांनीं नानाप्रकारें शिवाजीस बोध करून शिकस्तीनें पुन्हा उद्योगास लावलें. माझें दर्शन तुला सदैव घडत राहील असें वचन देऊन ते नजीकच्या परळी किल्ल्यावर राहण्यास आले. तेव्हांपासून त्या किल्ल्याचें नांव सज्जनगड पडलें. उभयतांचा हा प्रेमभाव चाफळच्या मंदिरास शिवाजीनें इनाम करून दिलें त्या सनदेंत स्पष्ट आहे. ह्या सनदेची तारीख सन १६७८ चा दसरा म्हणजे १५ सेप्टेंबर आहे. त्या वेळीं शिवाजी कर्नाटक-स्वारींतून परत आला होता. ह्यावरून शिवाजीच्या उपरतीचा काळ सन १६७५ च्या पुढील वर्ष सहा महिन्यांतला असावा असें अनुमान करतां येईल. त्या सनदेची भाषाच तशी अर्थपूर्ण आहे.



# कर्नाटकीय विक्रम

## .२१.

सन १६७६ त मनाची उपरति, दक्षिणच्या स्वारीची चर्चा, सज्जनगडावर श्रीसमर्थांची उपस्थिति हे विषय शिवाजीला पुरले. त्याच वेळीं रघुनाथपंत हणमंते तंजावराहून येऊन शिवाजीला रायगडावर भेटला. शिवाजीची प्रकृति सुधारली. मनास थोडीशी उद्विग्नता वाटण्याचें कारण ह्या वेळीं पुत्र संभाजीचा दुराचार अंधुकपणें प्रगट होत होता. शिवाजीच्या दृष्टीपुढें दक्षिणची स्वारी हा एकच विषय ह्या वेळीं प्रमुखपणें वावरत होता. कर्नाटकांत विजापूर व गोवळकोंडा हीं दोन मुसलमानी संस्थानें असून तीं पूर्णपणें जिंकून काबीज करण्याचा प्रयोग औरंगजेबानें चालविलेला असल्यामुळें त्यांनीं आतां शिवाजीचें साहाय्य मागितलें. ह्यापूर्वींच ह्या दोन्ही संस्थानांवर शिवाजीनें चांगला ताव मारिला असला तरी तीं संस्थानें टिकविणें आणि त्यांच्या साहाय्यानें औरंगजेबाविरुद्ध एक नवीन फळी उभी करणें हेंच शिवाजीचें कर्तव्य आतां बनलें. त्यासाठीं त्याला त्याच्या प्रत्यक्ष बंधूचा विरोध मिटवायचा होता.

व्यंकोजी अनेक प्रसंगांत शिवाजीविरुद्ध वागत होता. त्यानें आतां तंजावरास आपलें राज्य उभारलें. शिवाजीची इच्छा ह्या

आपल्या बंधूनें आपल्या उद्योगांत पूर्णतया सामील व्हावें. एका पित्याच्या दोन पुत्रांनीं एकमेकांशीं शत्रुत्व पाळावें हा देखावा लौकिकांत अत्यंत गर्ह्य होता. समक्ष त्यास भेटून त्याची समजूत घालून स्वराज्याच्या ह्या नवीन उद्योगांत व्यंकोजीस सामील करून घेणें हा शिवाजीचा मुख्य उद्देश होता. ह्या गोष्टी मान्य करून तो खुषीनें शिवाजीस मिळून वागता तर युद्धसंग्राम करण्याची पाळी आली नसती. व्यवहारतः आपल्या ह्या बंधूस कांहीं एक उणें पडूं देऊं नये अशी शिवाजीची भावना होती. परिणामाअंतीं व्यंकोजीनें शिवाजीशीं संग्राम केला तेव्हां तोही उपाय स्वीकारून शिवाजीनें आपलें म्हणणें सिद्धीस नेलें. ह्यासंबंधाचीं उभय बंधूंचीं पत्रें व करार झाले तो प्रपंच मोठा आहे. हा एकंदर व्यवहार रघुनाथपंत हणमंत्यानें घडवून आणिला. रायगडावर शिवाजीशीं वाटाघाट करून पंत विजापुर व भागानगर येथें गेला आणि औरंगजेबाविरुद्ध ह्या दोन राज्यांचें साहाय्य शिवाजीस मिळेल असें राजकारण बनविलें. तीं दोन्ही राज्यें आतां टेकीस आलेलीं ह्या वेळीं शिवाजीस अनुकूल झालीं.

गोवळकोंडा व भागानगर जवळ जवळ आहेत. भागानगरचें हल्लींचें नांव हैदराबाद. तेथें अबुल हसन ऊर्फ तानाशाह राज्यावर होता, त्याचे मादण्णा ( मदनपंत ) व आकण्णा ( एकनाथपंत ) ह्या नांवांचे दोन प्रधान दक्ष व हुशार असून ते कुत्बशाहीचें राज्य नेकीनें सांभाळीत होते. त्यांच्याशीं रघुनाथ-पंतानें सख्य जोडून पुढील राजकारण नक्की केलें. शिवाजीनें स्वतः येऊन कुत्बशहाची भेट घ्यावी आणि उभयतांनीं प्रेमभावानें सख्य जोडून पुढील उद्योग पुरा करावा असें कारस्थान ठरलें.

सन १६७७ च्या माघ मासांत रायगडाहून शिवाजी पूर्ण तयारीनें कर्नाटकच्या स्वारीस निघाला. ह्या वेळीं त्याचें वैभव छत्रपति नांवास शोभेल असें लोकांच्या दृष्टीस पडलें. पाटगांवास मौनीबुवांचा आशीर्वाद घेऊन शिवाजी लष्करी शृंगारासह भागानगरास गेला. कुत्बशहानें शिवाजीचा सत्कार करून समारंभानें त्याची भेट घेतली. शिवाजीचा सुमारें एक महिना ह्या भेटींत गेला. उभयतांचें सख्य जमून पुढील उद्योग एका विचारें सिद्धीस गेले. नंतर दोनही फौजांनीं कर्नाटकांत प्रयाण केलें. सन १६७७ च्या मार्चांत भागानगर राजधानींत दोन सत्ताधीशांच्या समागमाचा देखावा अपूर्व घडून आला. त्यांत शिवाजीचें चातुर्य व वैभव समस्त लोकांच्या नजरेस पडून एक नवीन मनुच हिंदु—मुसलमान-सख्याचा उत्पन्न झाला. मादण्णाच्या मातुःश्रीनें स्वहस्तानें स्वयंपाक करून शिवाजीस जेवूं घातलें. मिळून जे प्रकार पूर्वी कधीं न घडले ते ह्या स्वारींत दिसून आले.

दक्षिणदिग्विजयाचा हा रंग उत्कृष्ट उतरला तरी त्याची भावी विधिघटना वेगळीच बनावी असा योगायोग होता. एक वर्ष शिवाजीनें ह्या स्वारींत काढलें, पुष्कळ नवीन मुलूख पैदा करून तो सन १६७८ च्या एप्रिलांत परत महाराष्ट्रांत आला. तेव्हांपासून त्याचे ग्रह उलट दिशेनें वागूं लागले. औरंगजेब शिवाजीच्या हालचाली बारकाईनें पाहात होता. हिंदूंनीं एकजूट

करून बादशाहीस विरोध करावा हा प्रकार त्याला दु:सह वाटला. लगेच त्यानें राजपुतांशीं युद्ध आरंभिलें. तें चालू असतांच शिवाजीचा काळ झाला, संभाजी छत्रपति बनला आणि मराठ्यांचा पाडाव करण्याकरितां स्वत: बादशहा समस्त वैभवानिशीं महाराष्ट्रावर चालून आला. हा भाग पुढचा असला तरी त्यांत मादण्णा व आकण्णा ह्या दोन कर्तबगार प्रधानांची आहुति पडली. सन १६८६ त त्या बादशाहानें गोवळकोंड्यास वेढा घातला आणि शहाकडे मागणी केली, तुम्हीं आपल्या दोन दुष्ट प्रधानांस ठार मारून त्यांचीं शिरें आमच्याकडे पाठवावीं. बिचारा कुत्बशाह दुसरें काय करणार? त्यानें त्या दोघांस ठार मारून शिरें औरंगजेबाकडे पाठविलीं (मार्च सन १६८६). त्यानें आपल्या छावणीत त्यांची मिरवणूक काढून अप्रतिष्ठा केली. हा एक प्रकारचा बादशहानें शिवाजीचाच सूड घेतला नव्हे काय? त्यांचें पातक काय तर स्वधर्मसेवा. **काफर पडले ना ते!**



## ३०

# संभाजीचें दुर्वर्तन

कर्नाटकस्वारींतून शिवाजी ता. ८ एप्रिल सन १६७८ रोजीं पन्हाळ्यास दाखल झाला, तत्पूर्वी पुत्र संभाजीच्या दुराचाराचे प्रवाद त्याच्या कानावर थोडेबहुत आले होते. ता. २१ ऑक्टोबर सन १६७७ चा उल्लेख शकावलींत आढळतो तो असा: “ संभाजीराजे दुर्वृत्त जाले. त्यांजवर इतराजी जाली. शृंगारपुरीं ठेविले. जवळ देखरेखीस उमाजी पंडित नेमिले. ” ज्या तारखेचा ह्या उल्लेख आहे त्या वेळीं शिवाजी कर्नाटकांतून परत येण्याच्या मार्गावर होता. ज्या दिवशीं पुत्राला शृंगारपुरीं पाठविण्याचा हुकूम शिवाजीनें केला तीच तारीख शकावलीची नाहीं. तत्पूर्वी केव्हां तरी शिवाजीनें पुत्राचा बंदोबस्त केला आणि मागाहून त्याची नोंद शकावलींत झाली. अर्थात् राज्याभिषेकसमारंभानंतर पुत्राचें दुर्वर्तन शिवाजीच्या नजरेस आलें, आणि शिवाजी कर्नाटकच्या स्वारींत असतां त्यानें बापाविरुद्ध कारस्थानें चालू केलीं, हें एक कारण शिवाजीला उद्वेग येण्याला विशेष झालें.

संभाजीचा जन्म ता. १४ मे १६५७ चा. तो दोन वर्षांचा असतांना त्याची मातुःश्री वारली. तत्पूर्वी शिवाजीचीं आणखी लग्नें होऊन सावत्र माता घरांत आल्या. त्याच्या शिक्षणाची व्यवस्था

कालमानाप्रमाणें भरपूर करण्यांत आली. लिहिणें, वाचणें, हिशेब ह्यांत त्याची प्रगति होऊन मुख्य म्हणजे त्याला संस्कृत भाषेचें ज्ञान बऱ्यापैकीं झालें. घरांत पुराणिकाच्या मुखानें त्याला प्राचीन ग्रंथ थोडेबहुत अवगत झाले. त्यानें स्वतः लिहिलेलीं संस्कृत कवनें आढळतात. रामसिंहास लिहिलेलीं व इतर संस्कृत पत्रें त्याच्या नांवाचीं मिळालीं असून त्यांवर 'स्वहस्तोमम' दस्तुरखुद्द अशी स्वाक्षरी आहे. कविकलश हा विद्वान् औत्तरीय पंडित त्याला संस्कृत शिकविण्यास ठेवलेला असावा. शिवाजीच्या राज्यारोहणसमारंभांत संभाजीनें महत्त्वाचीं कामें केलीं. तत्पूर्वी दोन एक वर्षें तो मोगल छावणींत राहिला असतां त्याला शिकारीच्या नादांत कित्येक व्यसनें जडलीं असावीं असा तर्क होतो. गांजा, अफू वगैरेच्या सेवनाची चटक त्यास लागली असे तुरळक उल्लेख आहेत. नऊ वर्षांच्या वयांत तो बापाबरोबर बादशहाच्या भेटीस गेला असतां परत येतेवेळीं मथुरा, प्रयाग अशा ठिकाणीं वर्ष सहा महिने तो राहिला, तेव्हांही त्याला हे उत्तरेचे ढंग जडले असणें शक्य आहे. पुढें तर मद्य, वेश्या इत्यादि त्याचे बोभाटे बाहेर ऐकूं येऊं लागले, ते पुढील काळचे म्हणजे तो अठरा वीस वर्षांचा झाला तेव्हांचे आहेत. सन १६७७ पासून त्याची काळजी शिवाजीला विशेष वाटूं लागली, आणि तेव्हां-पासूनच शिवाजीचें मनःस्वास्थ्य मावळलें.

मोरोपंतादि प्रधानांशीं व सावत्र माता सोयराबाई हिच्याशीं संभाजीचा उभा दावा बनला, तो शिवाजीस निवारण करतां येईना. कुटुंबांत सदा खटपटी सुरू झाल्या. संभाजीवर बापाचा रोष झाला. सोयीनें सांगितलेलें त्यास रुचेना. पुत्रानें शिवाजीवर विषप्रयोग केला असेसुद्धा प्रवाद उठले. शिवाजी इतका वैतागला कीं, साताऱ्यास आजारी असतांना त्यानें समर्थांचा घोष घेतला तें मागें सांगितलेंच आहे.

परमानंदकवीचें शिवभारत प्रसिद्ध आहे. पण त्यांत पहिले ३२ अध्यायच पैदा झाले असून त्यापुढचा भाग उपलब्ध नाहीं. म्हणजे शायिस्ताखानाच्या आगमनापासून राज्याभिषेकापावेतोंचा शिवाजीच्या कर्तबगारीचा मुख्य भाग परमानंदाच्या कृतीचा अज्ञात आहे. त्या कवीनें हा लिहिलाच नाहीं कीं लिहिलेला गहाळ झाला ह्याचा उलगडा होत नाहीं. परंतु ह्याच कवीची एक संस्कृत कृति अलीकडे उपलब्ध झालेली शिवाजीच्या अंतसमयास अनुलक्षून असून तींत संभाजीचरित्राचाच भाग मुख्य आहे. काव्य संस्कृत असून तें तीन वर्षांपूर्वी बडोदें येथें प्रसिद्ध झालें. हा परमानंदकवि म्हणजे शिवाजीचा गुरु परमानंदबावा पोलाद-पुरास वास्तव्य करून राहिला तोच होय हेंही आतां सिद्ध झालें आहे. हा गृहस्थ विद्वान् व बहुश्रुत असून भोसल्यांच्या कुटुंबांत पुष्कळ वर्षें वागलेला असल्यामुळें त्यानें लिहिलेल्या हकीकती स्वतः पाहिलेल्या खऱ्या मानण्यास हरकत नाहीं. हा गृहस्थ शिवाजीबरोबर आग्र्यासही गेला होता. राज्याभिषेकसमयीं तो रायगडावर असून शिवाजीचा मृत्युही त्यानें पाहिला. शेवटीं वैतागून त्यानें संन्यास घेतला. प्रसिद्ध झालेला सर्वच भाग खुद्द

परमानंदाचा नसून त्यांत त्याचे दोन पुत्र श्रीधर व देवदत्त आणि नातू गोविंद ह्यांचाही हात आहे. लेखकाचा कल संभाजीची तरफदारी करण्याचा असून त्यानें शिवाजीच्या अंतसमयाची हकीकत देतांना मोरोपंत पिंगळे, अनाजी दत्तो व सोयराबाई इत्यादींची निंदा केली आहे. तथापि शिवाजीच्या अंतसमयाची परिस्थिति समजून घेण्यास हेंच एक मुख्य साधन आपणांस मिळतें. ग्रंथाचा बहुतेक भाग संभाजीच्याच वर्णनानें व्यापला आहे. इतर लेखकांप्रमाणें परमानंदही पक्षपाती असेल, पण त्याच्या ग्रंथाचा इतिहासास मोठा उपयोग आहे.

सन १६७८ त कर्नाटकस्वारींतून परत आल्यावर शिवाजीनें संभाजीस आळा घालण्याचा विचार सुरू केला. त्यास कामांत गुंतविण्यासाठीं शिवाजीनें कळविलें, " तुम्हांस माणसें वागवितां येत नाहींत. माझ्या पश्चात् हा एवढा राज्याचा भार तुम्ही कसा सांभाळाल ? माणसें जोडून सांभाळावीं लागतात, तें काम तुम्हांस साधत नाहीं. सबब तूर्त मी असें सुचवितों कीं, राजाराम लहान आहे त्यानें रायगडावर राहून महाराष्ट्राचा कारभार पाहावा आणि तुम्हीं कर्नाटकचा नवीन पैदा केलेला विस्तृत प्रदेश आहे त्याचा बंदोबस्त करावा. हें काम हलकें नसून तुम्हांस त्यांत आपली करामत दाखविण्यास पुष्कळ वाव आहे." ही सूचना वावगी नव्हती, राज्याच्या हिताचीच होती, पण ती संभाजीला मान्य झाली नाहीं. सोयराबाई व राजाराम ह्यांचा निवास रायगडावर होऊन तो छत्रपति बनल्यावर आपली काय वाट ? त्याचे विरोधक मंत्री व सापत्न माता त्यास तेव्हांच उडवून देऊन नाहींसा करतील अशी संभाजीची समजूत होऊन तो बापाविरुद्ध चिडून मोगल सेनानी दिलेरखान ह्याच्या आश्रयास जाऊन मिळाला. हा त्याचा उपद्व्याप शिवाजीच्या जिव्हारीं लागून त्यांतच पुढें अल्पावकाशांत त्यास मृत्यु आला.



# संभाजी-दिलेरखान सहवास

.३१.

संभाजीचा हा एकंदर प्रकार परमानंदानें तपशीलवार सांगितलेला आढळतो. त्याच्या ह्या काव्याचे श्लोक २१४६ असून त्यांपैकीं निम्याहून अधिक भाग संभाजीच्या विषयानें भरलेला आहे. संभाजीनें आपली तक्रार दिलेरखानास कळविली तींत तो खालील मजकूर सांगतो. मूळचे संस्कृत श्लोक न देतां, त्यांचा अर्थ मात्र सारांशानें देतों. “ माझ्या पित्याचें अंतःकरण सर्वथा सावत्र मातेनें ग्रासून टाकलें आहे. मला बापच नाहीं म्हणा ना ! स्वतःची माता तर मला नाहींच. शनीची माझ्यावर वक्रदृष्टि चालते आहे. मोरोपंतादि दुष्ट प्रधान उच्छेद करण्यास टपले आहेत. हे राक्षस मला दृष्टीसमोर नकोत. खरें म्हणाल तर बापाचें हें सर्व राज्य हक्कानें माझें एकट्याचें आहे. तें हस्तगत करण्यास मला उशीर नाहीं. बापानंतर वडील पुत्राला राज्य मिळायचें हा न्याय देशोदेशचे थोर पंडित सर्वत्र बोलतात. मी बापाचा वडील पुत्र असून विद्येनें व गुणांनीं श्रेष्ठ आहें. ‘ महाराज ’ ही पदवी बापाच्या पश्चात् मलाच प्राप्त झाली पाहिजे. तो माझा कार्यभाग बादशहांच्या कृपेनें व तुमच्या साहाय्यानें मी संपादूं इच्छितों. अहोरात्र मला चिंता म्हणून एकच, हे सर्व देश, दुर्ग

व लहान मोठीं शेकडों शहरें मला कशीं हस्तगत करतां येतील."*

ह्यावरून संभाजी बापाविरुद्ध कां चिडला ह्याची स्पष्टता होते. त्याची समजूत कशी काढावी ह्याची शिवाजीला मोठी चिंता लागली. त्यास अटकेंत ठेवावें तर भलतेंच आततायी कृत्य तो करणार. त्याजला नियंत्रण घालण्याची शक्ति कोणांत होती? जगाला अकुंठित वाटणारी शिवाजीची बुद्धि पुत्राच्या ह्या पेंचापुढें दुर्बल बनली. नुकतेंच जमून आलेलें हें राज्य हा पुत्र बुडविणार, ह्या विवंचनेंत शिवाजी अत्यंत बेचैन व हताश बनत गेला. उभयतांचें सडकून वितुष्ट निर्माण झालें. संभाजीनें बापावर विषप्रयोग केला असे प्रवाद उठलेले इंग्रजांच्या लेखांतील बातम्यांत आहेत, ते खरे खोटे किती तें ठरविणें शक्य नाहीं, पण उभयतांचें सर्वथा फाटलें हा तर्क कांहीं खोटा नाहीं. सन १६७८ च्या दसऱ्यानंतर दिलेरखान चालून येतो अशी खबर शिवाजीकडे आल्यावरून तो खानाच्या प्रतिकारासाठीं औरंगाबादच्या बाजूस गेला. जाण्यापूर्वी संभाजीला त्यानें सज्जनगडावर रामदासांच्या संगतींत ठेवलें. पण रामदास झाले म्हणून संभाजीला कसे सुधारणार! दिलेरखान नानाप्रकारचे कपटप्रयोग करूं लागला. त्याला संभाजीच्या इतराजीची बातमी कळली. खानाचे दूत येऊन गुप्तपणें संभाजीस भेटले. कदाचित् त्यापूर्वी संभाजीनेंच खानाकडे अंतस्थ सूत बांधलें असेल. खान तरी मराठी राज्यांतील ह्या फुटीचा फायदा घेण्याचें कां सोडील? उभयतांचें संगनमत होऊन ता. ११ डिसेंबर सन १६७८ रोजीं संभाजी येसूबाईसह सज्जनगडावरून निसटला. प्रथम महाबळेश्वरीं देवदर्शन घेऊन तसाच पंढरपुरच्या बाजूस करकुम येथें दिलेरखानास जाऊन भेटला. खानानें त्यास अत्यादरानें ठेवून घेतलें आणि सर्वप्रकारें त्यास साहाय्य करण्याचें मान्य केलें. संभाजीनें कांहीं खानाची किंवा बादशहाची सेवा पत्करिली नाहीं. फक्त बापाला काढून आपण छत्रपतिपद मिळविण्यापुरतीच त्याला मोगलांची मदत पाहिजे होती. पण दिलेरखान काय किंवा औरंगजेब काय वरकरणी दोघेही छद्मी, तूर्त संभाजीस गोंजारून शेवटीं सर्वांचाच घात करणारे होते. संभाजी खानास सामील झाला ही बातमी शिवाजीस लगेच कळली. तेणेंकरून त्यास काय वाटलें असेल त्याची आपण कल्पनाच करावी. आणखी एक नवीन आपत्ति त्याला उत्पन्न झाली. खानानें संभाजीस खूष करून त्याजकडून आपल्या उपयोगाची बहुमोल गुप्त माहिती, किल्ल्यांची, द्रव्यसंचयाची, जनानखान्याची वगैरे शक्य तितकी संभाजीकडून काढून घेतली. तुमचे किल्ले व प्रदेश तुम्हांस जिंकून देतों असें सांगून ते दोघे फौजांसह प्रथम भूपाळगडावर चालून गेले. हा किल्ला कऱ्हाडजवळ असून तेथें शिवाजीनें आपला मुख्य संचय व आप्तांचे कबिले सुरक्षित म्हणून ठेवलेले होते. फिरंगोजी नरसाळा तेथील रक्षक अधिकारी होता. तोफांचें रणकंदन होऊन ता. २ एप्रिल सन १६७९ रोजीं किल्ला मोगलांस

* (परमानंदकाव्य, पृ. ९४ श्लोक ७६–८४ वगैरे)

मिळाला. फिरंगोजीनें छत्रपतीच्या पुत्रावर गोळे मारण्याचें कृत्य केलें नाहीं ह्याबद्दल शिवाजीनें त्यास ठपका दिला. संभाजीनें किल्लयांतील रक्षकांची क्रूरपणानें कत्तल केली. नंतर ते दोघे विजापुरावर चालून गेले. विजापुरकरांनीं शिवाजीचें साहाय्य मागितलें. तो तसाच धावून विजापुरच्या बचावास गेला. त्यामुळें खान व संभाजी विजापुरचा उद्योग सोडून पन्हाळा किल्लयावर चालून आले. वाटेंत त्यांचा मुक्काम तिकोटें येथें झाला. त्या ठिकाणीं आजूबाजूचे पुष्कळ धनिक लोक आपलें गुप्त धन घेऊन राहिले होते. त्यांजवर एकदम मोगलांनीं धाड घातली. स्त्रियांनीं अब्रूसंरक्षणाकरितां मुलांबाळांसकट विहिरींत उड्या घेऊन प्राण दिले. हिंदूंस पकडून त्यांच्या विक्रीनें पैसे उपटण्याचा प्रयोग खानानें सुरू केला त्याचा निषेध संभाजीनें केला, पण खान संभाजीच्या आहारीं जाणारा नव्हता. स्वधर्मरक्षक छत्रपतीचा हा पुत्र आपला बचाव करीत नाहीं ह्याबद्दल लोकांनीं संभाजीस शिव्याशाप दिले. तिकोट्याहून तीच धाड अथणीवर आली आणि तेथेंही तोच प्रकार घडून आला. तेणेंकरून खान व संभाजी ह्यांची बाचाबाची होऊन उभयतांचें सडकून वांकडें आलें.

ह्यास आणखी एक कारण झालें. संभाजीस फुसलावून कशाही प्रकारें त्यास आपल्याकडे ताबडतोब दिल्लीस पाठवून द्या, असा गुप्त हुकूम दिलेरखानास बादशहाकडून आला. कांहीं तरी खुसपट काढून संभाजीस पकडण्याच्या बेतांत खान असतां इकडे शिवाजीचेही हेर गुप्तपणें संभाजीचें मन वळवीत होते. तुम्ही जाऊन बापाचे पाय धरून क्षमा मागा म्हणजे शिवाजी तुमचें कल्याण करील, उलट हा खान तुमचा घात केल्याशिवाय राहणार नाहीं, अशी संभाजीची समजूत त्या हेरांनीं घातली. महादाजी निंबाळकर म्हणून एक मराठा सरदार दिलेरखानाच्या हाताखालीं होता. संभाजीचा तो मेव्हणा, शिवाजीची कन्या सखूबाई§ हिचा नवरा, जवळ होता त्यानें संभाजीस गुप्तपणें भेटून त्यास मोगलांचा अंतस्थ कावा व बादशहाचा हुकूम ह्यांची सूचना दिली आणि क्षणाचा विलंब लावाल तर गोत्यांत याल अशी त्याची खात्री पटविली. ही संकटाची वर्दी मिळतांच अथणीहून संभाजी ता. ३० नोव्हेंबर सन १६७९ रोजीं रात्रीं गुप्तपणें येसूबाईस पुरुषाचा पोषाख देऊन तिच्यासह दहा स्वारांनिशीं पळून प्रथम विजापुरास व तेथून पुढें लगेच ता. ४ डिसेंबर रोजीं पन्हाळ्यास येऊन दाखल झाला. संभाजी पन्हाळ्यास आल्याची बातमी शिवाजीस रायगडास कळतांच तो येऊन पुत्रास भेटला. अशी ही संभाजीच्या पलायनाची कहाणी आहे.

---

§ महादाजीचा बाप फलटणचा सरदार बजाजी निंबाळकर मुसलमान झाला होता. त्यास जिजाबाईनें प्रायश्चित्त देववून शुद्ध करून ज्ञातींत घेतलें आणि सखूबाईशीं महादाजीचें लग्न करून आप्तपणा जोडला, तो प्रकार पूर्वी सांगितला आहे. दिलेरखानानें महादाजीस ह्या आगळिकीबद्दल पुढें अटकेंतही ठेविलें.

## .३२.

# सुबुद्धीचा चंद्रमा मावळला

ह्या प्रसंगीं पुत्रास कठोरपणा दाखवून शिवाजीनें जास्त दुखविलें नाहीं. सामोपचारानें त्याची समजूत घालून त्यास ताळ्यावर आणण्याचा शक्य तेवढा प्रयत्न शिवाजीनें केला. पुढील १ जानेवारी सन १६८० पावेतों शिवाजी पुत्राजवळ पन्हाळ्यास राहिला. आपण जन्मापासून काय कष्ट केले आणि ह्या राज्याकरितां पुढें काय कर्तव्य आहे ह्याची भरपूर वाटाघाट उभयतांनीं स्वस्थपणें एकत्र बसून केली. माणसें लावून एकंदर दौलतीची मोजदाद केली. खजिना, कारखाने, गडकोट, जलदुर्ग, मुलूख, जिन्नस, जडजवाहीर, सुवर्णचांदी, तोफा, कापड इत्यादि समस्त वस्तुजात तपासून याद्या केल्या त्या आतां छापल्या आहेत. एक पुरुष काय पराक्रम करूं शकतो ह्याचें उदाहरण पुत्रास दाखविलें. ‘सुविक्रान्तस्य लोकस्य सर्वमेव महीतलं’ ह्या परमानन्दाच्या उक्तीचें महत्त्व पुत्रास समजावलें कीं, ज्या माणसाच्या अंगीं पराक्रम आहे त्यास सर्व जग मोकळें आहे. पण संभाजीला कर्तव्याची जागृति झाली नाहीं. त्याच्या अंगीं पराक्रम कांहीं कमी नव्हता, पण व्यसनाधीनतेमुळें त्याला स्वतःचे दोष दिसले तरी शाब्दिक उपदेशानें ते दूर कसे व्हावे! व्यसनापुढें विचारशक्ति दुर्बल

बनते. संभाजीच्या हातून राज्यकारभार निभावणार नाहीं हें शिवाजी व इतर लोक चांगलें जाणून होते. पण त्या कोपिष्ठाला दूर कसें करायचें? कैदेंत ठेवावें तर त्याला आवरण्याची ताकद कोणाला? असा हा सर्व बाजूंनीं शिवाजीला मोठा पेंच निर्माण होऊन हताश वृत्तीनें तो श्रीसमर्थांच्या भेटीस सज्जनगडास गेला. संभाजीस त्यानें पन्हाळ्यावर ठेवून जनार्दनपंत हणमंते ह्यास त्याच्या देखरेखीस नेमिलें.

समर्थांच्या वाकेनिशी टिपणांत पुढील मजकूर आहे: "शिवाजी महाराज पौष शुद्ध ९ स भेटीस आले. माघ शुद्ध १५ पर्यंत होते. नित्यनित्य समारंभही बहुत केला. समर्थांनीं अनेक प्रकारच्या राजधानीसंबंधानें सांगोन अध्यात्मपर विषयही श्रीनीं सांगितला. तीन दिवस समाधि लागोन राजश्री बसले होते. अनेक प्रकारच्या गोष्टी होऊन त्यांत महाराज परंधामास जाणार हें समर्थांनीं सुचविलें. माघ शुद्ध १४ स आज्ञा घेऊन रायगडास गेले." हा लेख शिवाजीची मन:स्थिति उत्कृष्ट दाखवितो. ता. १ जानेवारी सन १६८० पासून चार फेब्रुवारीपावेतों जवळजवळ सव्वा महिना शिवाजी सर्वथा निष्क्रिय बनून स्वस्थ बसल्याचें हें त्याच्या एकंदर जीवनांतलें एकच उदाहरण आहे. त्यांतून तीन दिवस तर समाधींत म्हणजे अन्नपाणी वर्ज्य करून शून्यावस्थ राहिले. वाटाघाट चर्चा उभयतांची पुष्कळ झाली पण तोड कांहीं निघाली नाहीं. आतां ह्यांतून हे वांचत नाहींत अशीच समर्थांची खात्री झाली. ह्यावरून राज्याच्या ह्या घोर काळजीनें म्हणजे हृद्रोग लागून त्यानेंच ह्या थोर पुरुषाचा अकालीं अंत झाला. शेवटीं एक आठवडा ताप आला हें निमित्त. दोन प्रचंड बुद्धीच्या असामान्य व्यक्ति शिवाजी व समर्थ परिस्थितीपुढें दुर्बल बनल्या. राजा गेला तरी राज्य टिकावें ही लोकशाहीची पद्धति युरोपांत हळूहळूच निर्माण झाली, त्या मनूचा उदय त्या वेळीं भारतांत नव्हता. शिवाजीचें राज्यतंत्र सर्वथा व्यक्तिनिष्ठ होतें.

माघ शुद्ध पौर्णिमेस शिवाजी सज्जनगड सोडून रायगडास गेला आणि बरोबर दोन महिन्यांनीं चैत्र पौर्णिमेस त्याचें देहावसान झालें. म्हणजे ४ फेब्रुवारीपासून ३ एप्रिल असा हा सन १६८० वर्षांतला काळ आहे. ह्या दोन महिन्यांत राजकारणाचें विशिष्ट कृत्य कांहीं घडलें नाहीं. ७ मार्चला राजारामाची मुंज व १५ मार्चला त्याचें लग्न हे दोन प्रसंग कागदावर नमूद आहेत. प्रतापराव गुजराची मुलगी राजारामास केली. २३ मार्चला ताप येऊं लागला. त्यांतून शिवाजी उठला नाहीं. मागें सर्व पसारा विस्कळीत राहिला. सांगण्यासारखी निरवानिरव कांहीं घडून आली नाहीं. संभाजीच्या दुर्वर्तनानें जो धक्का शिवाजीस बसला, तोच शेवटचा प्रहार म्हणावा लागतो. शेवटचे चार महिने तो दुश्चित व व्याकुळ होता.

ताप येऊन अस्वस्थ होतांच जवळच्यांस कळून चुकलें कीं आयुष्यमर्यादा संपली. मातबर लोक जवळ बोलावून आणले. सर्वांचे कंठ दाटून परम दु:ख जालें. भागीरथीचें उदक प्राशन केलें. शनिवार चैत्र शुद्ध पौर्णिमा हनुमानजयंती शके १६०२ रौद्र संवत्सर ता. ३ एप्रिल सन १६८० दोन प्रहरीं रायगडीं काळ

जाहला. जगदीश्वर मंदिराच्या आवारांत दहन जालें. स्त्री पुतळाबाई मोहित्यांकडील सती गेली. पुत्र दोन, सईबाईच्या पोटीं संभाजी व सोयराबाईच्या पोटीं राजाराम. कन्या चार, एक सखूबाई महादाजी निंबाळकरास दिली, दुसरी राणूबाई जाधवांकडे दिली, तिसरी अंबिकाबाई हरजी राजे महाडिकास दिली आणि चौथी राजकुंवर गणोजी राजे शिर्के ह्यास दिली.

शिवाजीच्या अकालीं मृत्यूनें त्याचें मुख्य कार्य हिंदुपद-पातशाही उभारण्याचें अपुरें राहिलें. भारतभूमीवर मुसलमानांचें आक्रमण इ. स. १००० त सुरू झालें. तें निवारण करण्याचे प्रयत्न पृथ्वीराज चव्हाण, संगराणा इत्यादि वीर पुरुषांनीं आपापल्यापरी केले, त्यांतलाच अलीकडचा महत्त्वाचा प्रयत्न शिवाजीचा होय. तीन दशकांच्या दीर्घ व युक्तिबाज प्रयत्नानें त्यानें ह्या उद्देशाची भरपूर सिद्धता केली. दक्षिणेंतलें कार्य यशस्वी झालें, उत्तरेंतलें शिल्लक राहिलें तेंही आयुष्य असतें तर त्यानें पूर्ण केलें असतें. तयारी सगळी झाली होती. उत्तरेची परिस्थिति शिवाजीला कळून चुकली होती. राजपुतांशीं त्याचा घरोबा जमून तेही त्या प्रयत्नांत भाग घेण्यास उत्सुक होते. मृत्यूपूर्वीं थोडे दिवस शिवाजीनें स्वतः औरंगजेबाला जाहीर पत्र पाठवून हिंदूंवर जिझिया कर बसविल्याबद्दल त्याचा तीव्र निषेध केला, तो ह्या बाबतींत एक पुरावाच गणला जातो. हा कर औरंगजेबानें ता. २ एप्रिल सन १६७९ रोजीं जाहीर केला आणि लगेच शिवाजीनें त्याला प्रत्युत्तर दिलें. संभाजीनेंही पुढें औरंगजेबास पदच्युत करण्याचे प्रयत्न चालविले आणि शेवटच्या क्षणीं धडाडीनें प्राणार्पण करून सर्व पापांचें क्षालन केलें. पुढें हिंदुपद-पातशाहीचें हें अपुरें कार्य संभाजीपुत्र शाहू व त्याचे साहाय्यक पेशवे ह्यांनीं भिन्न पद्धतीनें कसें पूर्ण केलें तो इतिहास पुढचा आहे. हिंदु-मुसलमान तेढीचा हा प्रश्न आज नऊशें वर्षे चालत आहे. एक शिवाजी मात्र त्यांचा प्रतिकार करूं शकला.

# समारोप

## .३३.

शिवाजी ह्या नांवांत काय जादू भरलेली आहे ती वरील वर्णनावरून बालवाचकांच्या लक्षांत येईल. राष्ट्रोद्धार करणें म्हटला कीं प्रमुखाच्या अंगीं काय गुण असावे लागतात, तें शिवाजीच्या चरित्रावरून कळून येतें. वर सांगितल्याशिवाय आणखी किती तरी गोष्टी व प्रसंग शिवाजीच्या कर्तृत्वाचे इतिहासांत आहेत, ते सर्व येथें सांगितले नाहींत. ठळक प्रसंग तेवढेच स्वीकारले आहेत. पश्चिमकिनाऱ्यावर सिद्दी वगैरेशीं शिवाजीचे झगडे झाले, जलदुर्ग उभारले, राज्यांत एकंदर तीनशें किल्ले सजवून त्या सर्वांस सुंदर नांवें दिलीं तीं बहुतेक विद्यमान आहेत. नुसतीं किल्ल्यांचीं नांवें बनविण्यांत किती तरी माणसें खपत होतीं. भूषणगड, भूपालगड, भूमंडनगड, भूधरगड अशीं एक एक नांवें उच्चारलीं कीं शिवाजीच्या कल्पकतेचें आश्चर्य वाटतें. सिंहगड आपल्या परिचयाचा आहे. त्याचें मूळ नांव कोंडाणा. औरंगजेबानें त्याचें नांव ठेवलें बक्षिंदाबक्ष म्हणजे परमेश्वरानें दिलेलें बक्षीस. उतार वयांत इरेस पडून तो मावळांतले किल्ले घेण्यास स्वतः निघाला. सातारा व परळी घेतले, त्यांस अजीमतारा व नूर-ए-सातारा ( साताऱ्याचा प्रकाश, रामदासांस उद्देशून, ह्याचा

अपभ्रंश नौरस तारा सांगतात ती चूक आहे.) हीं नांवें त्यानें दिलीं. पुढें पन्हाळा, विशाळगड घेण्यास एक एक वर्ष लागलें. पावसांत चिखलांतून नानाविध आपदा भोगतांना औरंगजेबाचे सेनानी नाराज झाले. त्यांनीं अंतस्थपणें मराठ्यांच्या प्रमुखांशीं वाटाघाट करून द्रव्यांश पोंचवून अल्पकाळ बादशाही निशाण किल्ल्यावर लावावें, बादशहानें स्वतः त्याचा संतोष मानावा, बादशहाची पाठ वळतांच पुन्हा किल्ला मराठ्यांनीं परत घ्यावा, असा क्रम सालोसाल चालला. सन १७०० च्या पावसाळ्यांत खवासपुराजवळ मुक्काम असतां माणनदीस पूर येऊन मोगल छावणी वाहून गेली. पहाटेच्या प्रहरीं आरडाओरड झाल्याबरोबर वृद्ध बादशहा अंधारांतून बाहेर येतांना अडखळून पडला. त्यांत त्याचा उजवा पाय कायमचा अधू झाला. नंतर सन १७०३ त त्यानें सिंहगडास वेढा घातला. हा किल्ला म्हणजे मराठ्यांचा जीव कीं प्राण,! त्याजवर ता. ८ एप्रिल सन १७०३ रोजीं बादशहाचें निशाण झळकलें. लगेच किल्ला पाहून त्यानें त्याचें नांव बक्षिंदा-बक्ष ( बक्षीस देणारा परमेश्वर त्यानें दिलेलें बक्षीस ) असें ठेवून बादशहा परत गेला. त्याबरोबर मराठ्यांनीं सिंहगडावर आपलें निशाण लावलें. अशा किती तरी गमती ह्या किल्ल्यांच्या सांगतां येतील.

प्राप्त परिस्थितींत बुद्धिप्रभावानें आपला उद्धार करीत राहणें हें मानवी जीवनाचें सार सर्वदा एकच राहणार. म्हणून शिवाजीचें चरित्र आपणांस सदैव स्फूर्ति देणारें आहे. शिवाजीची योग्यता काय होती हें आणखी निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं. प्रसंगानुसार वर त्याचें विवेचन आलें आहे.

अनेक थोर पुरुषांनीं शिवाजीचें चरित्र वर्णिलें आहे, त्यांत त्याच्या काळीं जे बुद्धिमान् गृहस्थ त्या प्रसंगांत भाग घेत होते त्यांच्या शब्दांस मोठें मोल आहे. कृष्णाजी अनंत सभासद हा गृहस्थ शिवाजीजवळ वावरत होता, त्यानें त्याची बखर लिहिलेली अत्यंत सरस गणली जाते. अशा आणखी पुष्कळ बखरी आहेत. पण त्यांतल्या त्यांत शिवाजीजवळ प्रत्यक्ष काम केलेले कवि, पंडित, दरबारी असे अनेक पुरुष होते. गागाभट्ट, रघुनाथपंडित हणमंते, नेवासकर कवीन्द्र परमानंद, कवि कलश असे पुष्कळ विद्वान् व नामांकित गृहस्थ शिवाजीच्या कामांत भाग घेतलेले आढळतात. त्यांचे लेख बहुधा संस्कृत भाषेंत असल्यामुळें सामान्य वाचकांस अपरिचित आहेत. तथापि त्यांच्या लेखांत शिवाजीचें चरित्र रसाळ व मार्मिक उतरलेलें आहे. प्रसंगानुसार त्यांतले उतारे मीं वर दिले आहेतच. त्यांत थोडी भर म्हणून पुढें कांहीं उतारे देतों.

**संभाजीचें दानपत्र**—शिवाजी रायगडावर मृत्यु पावला तेव्हां संभाजी पन्हाळ्यावर होता. अशौचनिवृत्ति होतांच प्रधानांनीं राजारामास रायगडावर पदारूढ केलें. ही बातमी संभाजीला पोंचतांच तो आवेशानें रायगडावर चालून गेला आणि २० जुलईस त्यानें राजारामास काढून आपण गादीवर बसला, म्हणजे शिवाजीच्या मरणानंतर त्याला साडेचार महिन्यांनीं हें यश लाभलें. तें देवीच्या कृपेनें घडलें हें दाखविण्याकरितां त्यानें

देवीस दानपत्र करून नेमणूक बांधिली तें संस्कृत दानपत्र उपलब्ध असून, त्याच्या माथ्यावर " स्वहस्तोममशंभुराजस्य " असा उल्लेख आहे. ह्या दानपत्रांत संभाजीनें आपली स्वतःची व मालोजी, शहाजी, शिवाजी ह्या तीन पुरुषांची लांबलचक प्रशंसा दाखल केली आहे. शिवाजीसंबंधानें तो सांगतो :

**( १ ) यौवनारंभगृहीतम्लेंच्छक्षयदीक्षः ( २ ) दिल्लींद्रमानप्रध्वंसनपटुः ( ३ ) विजयपुराधीश्वर प्रार्थ्यमानभुजच्छायः**

अर्थ — ( १ ) ज्या शिवाजीनें यौवनापासूनच म्लेंच्छांचा नाश करण्याची दीक्षा घेतली आहे. ( २ ) दिल्लींद्राचा गर्व हरण करण्यांत कुशल. ( ३ ) ज्याच्या बाहुबलाचा आश्रय विजापुरराजानें प्रार्थिला.

**( ४ ) बालभावेन्द्रप्रस्थाधिनाथानुज्ञातमल्लयुद्धदत्ताज्ञाभंगः**

अर्थ — ( ४ ) ( स्वतःविषयीं संभाजी सांगतो ) " औरंगजेबानें मला स्वतःसमोर कुस्ती खेळण्याची आज्ञा केली असतां, ' मी नाहीं कुस्ती खेळत ' असें स्पष्ट बोलून ह्या पठ्यानें तोंडावर त्याचा उपमर्द केला. "

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१२२१८
१६९९

शिवकालीन शास्त्रीपंडित ह्या सुप्रसिद्ध लेखांत आरंभींच्या प्रशस्तींत पुढील पद्य आहे ( वा. इ. वृ. १८३५, पृ. २९५ )

**विश्राणनेषु व्यसनं यदीयं विद्याप्रसंगेषु यदीय सौख्यं**
**यस्यावदातं च यशोवितानं दिङ्मण्डली मंडपमातनोति ॥**

अर्थ — ज्या शिवाजीला लोकांचें भलें करणें हेंच व्यसन जडलेलें होतें, ज्याला विद्येच्या विषयांत मोठा आनंद वाटे ; आणि ज्याच्या निर्मल यशाचा विस्तृत मंडप सर्व दिशांचें आच्छादन बनला होता.

परमानन्दाची वाचा तर शिववर्णनांत फुलूनच येते. त्यांतील पुढील पंक्ति जिज्ञासूंनीं पाहाव्या, —

**चित्रं चारुतरं शिवस्य चरितं कोवानुगन्तुं क्षमः ।**
**दिल्लींद्रः क्षयमाप यस्य कलहाल्लंकेशतुल्योपमः ।**

अर्थ — असें शिवाजीचें विचित्र व मधुर चरित्र बनलें तें सर्व समजून घेण्यास कोण समर्थ आहे ! ज्या शिवाजीशीं कलह मांडून रावणासारखा पराक्रमी दिल्लीचा बादशहा नाश पावला.

इत्यलम् । आतां पुरे. श्रीशिवभूपस्मृत्यर्पणमस्तु ॥